# मेहता मराठी ग्रंथजगत

मार्च २०१३ । किंमत १५ रुपये

अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक








**खास लेख : ७० वर्षांपूर्वी सुरू झालेली मराठी कुमार साहित्य चळवळ (पृष्ठ ९८)**

# महाराष्ट्र राज्य शासन पुरस्कारप्राप्त पुस्तके




## अश्मजीव

डॉ. संजय ढोले




## विज्ञानातील सरस आणि सुरस

राहुल गोखले



# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ मार्च २०१३ ◆ वर्ष तेरावे ◆ अंक तिसरा


अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **साहित्यवार्ता** | **१२** |
| **पुरस्कार** | **३६** |
| **पुस्तक परिचय** | **५८** |
| **दखल** | **८४** |
| **इंग्रजी पुस्तक परिचय** | **९१** |
| **स्मृतीची चाळता पाने** | **९६** |
| **श्रद्धांजली** | **१०७** |
| **बालनगरी** | **१०८** |



संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

अंकाची किंमत : १५रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी :
दरमहा ११ तारखेस



**₹ ५००/- किंवा अधिकच्या नेट खरेदीवर पोस्टेज फ्री !**



मांडणी-अक्षरजुळणी

***मेहता पब्लिशिंग हाऊस***

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे - ४११०३०.
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Extension (ग्रंथजगत विभाग) - **२२७/२४३**

E-mail : info@mehtapublishinghouse.com
Website : www.mehtapublishinghouse.com



**वार्षिक वर्गणी १५०रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**



*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

संपादकीय

# राजधानी दिल्लीतील यंदाचा 'विश्व पुस्तक मेळा'

यंदाच्या या जागतिक पुस्तकजत्रेत मराठी प्रकाशक परिषद आणि अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ या दोन संस्थांच्या स्टॉलवर दरवर्षीप्रमाणेच निवडक प्रकाशकांची मोजकी पुस्तके प्रदर्शित केलेली होती. हे स्टॉल्स मोफत मिळत असल्याने आपल्याला परवडू शकतात. कारण त्याला भेट देणारे आणि तेथून पुस्तके विकत घेणारे ग्राहक-वाचक संख्येने फारच अल्प असतात. सात दिवसात सुमारे पन्नास-साठ हजार रुपयांची विक्री होते. त्यातून खर्च भागवणे तेवढे शक्य होते. इतर काही मराठी प्रकाशकांचे स्टॉल होते ते मराठीपेक्षा इंग्लिश पुस्तकांच्या डिस्प्लेसाठी होते. पॉप्युलर, ज्योत्स्ना प्रकाशन यांचे स्टॉल गेली अनेक वर्षे अन्य भारतीय व जागतिक प्रतिनिधींना आकृष्ट करतात. पॉप्युलरची इंग्रजी पुस्तके अनेक विषयांवर असून अनेक विद्यापीठात अभ्यासली जातात. ज्योत्स्ना प्रकाशन चित्रकलेवरील पुस्तके आणि अनुवाद यावर भर देत आले आहे. केशव भिकाजी ढवळे ही प्रकाशन संस्था शतकोत्तर वाटचाल करणारी; ज्ञानेश्वरी, भगवद्‌गीता, एकनाथी भागवत, दासबोध, योगवासिष्ठ वगैरे धार्मिक पुस्तकांच्या इंग्रजी भाषांतरामुळे त्यांना चांगली मागणी असते. मराठीतील या आद्य प्रकाशन संस्थेने यंदा प्रथमच दिल्लीच्या या ग्रंथजत्रेत भाग घेतला. आय मस्ती डॉट कॉम या वेबसाइटवर त्यांनी आपली ई-बुक्सही उपलब्ध करून दिली आहेत. धार्मिक, आध्यात्मिक, ज्योतिषविषयक, भृगुसंहिता, भक्तिमार्गप्रदीप वगैरे विषयांवरील त्यांच्या पुस्तकांच्या विक्रमी आवृत्त्या निघत आहेत. सानेगुरुजींच्या गोड गोष्टी, ताम्हनकरांचा गोट्या, वि. कृ. श्रोत्रिय यांच्या वेदातील गोष्टी, यावर मराठी वाचकांच्या अनेक पिढ्या पोसल्या गेल्या आहेत.

ई बुक्सची संकल्पना आता प्रादेशिक भाषांमध्येही मान्यता मिळवू लागली आहे हे या वर्षी ठळकपणे लक्षात आले. रॉकस्टँड या ईबुक्स व ई- मॅगेझिन्स पुरवणाऱ्या



संस्थेने प्रादेशिक भाषांतील ई-बुक्सचा एक संच या जत्रेत प्रदर्शित केला. तिच्याकडे २० लाख पुस्तके उपलब्ध आहेत. रॉक असाप रिटेल प्रा. लि. या संस्थेचे प्रवीण राजपाल यांनी हिंदी प्रमाणेच गुजराती, मराठी वगैरे १८ भाषांमध्ये ई-पुस्तके प्रकाशित करण्याची महत्त्वाकांक्षी योजना आखली आहे. ज्यांच्याकडे इंटरनेट कनेक्शन नसेल अशा वाचकांनाही मोफत अँड्राइड ॲप्लिकेशन डाऊनलोड करून ई-पुस्तक वाचता येईल. नोटस् काढता येतील. पुस्तक वाचण्याऐवजी ऐकता येईल असे त्यांनी सांगितले. या कंपनीने ५० भारतीय प्रकाशकांशा टाय-अप करून हजार पुस्तकांचे डिजिटायझेशन सुरू केले आहे. 'चाचा चौधरी' ई-कॉमिक बुक फक्त एक रुपयात डाऊनलोड करून हवे तेव्हा वाचता येते.

पुस्तक वाचायचे तर असते पण अनेकांना वाचनाची प्रक्रिया कष्टदायक वाटते. त्यांना पुस्तकातील मजकूर स्वतः वाचण्याऐवजी अन्य कोणी वाचून दाखवला तर ऐकण्यात रस वाटतो. आपण गाणी रेकॉर्डवरून ऐकतोच की! दिल्ली ग्रंथजत्रेत रीडओडॉटकॉमच्या स्टॉलवर श्राव्य (ऑडिओ) पुस्तकांच्या प्रात्यक्षिकाने रसिकांना प्रभावित केले. या स्टॉलवर विविध भाषांतील पाच हजारावर ऑडिओ बुक्स उपलब्ध होती. इंग्रजीतील शेकडो बेस्टसेलर पुस्तके ऑडिओ स्वरूपात आणली गेली आहेत. मोबाईल, टॅब्लेट, स्मार्टफोन, आयफोन, किंडल-नूक सारखे वाचन यंत्र (रीडिंग डिव्हाइस) याद्वारे ई-बुक हे मल्टिमिडियाच्या वैशिष्ट्यांसह आपण आता वाचू शकतो. 'वाचून' दाखवलेले ऐकणे-श्रवण करणे हा या प्रक्रियेतील केवळ एक भाग असतो. ई-बुक्सच्या स्वरूपातले हॅरी पॉटरचे पुस्तक वाचताना आपण प्रत्यक्ष त्याच्या शाळेत, त्याच्या वर्गात, त्याच्या शिक्षकांसमवेत जादूचे प्रयोग बघत


राहतो, पक्ष्यांचे आवाज ऐकत असतो, त्यावेळचे वातावरण अनुभवत असतो. 'वाचन'ही एकरेषीय सरळ प्रक्रिया आहे. तर ई-बुक ही बहुस्तरीय, त्रि-मिती अनुभव देणारी प्रक्रिया आहे. चित्रपटाच्या जवळ जाणारी सुविधा आहे. युरोप-अमेरिकेतील प्रकाशन संस्था, ॲपल-ॲमेझॉन सारख्या संस्था लोकप्रिय परीकथा, फँटसीज् , क्लासिक्स यांचे रूपान्तर मल्टिमिडिया तंत्राने करण्याबाबत प्रयत्नशील आहेत. वाचक हाही या प्रक्रियेत केवळ एक वाचक म्हणून तटस्थ, निष्क्रिय प्रेक्षक उरणार नाही. वाचन ही क्रीडेचाच भाग वाटेल. मायक्रोसॉफ्टच्या आयबॉक्सप्रमाणे तोही या खेळात, पुस्तकांच्या मल्टिमिडिया अनुभव प्रक्रियेत सहभागी होऊ शकेल. या दृष्टीने येत्या काही वर्षात खूपच परिवर्तन झालेले दिसेल. ऑडिओ बुक हा त्या प्रयोगातला एक प्राथमिक टप्पा मानायला हवा. भारतासारख्या देशात निरक्षरतेचे प्रमाण खूप प्रचंड असल्याने आणि वेगवेगळ्या लिपींचा वापर यामुळे वाचनप्रक्रिया आत्मसात करणे किंवा लेखन करणे हा क्लेशकारक प्रकार वाटतो. त्यात मुले मागे पडली की त्यांचे शिक्षण अर्धवट राहते. अभ्यासाचे पुस्तक हे चित्रपटातील दृश्यांप्रमाणे दृक-श्राव्य रूपात आपल्याशी संवाद साधू लागले तर ज्ञानग्रहणाची प्रक्रिया सुखद व सुबोध, प्रभावी आणि प्रसन्न ठरू शकेल. ऑडिओ बुक्स हा ई-बुकच्या अलीकडचा एक टप्पा म्हणून या ग्रंथजत्रेत समोर आला. फ्लिपकार्टने गेल्या वर्षी या ग्रंथजत्रेत सोळा स्टॉल्स घेऊन कॅश ऑन डिलिव्हरी मॉडेलचा दणकेबाज प्रारंभ केला. पुस्तकांप्रमाणेच क्रीडासाहित्य, कॅसेट्स, संगणक, कॅमेरे, उपकरणे, फर्निचर वगैरे मालाचीही विक्री ही संस्था करते. ॲमेझानचे मॉडेल तिच्यासमोर आहे. भारतात क्रेडिट कार्डचा वापर कमी असल्याने या कंपनीने जागोजाग गोडाऊन्स उभारून हवा तो माल, हवा तो ग्रंथ वा फोन ग्राहकाला कमीत कमी वेळात घरपोच देण्याची, कॅश ऑन डिलिव्हरीची प्रभावी यंत्रणा निर्माण केली आहे.

या संस्थेचा आमचा अनुभव फार चांगला आहे. बेस्टसेलर्सचा उठाव या संस्थेकडून कमालीच्या झपाट्याने होतो. मोठमोठ्या ग्रंथदालनांपेक्षाही फ्लिपकार्टकडून येणाऱ्या ऑर्डर्स मोठ्या असतात. काही लोकप्रिय पुस्तकांच्या एका वेळी हजार प्रती ही संस्था घेते. यावरून तिचे नेटवर्क किती जबरदस्त असेल याची चुणूक दिसते. ग्रंथजत्रेत अशा अभिनव प्रयोग करणाऱ्या उत्साही तरुणांचे परिचय होतात. ते आपल्याला व्यवसायाच्या व्यापक क्षमतांची कल्पना देतात. दुर्दैवाने फारच थोडे मराठी प्रकाशक या ग्रंथजत्रेला नित्यनेमाने जाताना दिसतात. ग्रंथव्यवहाराचे विराट विश्वरूप दर्शन घ्यायचे असेल, तर ग्रंथजत्रेला भेट अपरिहार्यच आहे. हिंदी आणि इंग्रजी भाषांमध्ये प्रकाशनक्षेत्रात नवीन उपक्रम कसे राबवले जात आहेत याची नोंद घेण्यासाठीही या ग्रंथजत्रेची वारी करायलाच हवी. भारतातील ग्रंथनिर्मिती क्षेत्रातील




अग्रगण्य प्रतिभावंत व्यावसायिकांचा हा महोत्सव खऱ्या अर्थाने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आपल्याला महत्त्वाचे स्थान मिळवून देईल. संस्कृत ग्रंथ परंपरेतील अमाप ज्ञानभांडाराचे मोल या प्रक्रियेत सामील झाल्याशिवाय आपल्याला वसूल करता येणार नाही.

मराठीला राजधानी दिल्लीत जे काही स्थान आहे त्याचेच प्रातिनिधीक दर्शन या जत्रेत दिसते. सुमारे दोन लाख मराठी भाषक दिल्लीत राहतात. त्यातील बरेच उच्चपदस्थ आहेत. परंतु या ग्रंथयात्रेला भेट देणाऱ्यांची संख्या, त्यातल्या त्यात मराठी स्टॉल्सला भेट देणाऱ्यांची संख्या २-३ हजारांपेक्षा जास्त नसते. दोन हजार स्टॉल्समध्ये आपले दोनचार स्टॉल्स हे काही खरे नाही. त्या तुलनेत बंगाली स्टॉलवरची गर्दी आणि वर्दळ उठावदार दिसते. दिल्लीतील आपल्या संस्था, आपली कार्यालये, आपले उच्चपदस्थ अधिकारी मराठी पुस्तकांच्या खरेदीसाठी फारशी तरतूद करीत नाहीत. साहित्य अकादमी, नॅशनल बुक ट्रस्ट, विद्यापीठ - सर्वत्र मराठी माणसे आहेत, पण मराठीचा प्रभाव कुठेच नाही. परदेशी जाणाऱ्या लेखक-कलाकारांमध्ये मराठी प्रतिनिधींचा समावेश क्वचितच होतो. परभाषक लेखकांशी मराठी लेखकांची इंटरॲक्शन कमी होते. त्यामुळे मराठी पुस्तकांचे इंग्रजी-हिंदी व इतर भाषांत अनुवाद कमी होतात. ग्रंथजत्रेत दरवर्षी आघाडीवरच्या आपल्या लेखककलावंतांना नेऊन इतर भाषक लेखक-संपादकांबरोबर त्यांच्या भेटीगाठींची काही योजना आखली तर ती आंतरभारती पातळीवर एक क्रांतिकारक घटना ठरेल.




आगामी

# पॉपी

मूळ लेखक

**ग्रेगॉर सेमन**

अनुवाद

**डॉ. प्रमोद जोगळेकर**

अफगाणिस्तानात सर्वांत जास्त 'पॉपी'चे – अफूचे उत्पादन केले जाते. मुख्यत: अफूचा वापर नशा करण्यासाठी होतो. ऑस्ट्रेलियन पत्रकार ग्रेगॉर सेमन यांनी अफू या एकाच विषयाच्या मागे लागून प्रत्यक्ष अफगाणिस्तानात आलेले अनुभव या पुस्तकात कथन केले आहेत.

जगभरात फोफावणाऱ्या दहशतवादामागे अफूचा पैसा कसा आहे, अफूच्या व्यवहारातून मिळणारा नफा कोणाला होतो आणि त्याची किंमत कोणाला मोजावी लागते, या प्रश्नांचा शोध घेताना सेमन यांना अफूच्या व्यवहाराशी निगडित शेतकरी, डॉक्टर, तस्कर, व्यसनाधीन माणसं, राजकारणी, पोलीस अशी विविध माणसं भेटतात. इतकंच नाही, तर इंग्रजी पॉप गाणी आवडणारा तालिबानी कमांडरही भेटतो!


हा प्रवास एक वेगळेच जग आपल्या समोर उभे करतो, आपल्या कल्पनेपलीकडचे; पण वास्तववादी!

....

ग्रेगॉर सेमन

सेमन हे सिडनीस्थित लेखक आणि पत्रकार असून त्यांनी आजवर वेगवेगळ्या विषयांवर पुस्तके लिहिली आहेत. त्यांनी इंटरनेट साइट्स, तसेच मासिके यांसाठीही लेखन. तसेच संपादन केले आहे. वेगवेगळ्या टीव्ही कार्यक्रमांतही त्यांचा सहभाग आहे.

आगामी




# ओल्ड सिटी हॉल


मूळ लेखक : **रॉबर्ट रोटेनबर्ग**

अनुवाद : **अनिल काळे**

....हे काय? मि. केव्हिनच्या हातात आज सिगारेट कशी नाही? आणि चहाचा मग कुठे गेला? केव्हिन आपल्या हातांकडे बघत बोटं चोळत होता. त्याच्या बोटांवर मि. सिंगना कसला तरी लालभडक डाग दिसला. क्षणभर त्यांना वाटलं, आज बहुतेक आपल्याला तांबडं संत्रं मिळणार. त्यांना ती संत्री फार आवडायची. भारतातही ती मिळायची आणि या दिवसांत ती कॅनडातही मिळतात असं नुकतंच त्यांना कळलं होतं, मि. केव्हिननंही तसलंच एक तांबडं संत्रं कापलेलं दिसतंय.

केव्हिननं आपले दोन्ही हात प्रकाशासमोर धरले. त्याच्या हाताला लागलेलं तांबडं द्रव मि. सिंगना आता स्पष्ट दिसू लागलं, पण ते चांगलं घट्ट वाटत होतं, संत्र्याच्या रसासारखं पातळ दिसत नव्हतं.
मि. सिंगच्या हृदयात धडधडू लागलं.
ते रक्त होतं.
त्यांनी काहीतरी बोलायला तोंड उघडलं, पण तेवढ्यात केव्हिनच त्यांच्यापाशी आला. ''मी मारलं तिला, मि. सिंग.'' त्यानं हळूच म्हटलं.

आगामी





# माणसं अशीही

लेखक
**महादेव मोरे**

मानवी व्यवहारांच्या तपशीलवार वास्तववादी चित्रणामुळे महादेव मोरे यांचा व्यक्तिचित्रणांचा हा संग्रह मराठी साहित्यात महत्त्वाचा ठरतो. बेळगाव-निपाणी या महाराष्ट्राच्या सीमाभागातली वैशिष्ट्यपूर्ण बोलीभाषा, हेही या संग्रहाचे वैशिष्ट्य आहे. या निमित्ताने मराठी वाचकांना या बोलीतल्या काही शब्दांचा परिचय होईल.

यात भेटणारी माणसं ही विविध जाती-जमातींची आहेत. ती गरीब, भोळीभाबडी आहेत, तशीच इरसालही आहेत; परिस्थितीने गांजलेली, पिचलेली, निराश झालेली आहेत, तशीच स्वप्नं पाहणारी, आशेच्या एके किरणामागे धावणारी आहेत. लेखकाच्या जीवनातले कडू-गोड प्रसंगही आहेत.

मराठी साहित्याच्या मुख्य परिघाबाहेरची ही माणसं कधी हसवतात; रडवतात, अचंबित करतात, मनात करुणभाव उत्पन्न करतात; तर कधी जीवनाबद्दलची अनोखी अंतर्दृष्टी देऊन जातात.




**नवे कोरे**

# जे. आर. डी. टाटा यांची पत्रं

संपादन : **अरविंद माम्ब्रो**

अनुवाद : **सुप्रिया वकील**

**किंमत : ४५०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**

सध्याच्या वेगवान जगात 'ई-मेल्स', 'सेलफोन्स' अशांसारख्या तत्पर संपर्कमाध्यमामुळे जग जवळ आणले आहे; पण एकेकाळी मुख्यत्वे 'पत्रं' या माध्यमातून संपर्क साधला जात असे. पत्रांतून कामांच्या तपशिलांखेरीज आपुलकी व जवळीकही साधली जात असे. शिवाय ही 'पत्रं' त्या एका विशिष्ट कालखंडाचा दस्तऐवज म्हणून इतिहास अभ्यासकांना व भावी पिढ्यांना मार्गदर्शक ठरत असत. 'पत्रं' हा कायमस्वरूपी माहितीस्रोत असतो. या पुस्तकातली सुमारे ३०० पत्रं इतिहासाचा अनमोल ठेवा आहेत. 'जे.आर.डी. टाटा' या विलक्षण व्यक्तिमत्त्वाच्या चिकित्सक लेखणीतून उतरलेली विविध विषयांना स्पर्श करणारी ही 'पत्रं' तत्कालीन सामाजिक, राजकीय, आर्थिक, औद्योगिक क्षेत्रांचं दर्शन घडवतात आणि विसाव्या शतकातील एका महान, बहुआयामी व्यक्तित्वाचं अनेकपदरी अंतरंग उलगडून दाखवतात.




### ✯ बेळगावमध्ये 'वर्ड पॉवर' ग्रंथदालनाचा शुभारंभ

बेळगाव खानापूर रोडवरील भंडारी कॅपिटलमधील कॉसमॉस बँक बिल्डिंगमध्ये फॅमिली लाईफस्टाईल 'वर्ड पॉवर' या भव्य वातानुकूलित पुस्तक दालनाचे उद्घाटन १ फेब्रुवारी रोजी समारंभपूर्वक करण्यात आले.

राणी चेन्नम्मा विद्यापीठाचे समन्वयक डॉ. अनिल कालकुंद्रीकर व उद्योजक सुरेश हुंदरे यांनी दीपप्रज्वलन केले. मेहता पब्लिशिंग हाऊस संस्थेचे संचालक अनिल मेहता व वर्ड पॉवरचे रवी बिरादार, शरण बिरादार, मनोज मेहता, अश्विन मेहता यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

या दालनात मराठी, इंग्रजी, कन्नड मधील अग्रगण्य लेखकांची पुस्तके, खेळणी, सीडी व स्टेशनरी उपलब्ध असेल. प्रा. अनंत मनोहर, संजय पाटील, प्रा. माधुरी शानभाग, जगदीश कुंटे, गडहिंग्लजचे वागी यांच्यासह अनेक साहित्यिक आणि वाचक यावेळी उपस्थित होते.

### ✯ 'मृत्युंजय'ची नवी आवृत्ती नव्या थाटात

गेल्या चार दशकांहून अधिक काळ वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारी शिवाजी सावंत यांची 'मृत्युंजय' ही कादंबरी नव्या स्वरूपात वाचकांसमोर येत आहे. तसेच, 'मृत्युंजय'कार सावंत यांच्या इतर साहित्याचेही नव्या स्वरूपात प्रकाशन होणार आहे. महाभारतामधील कर्णाचे जीवनचरित्र विस्तृत स्वरूपात मांडणाऱ्या या कादंबरीने मराठी साहित्यात लोकप्रियतेचे मानदंड प्रस्थापित केले. १९६७ मध्ये तिची पहिली आवृत्ती कॉन्टिनेन्टल प्रकाशनातर्फे प्रसिद्ध झाल्यानंतर गेल्या ४५ वर्षांत तब्बल २७ आवृत्त्या निघाल्या. मृत्युंजयकार शिवाजी सावंत यांच्या निधनानंतर त्यांच्या साहित्याचे हक्क पत्नी मृणालिनी, मुलगा अमिताभ आणि कन्या कादंबरी धारप यांच्याकडे आले. त्यांच्या सर्व साहित्याचे हक्क

अमिताभ यांनी गेल्या वर्षी मेहता पब्लिशिंग हाऊसला दिले. त्यामुळे कॉन्टिनेन्टलने दावा केला होता. 'जिल्हा न्यायालयाने कॉन्टिनेन्टलचा दावा फेटाळल्यानंतर त्यांनी हायकोर्टात धाव घेतली होती. हायकोर्टाने प्रलंबित तीन प्रकरणांविषयी जिल्हा कोर्टातच बाजू मांडण्याची सूचना केली. त्याबाबत कोणताही निकाल दिला नाही,' अशी माहिती मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे बाजू मांडणाऱ्या ॲड. कल्याणी पाठक यांनी दिली.

आर्ब्रिट्रेशन क्लॉजअंतर्गत प्रकाशनाला स्थगिती द्यावी, हा क्लॉज या प्रकरणात लागू होत नसल्याचे सांगून कोर्टाने स्थगितीस नकार दिला. त्यामुळे साहित्य प्रकाशनाचा मार्ग मोकळा झाला, असा खुलासा ॲड. पाठक यांनी केला.

## ✯ 'पवित्रम्' प्रकाशित

स्वाती चांदोरकर लिखित 'पवित्रम्' या कादंबरीचे प्रकाशन, दशक्रिया करणारे अच्युत मोडकगुरुजी यांच्या हस्ते अंधेरी सहार रोड येथील मुक्तिधाम स्मशानभूमीत करण्यात आले. मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेली ही कादंबरी अंत्यविधी आणि दशक्रिया करणाऱ्या गुरुजींच्या जीवनावर आधारित आहे. यावेळी अभिनेते प्रदीप वेलणकर यांनी मोडक गुरुजींची मुलाखत घेतली. मुलाखती दरम्यान मोडक गुरुजींनी आपले अनुभव सांगताना किरवंत शब्द खटकत असल्याचे सांगितले. वेलणकर यांनी निवडक उताऱ्यांचे वाचन करून कादंबरीच्या कथानकाची झलक सादर केली. पवित्र-अपवित्र असे काहीच नसते. अंत्यविधी हेसुद्धा पवित्र कार्यच आहे, असे स्पष्ट करण्यात आले. स्वाती चांदोरकर या ज्येष्ठ साहित्यिक व. पु. काळे यांच्या कन्या आहेत.



## ✯ कोलकाता पुस्तक मेळ्यात ममता बॅनर्जींची पाच पुस्तके प्रकाशित

वादग्रस्त कादंबरीकार सलमान रश्दी यांचा कोलकाता प्रवेश रोखून जगाच्या नजरेतून 'साहित्यशत्रू'च्या भूमिकेत गेलेल्या पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जींनी आपले साहित्यममत्व कोलकाता पुस्तक मेळाव्यात भरभरून उधळले. २०११ साली मुख्यमंत्री बनल्यानंतरचे वादग्रस्त अनुभव, कथा आणि कवितांची पाच पुस्तके प्रकाशित करून त्यांनी सर्वांना चकित करून सोडले.

करारी आणि धोरणी राजकारणी म्हणून परिचित असलेल्या ममता बॅनर्जी आपल्या व्यग्र दिनचर्येतूनही दररोज लेखनासाठी आवर्जून वेळ देतात. कविता करण्याचा छंद त्यांना आहे. १९९५ साली त्यांचे पहिले पुस्तक प्रकाशित झाले. त्यांच्या पुस्तकांची संख्या आता ४० झाली आहे. सर्वाधिक पुस्तकसेवा देणाऱ्या त्या देशातील एकमेव मुख्यमंत्री असाव्यात.

मुख्यमंत्री झाल्यावर आलेल्या अनुभवांना ममतांनी वाट करून दिली आहे. स्वतःला आवडलेल्या १०० कवितांचा एक संग्रहही प्रकाशित केला आहे. एका पुस्तकात त्यांच्या आवडीच्या चित्रांचा आणि कवितांचा संग्रहत करण्यात आला आहे. रोली बुक्स या दिल्लीमधील संस्थेने ही पुस्तके प्रकाशित केली आहेत. नंदिनी सेनगुप्ता यांनी बंगालीमधून ती इंग्रजीत अनुवादित केली आहेत. मानवी दुःख, मूलभूत हक्कभंग, राजकीय विरोध हे त्यांच्या बहुतांश काव्याचे विषय. त्यांनी आपल्या फेसबुक अकाऊंटवर आपल्या पुस्तकांची मुखपृष्ठे टाकली आहेत.

## ✯ 'ऑर्डर ऑफ कॅनडा'बद्दल डॉ. वाणी यांचा सत्कार

''प्रत्येक आपत्तीकडे एक शिक्षणाची संधी म्हणून बघितल्याने नवीन शिकायला मिळाले. त्यामुळे संकटांचा सामना केल्यानंतरही चेहऱ्यावरील प्रसन्नता ढळली नाही,'' अशा शब्दांत डॉ. जगन्नाथ वाणी यांनी आपल्या यशाचे गूढ उलगडले. डॉ. वाणी यांना कॅनडा सरकारने 'ऑर्डर ऑफ कॅनडा' या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविले आहे. त्यांनी भारतातील वेगवेगळ्या संस्थांना वेळोवेळी मदतीचा हात दिला आहे. त्यानिमित्ताने या सेवाभावी संस्थांनी डॉ. वाणी यांचा कृतज्ञता सत्कार केला, 'सकाळ'चे अध्यक्ष प्रतापराव पवार, 'स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन'चे (सा) अध्यक्ष अमृत बक्षी, पर्सिस्टंट सिस्टीम्सच्या मनीषा तपस्वी वगैरे उपस्थित होते. सुधीर गाडगीळ यांनी घेतलेल्या मुलाखतीत डॉ. वाणी म्हणाले, ''कॅनडातील सर्वोच्च पुरस्काराचे श्रेय माझ्याइतकेच या संस्थांना आहे. भारतीय संस्कृतीचे वैभव कॅनडातील नागरिकांपर्यंत पोचविण्यासाठी तेथे संगीताचे कार्यक्रम सुरू केले. त्यातून भारताप्रमाणे जगाच्या सर्व देशांचे संगीत अभ्यासासाठी 'वर्ल्ड म्युझिक कोर्स' सुरू करण्यात आला. त्यातून देशातील अनेक नवोदित कलावंतांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठ खुले झाले.''

चित्रपटनिर्मिती हा आपला व्यवसाय नाही, असे स्पष्ट करताना ते म्हणाले, ''समाजामध्ये जनजागृती करणे, हा माझा छंद आहे आणि चित्रपट हे त्याचे एक माध्यम आहे. स्किझोफ्रेनिया या आजाराबाबत लोकांपर्यंत शास्त्रीय माहिती पोचविण्यासाठी 'देवराई' चित्रपटाच्या निर्मितीसाठी मदत केली; तसेच माहिती अधिकारासाठी 'एक कप चहा', मूकबधिरांची समस्या मांडण्यासाठी 'बाळ बोलत नाही' असे काही चित्रपट निर्माण केले.''

''भविष्यातील आर्थिक तरतुदींचा अचूक वेध घेणाऱ्या 'ॲक्युरिय सायन्स'चा अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी पुणे विद्यापीठाकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. पण, अद्यापही हा अभ्यासक्रम सुरू होऊ शकला नाही,'' अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

## ✯ चेतन भगत : आता पटकथाकार

'फाइव्ह पॉईंट समवन' 'वन नाइट ॲट कॉल सेंटर' आणि 'थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाइफ' या पुस्तकांवर सिनेमे निघाल्यानंतर आता प्रसिद्ध कादंबरीकार चेतन भगत थेट सिनेमासाठीच पटकथा लिहित आहेत.

एका गाजलेल्या तेलुगू सिनेमावर आधारित 'किक' या नावाच्या हिंदी व्हर्जनसाठी ते पटकथालेखन करीत आहेत. आयुष्यात ठरवलेल्या ध्येयासाठी लढत राहिलेल्या हिरोची कहाणी त्यात आहे.

बॉलिवुडला आपल्या कथा आवडताहेत, आपल्या पुस्तकांवर सिनेमे बनताहेत; शिवाय बड्या कलाकारांबरोबर काम करायला मिळतेय, यामुळे ते खूष आहेत.

'काय पो चे' या सिनेमाची मूळ कथा त्यांचीच आहे; शिवाय त्यांनी त्यासाठी संवादही लिहिले आहेत. 'टू स्टेट्स' आणि 'रिव्होल्यूशन २०२० या पुस्तकांवरही सिनेमे निघण्याची शक्यता आहे.

पुस्तकांवरून सिनेमे निघण्याचा ट्रेंड महत्त्वाचा असून, यामुळे चांगले लिखाण प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल, असे त्यांना वाटते.

## ✯ सुपरस्टार रजनीकांतचे चरित्र

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील प्रख्यात अभिनेता रजनीकांत याच्यावर पत्रकार नमन रामचंद्रन यांनी 'रजनीकांत: द डेफिनेटिव्ह बायोग्राफी' लिहिली आहे. बंगळूर परिवहन सेवेत कंडक्टर असलेल्या रजनीकांतचा 'अपूर्व रंगांगल' हा चित्रपट १९७५मध्ये खूप गाजला.

शिवाजीराव गायकवाड ऊर्फ रजनीकांत याने बंगळूरच्या 'म्हैसूर मशिनरी'मध्ये काही काळ काम केले. तांदळाची पोती उचलण्याचे हमाली कामही केले. नंतर परीक्षा देऊन तो बस कंडक्टर झाला. (१९ मार्च १९७०).

रजनीकांत झपाट्याने प्रवाशांजवळ यायचा, तिकीट द्यायचा आणि स्टाइल

मध्ये सुटे पैसे परत करायचा. या 'स्टाइल'मुळे त्याच्या बसमध्ये प्रवासी गर्दी करत, असे या पुस्तकात म्हटले आहे.

### ✯ 'भाषासंपर्क आणि भाषाबदल' परिषद

भाषाशास्त्र विभाग, डेक्कन कॉलेज आणि भारतीय भाषा संस्थान, म्हैसूरतर्फे आयोजित 'भारतातील भाषासंपर्क आणि भाषाबदल' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद ६ फेब्रुवारीला घेण्यात आली. डेक्कन कॉलेजचे अध्यक्ष डॉ. गो. बं. देगलूरकर, संचालक प्रा. डॉ. व्ही. पी. भट्ट, अमेरिकेच्या इलिनोय विद्यापीठाचे भाषाशास्त्रज्ञ हॅन्स हॉक, भारतीय भाषा संस्थानचे डॉ. जी. पी. पी. शास्त्री, प्रो. एल. एम. खुबचंदानी या वेळी उपस्थित होते.

'द्राविडी भाषांच्या प्राचीन इंडो-आर्यन (संस्कृत) भाषांवर पडलेल्या प्रभावासंबंधीच्या संशोधनात त्रुटी आहेत. त्यासाठी वापरण्यात आलेल्या पुराव्यांचे स्वरूप असमाधानकारक आहे. त्यामुळे याबाबत अधिक संशोधन आणि उपलब्ध पुराव्यांची अभ्यासपूर्ण छाननी आवश्यक आहे', असे मत अमेरिकन भाषाशास्त्रज्ञ आणि संस्कृत अभ्यासक हान्स हॉक यांनी व्यक्त केले.

प्रा. हॉक यांचे संस्कृतसह अन्य काही भाषांवर प्रभुत्व आहे. त्यांनी भाषांच्या परस्परसंबंधांवर दीर्घकाळ संशोधन केले आहे. आपल्या भाषणाची सुरुवात त्यांनी अस्खलित संस्कृतमध्ये केली. सर्व उपस्थितांना संस्कृतमध्येच वंदन करून स्वत:ची ओळखही त्यांनी संस्कृतमध्येच करून दिली.

'प्राचीन द्रविडी भाषा परिवाराचा (तमीळ) प्राचीन भारतीय-युरोपीय (संस्कृत, प्राकृत आदी) भाषांवर प्रभाव असल्याचे सिद्ध करण्यासाठी संशोधकांनी दिलेल्या पुराव्यांवरून अंतिम निष्कर्ष काढला जाऊ नये. त्यासाठी अधिक संशोधन करण्याची गरज आहे,' असे प्रतिपादन प्रा. हान्स हॉक यांनी केले.

भारतीय-आर्य, द्रविडी, ऑस्ट्रो-आशियायी आणि तिबेटी-बर्मन असे भाषावार परिवार भारतात आहेत. यासह जगभरातील भाषांमध्ये होणाऱ्या बदलांचा आढावा या परिषदेत घेतला गेला.प्रा. हॉक यांनी द्राविडी आणि भारतीय-युरोपीय भाषा परिवार यांतील शब्दरचना आणि व्याकरण यांचा तुलनात्मक अभ्यास सादर केला.

'सध्या बहुभाषिक असणे हे एक आवश्यक कौशल्य बनले आहे. भारतातील विविधतेमुळे भारतीय नागरिक आपल्या व्यवहारांमध्ये दोनपेक्षा अधिक भाषांचा वापर सहजपणे करू शकतात. प्रत्येक भाषेत आपली संस्कृती, आपले ज्ञान दडलेले असते. त्यामुळे दुर्मीळ होत असलेल्या भाषांचे ज्ञान मिळवून इतिहासाचा उलगडा करता येतो,' असे डॉ. देगलूरकर यांनी सांगितले.

'भारतात शेकडो भाषा आणि हजारो बोलीभाषा आहेत. यातील प्रत्येक भाषा अमूल्य आहे. पूर्वी मृत होत चाललेल्या भाषांकडे सरकार लक्ष देत नव्हते. परंतु,

युनेस्कोने अशा भाषांचा अहवाल सादर केल्यानंतर भारतात भाषासंवर्धनाला गती मिळाली. हा प्रकल्प इतिहास, संस्कृतीच्या जतनासाठी महत्त्वाचा ठरणार आहे', असे डॉ. शास्त्री यांनी सांगितले. डेक्कन कॉलेजच्या भाषाशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. सोनल कुलकर्णी-जोशी यांनी प्रास्ताविक केले. पश्चिम क्षेत्रीय भाषा केंद्राच्या प्राचार्य डॉ. कलिका मेहता यांनी आभार मानले.

### ✯ व्यंगचित्रकार संमेलन

व्यंगचित्रे दिसायला छान; पण ती रेखाटने तेवढेच कठीण असते. चांगला व्यंगचित्रकार होण्यासाठी रेखाटन शैलीबरोबरच नकलाकार असणे उपयुक्त ठरते. व्यंगचित्रकाराला विनोदबुद्धी, निरीक्षण आणि राजकीय परिपक्वता आवश्यक असते, असे मत मनसेचे अध्यक्ष आणि व्यंगचित्रकार राज ठाकरे यांनी व्यक्त केले. प्रथमच




**६वी आवृत्ती**

# नटरंग

**आनंद यादव**

**किंमत : १८०/-रु.**

**पोस्टेज : ३०/-रु.**

'नटरंग'

मराठीतील एक अव्वल कलात्म आणि शोकात्म कादंबरी. 'नटरंग' मध्ये आनंद यादवांच्या लेखकीय व्यक्तिमत्त्वाची बहुतेक सर्व वैशिष्ट्ये प्रभावीपणे व्यक्त झालेली आहेत. प्रसंगांना चित्रवत आकार देण्याची आणि संपूर्ण रसपूर्ण बनवण्याची, त्यांना मनोवैज्ञानिक स्पर्श देण्याची, प्रसंगातील कारुण्य आणि विनोद हेरण्याची लेखकाची क्षमता यामुळे कादंबरीचे वातावरण चैतन्यपूर्ण झाले आहे.

आयोजित अखिल भारतीय मराठी व्यंगचित्रकार संमेलन शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीला समर्पित करण्यात आले. त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून संमेलनास प्रारंभ झाला. या वेळी राज ठाकरे यांनी व्यंगचित्रकार म्हणून आपल्या भावना व्यक्त केल्या. ज्येष्ठ व्यंगचित्रकार आर. के लक्ष्मण आणि त्यांच्या पत्नी कमल, शि. द. फडणीस, शां. ब. मुजुमदार, कृष्णकांत कुदळे वगैरे उपस्थित होते. कुठल्याही वादाशिवाय हे संमेलन पार पडत असल्याचे नमूद करीत ठाकरे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला बाळासाहेब ठाकरे, आर. के. लक्ष्मण यांनी व्यंगचित्रांविषयी मांडलेली मते एका ध्वनिचित्रफितीच्या माध्यमातून दाखविण्यात आली. उपस्थितांचे स्वागत कैलास भिंगारे यांनी, तर आभार प्रशांत कुलकर्णी यांनी मानले.

सरस्वती लायब्ररी आणि कार्टूनिस्ट कंबाईन यांच्या वतीने आयोजित अखिल भारतीय मराठी व्यंगचित्रकार संमेलनात व्यंगचित्रकार शि. द. फडणीस, वैजनाथ दुलंगे, विकास सबनीस, प्रभाकर वाईकर, विजय पराडकर, विवेक मेहेत्रे, प्रभाकर झळके, नीलेश जाधव यांनी व्यंगचित्रांच्या रेषांमधून सर्वसामान्यांचे जगणे मिस्कीलपणाने व्यक्त केले. या रेषांनी रसिकांना विचार करण्यास भाग पाडले अन् खळखळून हसविलेसुद्धा! सामाजिक, राजकीय व्यंगचित्रावर भाष्य करीत कलावंताला अभिव्यक्ती स्वातंत्र्य हवेच; पण त्याचा आपल्या हातून दुरुपयोग होणार नाही याची काळजीही कलावंताने घ्यायला हवी, असा सूर 'व्यंगचित्रे आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य' या परिसंवादात उमटला.

यात 'सकाळ'चे संपादक मल्हार अरणकल्ले, शि. द. फडणीस, विवेक मेहेत्रे सहभागी झाले होते; तर 'व्यंगचित्रांचे जग' या परिसंवादात प्रशांत कुलकर्णी, चारुहास पंडित यांनी आपली मते व्यक्त केली.

### ✯ कुरआन आणि विज्ञान प्रदर्शन


स्त्रीभ्रूणहत्येला विरोध ते ब्रह्मांडाची उत्पत्ती अशा विविध विषयांबाबत कुरआनमध्ये काय म्हटले आहे आणि सद्य:स्थितीत ते कसे लागू पडते याची माहिती देणारे पोस्टर प्रदर्शन संदेश लायब्ररीचे संचालक सलीम शेख यांनी तयार केले. जळगाव येथे नुकत्याच पार पडलेल्या अखिल भारतीय मुस्लिम संमेलनात या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला.

सलीम शेख म्हणाले, ''विज्ञानाने ज्या गोष्टी शोधल्या, त्या कुरआनमध्ये १४०० वर्षांपूर्वीच नमूद केल्याची जाणीव झाल्यानंतर मी याबाबत बारकाईने अभ्यास करू लागलो. त्यात बिग बँग थिअरी, एक्स्पांडिंग युनिव्हर्स, चंद्र हा परप्रकाशित आहे, डोंगर-पर्वत हे आपल्याला भूपृष्ठावर जेवढे दिसतात तेवढेच ते जमिनीच्या खालीही असतात आणि त्यामुळे पृथ्वीचा समतोल साधला जातो;

गर्भाची वाढ मातेच्या पोटात कशी होते. अशा सुमारे १२० बाबी कुरआन आणि आधुनिक विज्ञान यांच्यामध्ये त्यांना सापडल्या.''

### ✯ **'पुणे बिनाले' दृश्यकला महोत्सव**

'मोहोर : पुणे बिनाले' या महोत्सवामुळे दृश्यकलेला व्यासपीठ मिळाले. या कलेसाठी एकत्र येऊन काहीतरी करायला हवे, ही इच्छा कलाकारांमध्ये निर्माण झाली. महोत्सवामुळे पुण्याला एक वेगळी ओळख मिळेल, अशी भावना भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ आर्किटेक्चरचे प्राचार्य डॉ. किरण शिंदे यांनी व्यक्त केली.




**४ थी आवृत्ती**

# इट्स नॉट अबाउट द बाइक

**लान्स आर्मस्ट्राँग**

अनुवाद : **अंजनी नरवणे**

**किंमत : २८०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**

कॅन्सरशी दिलेल्या दीर्घ लढ्याबद्दल, मूल न होण्याच्या शक्यतेनं बसणाऱ्या शारीरिक आणि मानसिक धक्क्याबद्दल, पित्याचं छत्र न मिळता गेलेल्या बालपणाबद्दल पुस्तकं लिहिली जातात. जगातील सर्वांत अवघड आणि महत्त्वाची सायकलस्पर्धा जिंकण्यासाठी किती दृढनिश्चयी असावं लागतं, याबद्दल लिहिलं जातं.

– आर्मस्ट्राँगनी हे सगळं अनुभवलं आहे आणि त्या अनुभवांमधून उतरलं आहे एक अप्रतिम पुस्तक.

आर्मस्ट्राँग यांचं हे आत्मकथन स्फूर्तिदायक आहे आणि मनोरंजकही! ते रडगाणं गात बसत नाहीत, सांगायला अवघड गोष्टी वेष्टणं घालून सोप्या करून सांगत नाहीत, आणि ज्या खूप चांगल्या लोकांनी त्यांना त्यांच्या ह्या प्रवासात मोलाची मदत केली, त्यांचे आभार मानायला विसरत नाहीत.

या महोत्सवात चित्रकला, शिल्पकला वगैरे दृश्यकला आणि पर्यावरणाची सांगड घालून शहरातील टेकड्या वाचविण्याचा संदेश देण्यात आला. ३५० हून अधिक कलाकारांनी आपल्या कलाकृती तळजाई, पर्वती, चतु:शृंगी, पु.ल. देशपांडे उद्यान या ठिकाणी मांडल्या होत्या. त्यास ८० हजार नागरिकांनी भेट दिली. आशिष नंदी, सईद मिर्झा यांची व्याख्याने, कार्यशाळा यामुळे लोकांनी लोकांसाठी केलेला कलामहोत्सव असे स्वरूप त्याला प्राप्त झाले.

## ✯ राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलन

पुरोगामी महाराष्ट्राला व देशाला प्रगतिपथावर नेण्यासाठी संतांचे विचार उपयोगी पडतील, हे लक्षात घेऊन एकमेकांची उणीदुणी काढण्यापेक्षा बुद्धिजीवी माणसांनी माणसे जोडण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे.

जातीवर आधारित आरक्षणापेक्षा सामाजिक संरक्षणाची मागणी करावी, असे आवाहन सकाळ माध्यम समूहाचे कार्यकारी संपादक (राजकीय) गोविंद घोळवे यांनी तळेगाव दाभाडे राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलनाच्या समारोपप्रसंगी केले. माजी आमदार कृष्णराव भेगडे यांना घोळवे यांच्या हस्ते 'राष्ट्रीय बंधुता पुरस्कारा'ने गौरविण्यात आले. संमेलनाध्यक्ष गोविंद पानसरे होते. सामाजिक उल्लेखनीय कार्याबद्दल केशवराव वाडेकर, नंदकुमार वाळंज, दिलीप बंब, ॲड. छाया आबनावे आणि हाजी अफजल शेख यांना राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात आले. पानसरे म्हणाले, ''बंधुतेसाठी संघर्ष केला पाहिजे. संघर्षासाठी जाणिवा निर्माण करण्याची जबाबदारी साहित्यिक, विचारवंत पत्रकार, प्रबोधनकार यांच्यावर आहे. गुलामाला त्याच्या गुलामगिरीची जाणीव करून दिल्याशिवाय तो संघर्षासाठी तयार होणार नाही. हे लक्षात ठेवून काम करणे ही काळाची गरज आहे.''

## ✯ ज्योत्स्ना भोळे यांच्यावर लघुपट

संगीत रंगभूमीला नवचैतन्य बहाल करणारी, शास्त्रीय- नाट्यसंगीत आणि भावगीत यावर उमटलेली सुरेल भावमुद्रा म्हणजे ज्योत्स्ना भोळे. मराठी रसिकांच्या मनात कायम दरवळणारे हे व्यक्तिमत्त्व आता लघुपटाच्या माध्यमातून उलगडणार आहे. मे महिन्यात त्यांची जन्मशताब्दी सुरू होत आहे. या निमित्ताने हा लघुपट दाखवण्यात येणार आहे. 'आंधळ्याची शाळा', 'आशीर्वाद', 'कुलवधू', 'कोणे एके काळी', हे त्यांचे चित्रपट आणि नाटके गाजली. 'आला खुशीत समींदर...', 'क्षण आला भाग्याचा...', 'बोला अमृत बोला...', 'शिरी घागर पाझरते...', 'माझिया माहेरा जा...' ही गीते अजरामर ठरली. त्यांच्या या कार्याला लघुपटातून उजाळा देण्यात आला आहे.

या निमित्ताने ज्योत्स्नाबाईंच्या कन्या आणि 'स्वरवंदना'च्या प्रमुख वंदना खांडेकर

म्हणाल्या, ''जन्मशताब्दीनिमित्त पुण्यासह मुंबई, गोव्यात विशेष समारंभ होतील. ज्योस्त्नाबाईंची दुर्मिळ छायाचित्रे, ध्वनिमुद्रणे, आठवणी, पत्रे संग्रही असल्यास त्यासाठी सुनीत बंगला, ७७३/७-ब, एरंडवणे, पुणे - ०४ या पत्त्यावर संपर्क साधावा.''

## ✯ 'अग्निशिखा': मणिपूरची कन्या शर्मिला इरोम यांची जीवनकहाणी

ईशान्य भारतात लष्कराला दिलेल्या विशेष अधिकार कायद्याच्या विरोधात (अफस्पा) सलग बारा वर्षे संघर्ष करणाऱ्या मानवाधिकार कार्यकर्त्या, मणिपूरच्या कन्या शर्मिला इरोम यांच्या संघर्षाची कहाणी अनन्य संस्थेतर्फे १९ जानेवारीला रंगमंचीय आविष्कारातून सादर करण्यात आली.

चोवीस तासांपैकी केवळ तीन तास वीजपुरवठा, शिक्षण व आरोग्य अशा मूलभूत सुविधांच्या त्रुटी, सशस्त्र सेनेकडून होणारी पिळवणूक, राजकीय लोकांचे दुर्लक्ष... याकडे या कलाविष्कारातून लक्ष वेधले गेले. 'अनन्य'चे सूर्या गुणे आणि हर्षल चव्हाण यांनी अभिवाचन केले. गणेश आढारी, नवनाथ जाधव, सुनील धजगुडे, गजानन नवघरे ही युवा 'टीम' यात सहभागी झाली होती.

## ✯ 'समरसता' संमेलनाध्यक्षपदी प्रा. टोपले

समरसता साहित्य परिषद, महराष्ट्र यांच्या वतीने जुन्नर येथे होणाऱ्या १५ व्या समरसता साहित्य संमेलनाच्या अध्याक्षपदी वनवासी कल्याण आश्रमाचे महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष प्रा. लक्ष्मणराव टोपले यांची निवड करण्यात आली आहे. हे संमेलन 'आदिवासी साहित्य आणि समरसता' या विषयावर होणार असून यामध्ये आदिवासींच्या जीवनावर परिसंवाद, कवी संमेलन, मुलाखती, शोभायात्रा, ग्रंथ दिंडी इ. कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बहुजन साहित्यधारा (पुणे) या संस्थेचे संचालक चंद्रकांत शहासने संमेलनाचे निमंत्रक आहेत.

## ✯ 'शिवछत्रपती पुरस्काराच्या नियमावलीत बदल करावा'

राज्य सरकारने 'शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार'संदर्भात नव्याने केलेल्या नियमावलीमध्ये खूपच त्रुटी असल्याने चांगल्या खेळाडूंचे नुकसान होणार आहे. त्यामुळे राज्य सरकारने विविध क्रीडा संघटनांच्या हरकती, सूचना लक्षात घेऊन या नियमावलीत बदल करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्य शिल्पा भोसले यांनी यासाठी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे, क्रीडामंत्री भास्कर जाधव यांच्याकडे केली आहे. भोसले म्हणाल्या, ''पुरस्काराची नवीन नियमावली तयार करताना कोणत्याही खेळाडूंशी, तसेच क्रीडा संघटनांशी संवाद साधला गेला नाही. त्यांच्या हरकती-सूचना मागविल्या गेल्या नाहीत. पात्र स्पर्धांचा दर्जा विचारात घेताना त्यांचा क्रम चुकविला आहे. ग्रामीण स्पर्धेतील पदकविजेता व आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील खेळाडू यांची तुलना

करणारे निकष स्पष्ट होत नाहीत. वैयक्तिक व सांघिक क्रीडाप्रकार यांमध्ये गोंधळ निर्माण केला आहे.''

### ✯ सॅमसंगचा अँड्रॉइड फ्रीज

स्मार्टफोनच्या विश्वात अँड्रॉइडचा उदय झाल्यापासून सगळी समीकरणे बदलली. बहुपयोगी 'अँड्रॉइड' ही ऑपरेटिंग सिस्टिम रेफ्रिजरेटरमध्ये वापरण्याचा मान 'सॅमसंग' या बहुराष्ट्रीय कंपनीने मिळविला आहे. लौकरच हा अत्याधुनिक 'अँड्रॉइड' रेफ्रिजरेटर बाजारात लाँच होणार आहे.

या रेफ्रिजरेटरमध्ये ठेवण्यात आलेल्या पदार्थांची 'एक्स्पायरी डेट' सेट करण्याची आणि त्या तारखेनंतर तो पदार्थ न वापरण्याची 'वॉर्निंग' देण्याची सोय असेल. ही प्रणाली दह्यासारख्या नाशवंत पदार्थासाठी उपयुक्तही ठरेल. 'टी ९०००' नामक या मॉडेलला १० इंची वायफाय सुविधा असलेला टचस्क्रीनही आहे. दिलेल्या आज्ञा त्यात कायमस्वरूपी रेकॉर्ड होतील. या रेफ्रिजरेटरचे नियंत्रण अँड्रॉइड फोन अथवा लँडलाइनद्वारेदेखील करणे शक्य होईल. शिवाय टचस्क्रीनच्या माध्यमातून ग्राहक न्यूज, हवामान आणि ट्विटर साधनांचा वापर करू शकतील. गुगल कॅलेंडर, स्लाइड शो, फेसबुकचा वापर करता येईल.

'एक्स्पायरी डेट' व्यतिरिक्त कंट्रोल हीटिंग, एअर कंडिशनिंग लाइट आदी बाबीही 'अँड्रॉइड'मार्फत नियंत्रित होतील. मोबाइल, एलइडी, एलसीडी आणि अन्य इलेक्ट्रॉनिक उत्पादनांच्या बाजारपेठेत आघाडी मिळविणारी सॅमसंग कंपनी आता 'कुलिंग'सेगमेंटमध्येही बाजी मारू शकेल. या रेफ्रिजरेटची किंमत ३,९९९ डॉलर असेल. आणखी एक इलेक्ट्रॉनिक कंपनीही अँड्रॉइडवर आधारित कुकर तयार करत आहे. केवळ खिशात सामावलेला अँड्रॉइड लवकरच किचनमध्येही प्रवेश करणार असे दिसते.

### ✯ 'यशस्वी भव' मासिकाचे प्रकाशन

परिवार संस्थेने तरुणांना मार्गदर्शन करण्यासाठी सुरू केलेल्या 'यशस्वी भव' मासिकाचे प्रकाशन उद्योजक डी. एस. कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. या वेळी 'असा मी घडलो' या विषयावर डी. एस. कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. पैशासाठी काम न करता आनंद मिळविण्यासाठी करा, असा सल्ला त्यांनी दिला. जिद्द, चिकाटी, नम्रता, प्रामाणिकपणा, सकारात्मक दृष्टिकोन हे गुण अंगीकारल्यास यश दूर नाही, असे त्यांनी सांगितले. सादिक शेख, अनिल टिंगरे, बापूराव कर्णेगुरुजी आदी उपस्थित होते.

### ✯ 'दुर्बिणीच्या ऑपरेशन'चे तंत्र

एंडोस्कोपी तज्ज्ञ डॉ. अमोल बापये यांनी लिहिलेल्या 'प्रॅक्टिकल हँडबुक ऑफ

इंडोस्कोपिक अल्ट्रासोनोग्राफी' या पुस्तकाद्वारे दुर्बिणीतून ऑपरेशन करण्याचे तंत्र अवगत करणे सुलभ होईल.

जपानमधील स्प्रिंगेरतर्फे प्रकाशित झालेले हे पुस्तक 'ई-बुक' स्वरूपातही उपलब्ध आहे. जपानमधील डॉ. काजूओ अकाहोशी यांनी सहलेखन केले आहे.

प्रत्येक टप्प्यावर वापरण्यात येणारे तंत्र तीनशेहून अधिक चित्रांद्वारे स्पष्ट केल्याने उपकरणांनी पाठविलेल्या छायाचित्रांचे विश्लेषण करणे, एंडोस्कोपी तंत्रज्ञान आत्मसात करणे आता सोपे होणार आहे.

### ✯ 'काव्यलहरी' चे प्रकाशन

चपराक प्रकाशनतर्फे शकुंतला देव लिखित काव्यसंग्रहाचे प्रकाशन समीक्षक डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य, प्रा. मानसी रांजेकर, चपराकचे घनश्याम पाटील या वेळी उपस्थित होते. 'प्रत्येक विचारसरणीतील मानवतावादी विचारांचे दर्शन या काव्यसंग्रहात घडते', असे डॉ. सबनीस यांनी सांगितले. 'साहित्य संमेलनामध्ये पुरुषप्रधान संस्कृतीचा प्रभाव दिसतो. त्यामुळे लेखिका-कवयित्रींसाठी स्वतंत्र स्त्री साहित्य संमेलनाचे आयोजन करणे, आवश्यक आहे', असे भाई वैद्य यांनी सांगितले.

### ✯ 'मराठी ग्रामीण कादंबरी आणि ग. ल. ठोकळ' या पुस्तकाचे प्रकाशन

आस्वादक समीक्षा लेखकाला पुढे जाण्याची दिशा देते. शिवाय, साहित्यातील उणिवा आणि गुणात्मकताही प्रकट करते. पण, ग्रामीण साहित्याच्या आस्वादक समीक्षेचे प्रमाण हल्ली कमी झाले आहे, अशी खंत डॉ. रा. रं. बोराडे यांनी व्यक्त केली. स्नेहवर्धन प्रकाशनातर्फे डॉ. रामदास रसाळ लिखित 'मराठी ग्रामीण कादंबरी आणि ग. ल. ठोकळ' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. बोराडे यांच्या हस्ते, तर 'मराठी ग्रामीण कथा आणि ग. ल. ठोकळ', 'मराठी ग्रामीण कविता आणि ग. ल. ठोकळ' या पुस्तकांचे प्रकाशन डॉ. द. ता. भोसले आणि डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते झाले. प्राचार्य राम शिंदे, प्रकाशिका स्नेहल तावरे या वेळी उपस्थित होत्या.

डॉ. बोराडे म्हणाले. ''जुन्या काळात शहरी लेखकांच्या तुलनेत ग्रामीण भागातील लेखकांना प्रकाशझोतात येण्यासाठी बराच काळ लागत असे. पण, आजची स्थिती बदललेली आहे. प्रकाशन संस्था व प्रसारमाध्यमांमुळे नवोदित लेखकांना लगेच प्रसिद्धी मिळते. त्यामुळेच आपले साहित्य वाचकांपर्यंत पोचवण्यासाठी जो संघर्ष पूर्वीच्या लेखकांना करावा लागला तसा संघर्ष सध्याच्या लेखकांना करावा लागत नाही.'' डॉ. भोसले म्हणाले, ''ग्रामीण जीवनातील कठीण व संघर्षमय वास्तव साहित्यातून समोर आले.''

डॉ. सदानंद मोरे म्हणाले, ''पूर्वीच्या ग्रामीण साहित्याने नेहमीच वाचकांची

वाङ्‌मयीन अभिरुची वाढविण्याचे काम केले. त्या वेळचे ग्रामीण साहित्य नागर संस्कृतीतील वाचकांना लक्षात घेऊनच करण्यात आले.''

## ✯ शरद पवार बुक फेस्ट

नगर शहरात १९९७ साली अखिल भारतीय साहित्य संमेलन झाले. त्यावेळी नामवंत प्रकाशन संस्था नगरमध्ये आल्या होत्या. त्यानंतर तब्बल १५ वर्षांनंतर शरद पवार बुक फेस्ट च्या ग्रंथ प्रदर्शनात वि. स. खांडेकर, व. पु. काळे, पु. ल. देशपांडे, रणजित देसाई, विश्वास पाटील, द. मा. मिरासदार या लेखकांच्या पुस्तकांसोबतच अनुवादित पुस्तकांनाही मोठी मागणी असल्याचे दिसून आले. वैशाली प्रकाशनचे विलास पोतदार यांनी सांगितले की, ''आम्ही श्यामची आई हे शंभर रुपयांचे पुस्तक अवघ्या तीस रुपयांत उपलब्ध करून दिले. त्याला मोठी मागणी होती.'' संस्कृती प्रकाशनाच्या सुनीताराजे पवार म्हणाल्या, ''ऐतिहासिक व शास्त्रज्ञांच्या पुस्तकांना मोठी मागणी आहे.'' मराठी इस्लामिक पब्लिकेशनने २२१ पुस्तके मराठीत आणली आहेत. त्यात मराठी कुराणही आहे. राहुरी विद्यापीठासह वारकरी सेवासंघ, रामकृष्ण मठ, इस्कॉन, मिर्झा वर्ल्ड बुक हाऊस, सावनकृपाल पब्लिकेशन यांची आध्यात्मिक पुस्तकेही होती. बेस्टसेलर्स पब्लिकेशनच्या इंग्रजी पुस्तकांच्या दालनातही गर्दी होती.''


या प्रदर्शनाला माजी खासदार यशवंतराव गडाख, रावसाहेब शिंदे, महापौर शिला शिंदे, समाजसेवक पोपटराव पवार, मिनाताई जगधने, संगमनेरच्या नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, प्रशांत गडाख, विक्रम राठोड, जी. के. पाटील, डी. एम. कांबळे, लेखिका प्रा. मेधा काळे, कवी लहु कानडे, सुनिता गडाख, संतोष पवार, पुष्पा ससाणे, नगरसेवक विनित पाऊलबुद्ध, निर्मला मालपाणी, शारदा लगड, आदींसह जिल्ह्यातील विविध शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थांच्या सहली काढून या पुस्तक प्रदर्शनाचा लाभ घेतला. बुकफेस्टचे नियोजन आणि वाचकांचा प्रतिसाद पाहून आपण एखाद्या आंतरराष्ट्रीय पुस्तक प्रदर्शनात सहभागी झाल्याचे समाधान मिळाले.

अशा प्रकारचे पुस्तक प्रदर्शन दरवर्षी आयोजित करण्याची आवश्यकता आहे. धावपळीच्या जीवनात करमणूकीची अनेक साधने उपलब्ध आहेत, तरीही वाचकांनी बुकफेस्ट मध्ये हजारो रुपयांची पुस्तके खरेदी केली हे पाहून समाधान वाटले असे डायमंड प्रकाशनचे दत्तात्रेय पाष्टे म्हणाले.

## ✯ इंदिरा संतांच्या आठवणींना स्मृतिमग्ना कार्यक्रमात उजाळा

संजीवनी मराठे, पद्मा गोळे आणि इंदिरा संत या तिघी काव्यवाचनाचे कार्यक्रम करायच्या. त्या वेळी मराठे आणि गोळे यांना आपल्या गोड गात्या गळ्याविषयी आणि सुरेख दिसण्याविषयी अभिमान असायचा आणि त्यांना वाटायचे, इंदिरा संत

नवे कोरे




# परमेश्वर

## : एक सांकेतिक नाव

मूळ लेखक : **मणी भौमिक**
अनुवाद : **अशोक पाध्ये**

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**

कुठे आहे तो परमेश्वर? तो मृत्यू पावला आहे का? धर्म आणि श्रद्धा या केवळ अफूसारख्या आहेत. चारशे वर्षांपूर्वी विज्ञानाची प्रगती होऊ लागली. तोपर्यंत दैवी शक्तीचा प्रभाव जगावर सर्वत्र होता. पण नंतर हळूहळू माणसाचा देवावरचा विश्वास ढळू लागला. देवाची जागा विज्ञानाने घेतली. परंतु खुद्द विज्ञान हा एक भ्रामक देव ठरला. परिणामी मानवजात निराश झाली.

मणी भौमिक या शास्त्रज्ञाने एक्सायमर लेसरचा शोध लावला. डोळ्याचा चश्मा घालवण्याची शस्त्रक्रिया शोधून काढली. अशा या शास्त्रज्ञाने परमेश्वराचे अस्तित्व विज्ञानाच्या आधारे शोधायचा प्रयत्न केला. त्याची ही एक थरारक कहाणी! भौमिक याने पराकोटीचे दारिद्र्य व पराकोटीची श्रीमंती उपभोगली. त्यातून त्याचे विचारमंथन सुरू झाले. विज्ञान व अध्यात्म यांच्यातील सुवर्णमध्य त्याने गाठला.

अत्यंत स्फूर्तीदायक अशा या आध्यात्मिक शोधयात्रेच्या पुस्तकाचा अमेरिकेत अफाट खप झाला आहे आणि अद्यापही होतो आहे.

यांची कविता कोण ऐकणार? मात्र, एखाद्याच ओळीतून ती आपली शानदार, घराणेदार काव्यप्रतिभा उलगडत असे आणि आमचा गर्व कुठल्या कुठे निघून जाई... संजीवनी मराठे यांनी सांगितलेल्या इंदिराबाईंच्या अशा आठवणींना डॉ. माधवी वैद्य यांनी 'स्मृतिमग्ना' या कार्यक्रमात उजाळा दिला.

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे प्रतिवर्षी मासिक मनोरंजन का. र. मित्र व्याख्यानमाला आयोजिण्यात येते. इंदिरा संत जन्मशताब्दी वर्षानिमित्त अनन्वय फाऊंडेशनतर्फे नरेंद्र डोळे आणि वैद्य यांनी अभिवाचन केले, तर अमृता कोल्हटकर यांनी गाणी सादर केली.

नारायण संत आणि इंदिरा संत यांच्यात बहरत जाणारे नाते, पांढऱ्या पिसाची आठवण, इंदिरा संत यांना आवडणारा गावरान गंध, सुनेच्या आगमनावरची कविता, चिमुकल्या पाहुणीचे स्वागत यांसारख्या कविता आणि उताऱ्यांचे अभिवाचन आणि 'अजून नाही जागी राधा', 'किती तुला आठवावे' यांसारख्या गाण्यांचे सादरीकरण या वेळी झाले.

## ✯ सायन्स फिक्शन स्टडीज् कॉन्फरन्स

''विज्ञान काल्पनिकांचा वाचकवर्ग विस्तारायला हवा. इंग्रजीबरोबरच इतर भारतीय भाषांपर्यंत आणि शक्य झाल्यास या भाषांच्या विविध बोलीपर्यंत विज्ञान साहित्य पोहोचायला हवे,'' असे मत 'इंडियन स्पेस रीसर्च ऑर्गनायझेशन' च्या (इस्रो) सामरिक गटाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. वाय. एस. राजन यांनी व्यक्त केले.

भारती विद्यापीठ आणि यशवंतराव मोहिते महाविद्यालयातर्फे आयोजित 'सायन्स फिक्शन स्टडीज' या विषयावरील जागतिक परिषदेला हाँगकाँग पॉलिटेक्निक विद्यापीठाच्या डॉ. ख्रिस्टिना डी कर्सी, भारती विद्यापीठाचे डॉ. विश्वजीत कदम उपस्थित होते.

राजन म्हणाले, ''रोजच्या जीवनातील समस्यांकडे पाहण्याच्या विविध वैज्ञानिक दृष्टिकोनांविषयी सामान्य नागरिकांत उत्सुकता निर्माण व्हायला हवी. पण विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था अशा कामांपासून दूर राहतात असे मला दिसले. 'आम्ही सर्वज्ञ आहोत, त्यामुळे सामान्यांना या बाबींची फिकीर करण्याचे कारण नाही' असा यांपैकी बऱ्याच संस्थांचा आविर्भाव असतो. फारच थोडे शास्त्रज्ञ सामान्य नागरिकांपर्यंत विज्ञान-तंत्रज्ञान पोहोचावे असा प्रयत्न करतात. यामुळे विज्ञान आणि देशातील सामान्य जनता यात मोठी दरी निर्माण झाली आहे. विज्ञानविषयक साहित्याचा वाचकवर्ग विस्तारायला हवा. इंग्लिशबरोबरच इतर भारतीय भाषांमध्ये आणि शक्य झाल्यास विविध बोलींमध्येही विज्ञानकथा निर्माण व्हाव्या.''

## ✯ 'चिं. वि. साहित्यातले आणि आठवणीतले' स्मृतिग्रंथाचे प्रकाशन

संध्या बोडस-काणे आणि अलका जोशी-मांडके यांनी संकलित केलेल्या

'चिं. वि. जोशी : साहित्यातले आणि आठवणीतले' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर, बाळ कर्वे, द. मा. मिरासदार यांच्या उपस्थितीत झाले. 'चिमणराव आणि गुंड्याभाऊ' या मालिकेच्या निर्मात्या विजया जोगळेकर-धुमाळ, 'काऊ'ची भूमिका केलेल्या स्मिता पावसकर, 'दूरदर्शन'च्या डॉ. किरण चित्रे यांचाही त्यामध्ये सहभाग होता.

प्रभावळकर म्हणाले, ''दूरदर्शनवरच्या गजरा या कार्यक्रमात 'पंचवीस एके पंचवीस' या माझ्या प्रहसनामुळे चिमणरावाची व्यक्तिरेखा चालून आली. भूमिकेचा विचार करताना मालिकेचा प्रेक्षक हा वाचक असेलच असे नाही; हे लक्षात घेऊन व्यंगचित्रात्मक पद्धतीने उभे केले. चिमणरावांमध्ये दिलीप प्रभावळकरच हरवून गेला होता.''

''वडिलांच्या छबीतून मला गुंड्याभाऊ सापडला. ती भूमिका करताना गुंड्याभाऊचा अंगात जणू संचारच व्हायचा. चिंतेचे लिखाण आजच्या काळातही लागू पडते.''

चिं. विंच्या निधनानंतर आचार्य अत्रे यांनी लिहिलेला मृत्यूपर लेख वाचताना चिमणराव-गुंड्याभाऊंसह प्रेक्षकही गहिवरले. या कार्यक्रमाला शि. द. फडणीस, गणेश मतकरी आदी उपस्थित होते.

## ✯ 'मिळून साऱ्याजणी'चा स्नेहमेळावा

''स्त्रीच्या नजरेतून मला उमजलेला आजचा पुरुष बदलाला सामोरे जाण्यास तयार नाही. तो भाबडा, प्रचंड मत्सरी, महत्त्वाकांक्षी आहे. तो उत्कट आहे; पण सोशिक नाही. तो हुशार आहे; पण शहाणा नाही'' असे मत लेखिका मेघना पेठे यांनी व्यक्त केले.

'मिळून साऱ्याजणी'च्या वार्षिक स्नेहमेळाव्यानिमित्त आयोजित समारंभात पेठे यांनी 'मला उमजलेला पुरुष' या विषयावर; तर शफाअत खान यांनी 'कुटुंबातले पुरुष' या विषयावर रसिकांशी संवाद साधला. सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ, पत्रकार निखिल वागळे, गीताली वि. म. वगैरे या वेळी उपस्थित होते.

पेठे म्हणाल्या, ''अजिबात न बदललेल्या, बदलणाऱ्या आणि बदललेल्या अशा वेगवेगळ्या महिला पाहायला मिळतात. असे चित्र पुरुषांमध्ये दिसत नाही. तो बदलायला तयार नाही. माणूस म्हणून आपण एकमेकांची कदर करीत नाही. ही खरी खंत आहे. स्त्रिया बदलत आहेत. त्या स्वायत्त आहेत. त्यामुळे पुरुषाला वेगवेगळ्या कारणांनी असुरक्षित वाटू लागले आहे. हीच असुरक्षितता हिंसेत रूपांतरित होते. ती सर्वांना दिसण्याच्या पातळीवर आली आहे.''

खान म्हणाले, ''लहानपणापासूनच 'पुरुष' ही गाठ मनाशी बांधली जाते. त्यामुळे आपण त्याच चष्म्यातून जगाकडे पाहतो. स्त्रियाही जेव्हा आक्रमक होतात त्या वेळी स्वत:ला कमी लेखत असतात, असे दिसते; पण स्त्रियांचे शोषण

थांबलेले नाही. त्याच्या पद्धतीत बदल झाला आहे, हेही खरे मानायला हवे.''

### ✯ ग्रंथालयांची पडताळणी

बनावट कागदपत्रे सादर करून राज्य सरकारकडून अनुदान लाटणारी ३५ ग्रंथालये पुणे जिल्ह्यात आढळली. तसेच जिल्ह्यातील ४३४ ग्रंथालयांचा वार्षिक अहवाल वेळेवर आला नाही.

काही महिन्यांपूर्वी राज्य सरकारने विशेष मोहीम हाती घेऊन राज्यातील शासकीय अनुदानित ग्रंथालयांची पडताळणी केली होती. चालू वर्षात ग्रंथालयांच्या मानधनात पन्नास टक्क्यांनी वाढ करण्याची घोषणा केली. मात्र त्यावर मंत्रिमंडळात अंतिम शिक्कामोर्तब झालेले नाही. जिल्हा पातळीवरील अ वर्ग ग्रंथालयासाठी चार लाख ८० हजार, ब गटासाठी दोन लाख ५६ हजार तर तालुका पातळीवरील अ, ब, क गटात मोडणाऱ्या ग्रंथालयासाठी अनुक्रमे दोन लाख ५६ हजार, एक लाख ९२ हजार आणि ९६ हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. पुणे विभागांत येणाऱ्या सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा आणि पुणे जिल्ह्यात मिळून तीन हजार १४५ ग्रंथालये आहेत. यापैकी आतापर्यंत दोन हजार ७११ ग्रंथालयांनी आपला वार्षिक अहवाल ग्रंथालय संचालक विभागाकडे सादर केल्याचे दळवी यांनी सांगितले.

पुणे विभागीय ग्रंथालय संचालकांकडून दरवर्षी १४ कोटींचे अनुदान दिले जाते. त्यापैकी दहा कोटी रुपयांचे अनुदान दिले गेले आहे. अनुदान मिळत असल्याने ग्रंथालयांची संख्या वाढत आहे. मात्र काही ठिकाणी ग्रंथालयांचा मनमानी कारभार सुरू असल्याचे समोर आले आहे.


### ✯ फलटण येथील विठ्ठल ठोंबरे यांचे संशोधन

बालपणी रानोमाळ मेंढ्यांमागे फिरणाऱ्या विठ्ठल ठोंबरे यांनी लिहिलेल्या 'भारतीय लोकदैवत खंडोबाविषयक साहित्याचा चिकित्सक अभ्यास' या प्रबंधाला पुणे विद्यापीठाने 'पीएच. डी.' प्रदान केली आहे. तेरा वर्षे संशोधन त्यांचे चालू होते.

फलटण तालुक्यातल्या दुधेबावीच्या विठोबाच्या नशिबी लहानपणीच अनाथपण आले. वयाच्या सातव्या वर्षी आई गेली, तर चौदाव्या वर्षी वडील गेले. मेंढ्या चरायला नेण्याचे कामही शाळा सांभाळून करणे भाग पडले. बारावी पूर्ण करून त्याने पुणे गाठले. 'ऑफिसबॉय' ते मालिकांच्या शूटिंगचा 'स्पॉट बॉय' अशी कामे करीत त्याने टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची पदवी 'बहिस्थ' पद्धतीने मिळवली. एका औषध कंपनीत 'सेल्स रिप्रेझेंटेटिव्ह'ची नोकरी मिळाली. तर बालपणापासून मनात वसलेल्या व कठीण क्षणात सोबतीला असणाऱ्या 'खंडोबा'ची हाक त्याला ऐकू यायला लागली. खंडोबाच्या आख्यायिकांपासून जीर्ण पोथ्यांतून महाराष्ट्राबाहेरील

कर्नाटक, आंध्र, केरळ, मध्य प्रदेशापर्यंत ‘खंडोबा’चा मागोवा घेत संशोधन सुरू झाले.

पुण्याच्या सरस्वती मंदिर रात्र महाविद्यालयाच्या मराठी विभागप्रमुख डॉ. कल्याणी हर्डीकर यांचे मार्गदर्शन, तेरा-चौदा वर्षांचा संशोधनकाल व साडेसात लाख रुपयांचा खर्च या दृष्टीने हा प्रकल्प वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. परीक्षण समितीनेही यातल्या संशोधन पद्धतीबद्दल गौरवोद्गार काढले आहेत. या प्रबंधात भर घालून ‘कुलदैवत खंडोबा’ हा ग्रंथ प्रकाशित होणार आहे. विलास पडवळ, ॲड. वसंत बरकडे,


**१३ वी आवृत्ती**

# हृदयविकार निवारण

**शुभदा गोगटे**

**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**

Heart Attack!! हार्ट अटॅक–
हृदयझटका म्हणजे यमदूतानं दारावर केलेली टकटक्, अशी समजूत आजपर्यंत होती; आणि ती फारशी चुकीचीही नव्हती. वेगवेगळ्या दुखण्यांनी किंवा आजारांनी दरवर्षी घडणाऱ्या एकूण मृत्यूंमध्ये हृदयविकारानं मृत्यू पावणाऱ्यांची संख्या सर्वांत जास्त असते. पण आता या यमदूताला दारातच थोपवणं, एवढंच नव्हे, तर चार पावलं मागं पाठवणंही शक्य आहे, असं सांगणारं हे पुस्तक आहे. हृदयविकार कमी करण्यासाठी काय करावं, हृदयरुग्णांची जीवनशैली कशी असावी, हे तर यात आहेच, त्याच्या जोडीला हृदयाला पथ्यकर अशा अनेक पाककृतीही दिलेल्या आहेत.

हृदयविकार कमी होऊ शकतो, हे प्रथम अमेरिकन हृदयतज्ज्ञ डॉ.डीन ऑर्निश यांनी प्रयोगांनी सिद्ध केलं. त्यांच्या कार्यक्रमाशी मिळताजुळता पण भारतीय परिस्थितीत उपयुक्त ठरणारा उपक्रम पुण्यात डॉ. जगदीश हिरेमठ चालवत आहेत. अनेक हृदयरुग्णांनी त्यांच्या या कार्यक्रमाचा लाभ घेतलेला आहे. या दोन्ही तज्ज्ञ डॉक्टरांच्या कार्यक्रमाची माहिती पुस्तकात आहे.

डॉ. बजरंग कोरडे या सन्मित्रांनी त्यांची पाठराखण केली.

## ✯ जयपूर लिटरेचर फेस्टिव्हल

गेल्या वर्षी सलमान रश्दी यांना सहभागी होऊ न दिल्यामुळे वादग्रस्त झालेला जयपूर लिटरेचर फेस्टिव्हल यंदा कडक सुरक्षाव्यवस्थेत पार पडला. लेखकांना स्वतंत्र अवकाश असावे आणि त्यांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य जपले जावे, अशा भावना त्यात प्रकट झाल्या.

मॅगसेसे पुरस्कार विजेत्या बंगाली लेखिका आणि मानवाधिकार कार्यकर्त्या महाश्वेतादेवी यांच्या भाषणाने या फेस्टिव्हलचे उद्घाटन झाले. 'स्वप्न पाहणे हा माणसाचा मूलभूत अधिकार असायला हवा. माझ्या आयुष्याचे आणि साहित्याचे तेच स्वप्न आहे, तोच लढा आहे,' असे त्यांनी सांगितले.

जयपूर लिटरेचर फेस्टिव्हलचे यंदाचे आठवे वर्ष आहे. मुस्लिम आणि उजव्या विचारसरणीच्या हिंदुत्ववादी संघटनांकडून वेगवेगळे मुद्दे उपस्थित केले गेले की, 'आम्ही सर्व प्रकारच्या दहशतवादाच्या विरोधात आहोत. कोणाचीही दादागिरी खपवून घेणार नाही. आपल्या देशाची घटना अत्यंत उत्तम असून आम्ही तिच्या तत्त्वांशी प्रामाणिक राहणार आहोत,' लेखक कोणाच्या लांगूलचालनासाठी लिहित नसतात. आपण त्यांना लेखनांसाठी स्वतंत्र अवकाश द्यायला हवे,' असेही रश्दी त्यांनी सांगितले.

## ✯ भारतात सांस्कृतिक आणीबाणी

भारतात नवी सांस्कृतिक आणीबाणी उदयास येत असून, लेखक, चित्रकार, चित्रपट कलावंत यांना 'सॉफ्ट टार्गेट' केले जात आहे, अशी खंत प्रसिद्ध लेखक सलमान रश्दी यांनी व्यक्त केली.

भारतात १९७५-१९७७ च्या दरम्यान लावण्यात आलेल्या राजकीय आणीबाणीचा संदर्भ देऊन रश्दी म्हणाले, 'सध्या संस्कृती हे नवे लक्ष्य झालेले दिसत आहे. कारण लेखक, चित्रकार, चित्रपट कलावंत किंवा अन्य कलाकारांकडे सैन्य नसते. आम्ही आमच्या संरक्षणासाठी रस्त्यांवर मुले उतरवू शकत नाही. त्यामुळे कलावंतांवर हल्ला करणे सोपे आहे.'

'द सॅटॅनिक व्हर्सेस' या कादंबरीमुळे वादग्रस्त ठरलेले रश्दी पुढे म्हणाले, 'सरकार कलाकारांचे संरक्षण करीत नाही, हे दुर्दैव आहे. सध्या अस्मितेच्या राजकारणाचा एक विचित्र प्रकार विकसित झाला आहे. त्यात लोक त्यांना काय आवडते, यापेक्षा ते कशाचा तिरस्कार करतात यावर भर देतात. त्यामुळे रामायणावरील पुस्तकावर, शिवाजी महाराजांवरील पुस्तकावर किंवा सरस्वतीच्या चित्रावर... हल्ला करणे खूप सोपे झाले आहे. हे हल्ले केल्याने असे अस्मितावादी राजकारण

करणाऱ्या अतिरेकी गटांना त्यांची अस्मिता कुरवाळणे सोपे जाते. आपल्या दुर्दैवाने सरकार कलाकारांचा अभिव्यक्तीचा हक्क मान्य करण्याऐवजी त्यांनाच दोष देते.'

### ✯ 'फेसबुक'ची नवी 'सर्च क्रांती'

एखाद्या गोष्टीची सवय झाली, की नवे काही स्वीकारायला आपले मन तयार होत नाही. इंटरनेटवर सर्च इंजिनचा वापर करण्याच्या झालेल्या सवयीमुळे दुसऱ्या कुठल्या प्रकारे एखादी गोष्ट शोधता येईल, याचा विचारही फारसा कुणाच्या मनाला शिवत नसेल. आपल्याला जे सर्च करायचे आहे, तो शब्द टाइप करून संबंधित वेबसाइटच्या लिंकवर जायचे आणि हवी ती माहिती घ्यायची, असे साधारण आपल्याला माहीत असलेले 'सर्च'चे स्वरूप आहे. पण, 'फेसबुक'ने या सर्च संकल्पनेला फाटा देत 'ग्राफ सर्च' असे नवे टूल फेसबुकने लांच केले आहे. असे 'फेसबुक'चे सहसंस्थापक आणि मुख्य अधिकारी मार्क झुकेरबर्ग यांनी सांगितले. 'ग्राफ सर्च'द्वारे सोशल नेटवर्कमध्ये सर्च करता येणार आहे. फेसबुकवर कुठलीही माहिती शोधण्यासाठी अत्यंत नव्या पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. व्यक्ती, ठिकाणे, फोटो आणि त्यांना जे आवडेल, ते सर्व करता येईल. 'हॉटेल' म्हणून सर्च दिल्यावर आपल्याला संबंधित हॉटेलचे डिटेल्स मिळतील.


### ✯ ब्रिटिशर्स फेसबुकला कंटाळले?

सोशलबेकर या अमेरिकन वेबसाइटने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार भारतात सध्या फेसबुकचे सहा कोटी २७ लाख युजर्स असून, एकूण लोकसंख्येच्या तुलनेत त्यांचे प्रमाण केवळ ५.३५ टक्के आहे. त्या तुलनेत अमेरिका (५३.९७ टक्के), ब्रिटन (५२.६५ टक्के), तुर्कस्तान (४१.५९ टक्के) मेक्सिको (३५.५१ टक्के) या देशांत लोकसंख्येच्या प्रमाणात फेसबुक युजर्स जास्त आहेत. सर्वाधिक युजर्सचा विचार करता अमेरिका (१६ कोटी ७४ लाख) आघाडीवर असून त्या पाठोपाठ ब्राझील (सहा कोटी ५२ लाख) आणि भारत यांचा क्रमांक लागतो. याच ठिकाणी नमूद केल्याप्रमाणे डिसेंबरअखेर ब्रिटनमध्ये फेसबुकचे तीन कोटी २८ लाख युजर्स होते. गेल्या महिन्यात त्यातील नऊ लाख ४६ हजार युजर्स कमी झाले. नोव्हेंबरच्या तुलनेत त्यांची संख्या २.८८ टक्क्यांनी कमी झाली; तर अमेरिकेत ०.६९ टक्के आणि इंडोनेशियामध्ये ०.६१ टक्के युजर्स घटले. त्याच वेळी ब्राझीलमध्ये ३.१८ टक्के, तर भारतात २.४७ टक्के आणि तुर्कस्तानामध्ये ०.९८ टक्के युजर्स वाढले. 'सोशलबेकर'चे सीइओ जन रेझाब यांच्या म्हणण्याप्रमाणे ब्रिटनमधील १५ टक्के नागरिक १३ वर्षाखालील आहेत. त्यांना फेसबुक लॉग-इन करण्याची परवानगी नाही. तसेच ६५ पेक्षा अधिक वय असणारे साडेसोळा टक्के नागरिक असून, त्यातील केवळ चार टक्के व्यक्ती फेसबुकचा वापर करतात.

युजर्सची संख्या कमी होण्यामागे फेसबुकवरील माहितीच्या प्रायव्हसीसंदर्भात असलेला गोंधळ किंवा फेसबुकचा आलेला कंटाळा या गोष्टीदेखील असतील, अशी शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. फेसबुकच्या प्रवक्त्यांनी मात्र ही बाब फेटाळलेली आहे.

### ✯ फर्स्ट वर्ल्ड पोएट्री कॉन्फरन्स

इंटरनॅशनल ह्युमन रिसर्च जस्टिस फेडरेशनतर्फे मार्च २०१३ मध्ये पुण्यात फर्स्ट वर्ल्ड पोएट्री कॉन्फरन्स आयोजित करण्यात आली. या कॉन्फरन्सच्या अध्यक्षपदी डॉ. मधुसूदन घाणेकर होते. डॉ. घाणेकर हे गेली ४० वर्षे काव्यक्षेत्रात कार्यरत असून त्यांचे आत्तापर्यंत३४ कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. दोन वर्षांपूर्वी डॉ. घाणेकर यांना मुंबईत झालेला पहिल्या विश्वसाहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्याचा मान प्राप्त झाला होता. त्यांची २१५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. साहित्य, एकपात्री कार्यक्रम, चित्रपट, हस्ताक्षर, मनोविश्लेषण, गीत-गझल लेखन,


४ थी आवृत्ती

**चार शब्द द्यावे-घ्यावे**

**संजीव परळीकर**

**किंमत : ७०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**

आपल्या अंगातली हुशारी दाखवायची असेल तर संभाषण हे करावंच लागतं. ज्याला संभाषणातून सुसंवाद साधता येतो, तोच खरा कर्तबगार ठरतो. वरिष्ठ त्याच्याच बाजूनं कौल देतात. सहकारी त्याच्याच बाजूनं उभे राहातात. आप्तेष्ट त्याचंच ऐकतात. ग्राहक अशाच व्यापाऱ्याची भरभराट करतात. ह्याचा अर्थ सगळ्यांची हांजी हांजी करायची असा नाही, तर चार शब्द देताना आणि घेताना थोडीशी काळजी घ्यायची. ती आपल्याला कशा प्रकारे घेता येईल, ह्याबद्दलचे अनुभव तुम्ही वाचलेत तर तुम्हालाही ते नक्कीच उपयोगी पडतील.

ज्योतिष, संपादन, व्यंगचित्रे आदि विविध क्षेत्रात घाणेकर यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

लाफ इंटरनॅशनल, फ्रेन्डस इंटरनॅशनल, साहित्य गौरव या संस्थांचे ते संस्थापक अध्यक्ष असून ब्रह्मध्यान विद्यापीठ, विश्वहास्य विद्यापीठ, अथर्व ज्योतिष विद्यापीठाचे कुलपती आहेत. त्यांच्या सबकुछ मधुसूदन या एकपात्री कार्यक्रमाचे बरेच प्रयोग झाले असून त्यांच्या नावावर ७ लिम्का बुक रेकॉर्डस् आहेत.

### ✯ वारकरी संगीत संमेलनाध्यक्षपदी पं. यादवराज फड

संगीतोन्मेष संस्थेच्या वतीने भरविण्यात येणाऱ्या ७व्या अखिल भारतीय वारकरी संगीत संमेलनाच्या अध्यक्षपदी वारकरी संगीत परंपरेचे अभ्यासक पं. यादवराज फड, स्वागताध्यक्षपदी बाबा धुमाळ तर कार्याध्यक्षपदी भिकुलाल हिरावत यांची निवड झाली आहे. हे संमेलन २८ फेब्रुवारी ते ३ मार्च असे तीन दिवस शनिवारवाडा येथे भरणार आहे. संमेलनात राज्यातील कलाकारांबरोबरच गोवा, राजस्थान, तामिळनाडू इ. राज्यातील कलाकार सहभागी होणार असल्याची माहिती संस्थेचे कार्याध्यक्ष सुनील पासलकर यांनी दिली.

### ✯ संस्कृत विद्यापीठाच्या कुलगुरूपदी डॉ. उमा वैद्य

रामटेक येथील कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. उमा चंद्रशेखर वैद्य यांची निवड करण्यात आली आहे.

कुलगुरु डॉ. पंकज चांदे यांचा कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर राज्यपाल के. शंकरनारायण यांनी डॉ. वैद्य यांच्या नावाची घोषणा केली. डॉ. वैद्य मुंबई विद्यापीठात संस्कृत विभागाच्या प्रमुख म्हणून कार्यरत होत्या. गुरुदेव टागोर तुलनात्मक साहित्य अध्यासनाचे प्रमुखपदही त्यांनी भूषविले आहे.

१९७४ साली त्यांनी प्रथम श्रेणीत पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले.

मुंबई विद्यापीठातून १९७९ साली त्यांनी संस्कृत मध्ये पीएचडी मिळविली. विल्सन महाविद्यालयात विभागप्रमुख म्हणून काम केल्यानंतर त्या विद्यापीठात रुजू झाल्या. डॉ. वैद्य यांना अध्यापन, प्रशासन आणि संशोधन क्षेत्रातील दीर्घ अनुभव आहे. त्यांच्या नावावर ७३ संशोधन प्रबंध आहेत.

''संपूर्णपणे संस्कृत विषयासाठी वाहिलेले हे राज्यातील एकमेव विद्यापीठ आहे. त्यामुळे, आजवरचा अध्ययनातील, अध्यापनातील माझा संशोधनातील अनुभव वापरून संस्कृतसाठी भरीव काम करण्याचा माझा प्रयत्न असेल,'' असे त्यांनी सांगितले.

### ✯ 'अक्षरवाङ्मय'चा जागतिक प्रायोगिक नाटक विशेषांक

देश-विदेशातील रंगभूमीवर काम करणाऱ्या दिग्दर्शक– अभिनेत्यांचे विचार,

त्यांच्यापैकी काहींच्या विस्तृत मुलाखती अशा स्वरूपात भारतीय आणि जागतिक स्तरावरील प्रायोगिक नाटकांचा वेध घेणारा सव्वाचारशे पानांचा 'अक्षरवाङ्मय'चा अंक नुकताच प्रसिद्ध करण्यात आला आहे. मूळचे उदगीरचे असलेले आणि सध्या अमेरिकेतील स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीत व्हिजिटिंग स्कॉलर म्हणून काम करणारे डॉ. अरुण प्रभुणे या विशेषांकाचे अतिथी संपादक आहेत.

'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'चे माजी संचालक देवेंद्रराज अंकुर, रामदास भटकळ, चंद्रकांत देशपांडे, नीरजा पटवर्धन, प्रभाकर भावे, प्रसाद वनारसे, वसुधा सहस्रबुद्धे, डॉ. डी. एस. चौगुले, डॉ. अजय जोशी, गीतांजली कुलकर्णी यांच्या लेखांचा यात समावेश आहे. अरुण काकडे, अच्युत वझे आणि प्रतिमा कुलकर्णी यांच्या मुलाखतीही यात आहेत. अमेरिका, लंडन, डेन्मार्क, जपान आणि नायजेरिया या देशांतील कलावंत, दिग्दर्शक, समीक्षक आणि नाट्यअभ्यासक यांचेही लेख आणि मुलाखती यांचा समावेश या विशेषांकात करण्यात आला आहे.

### ✯ नागपूर येथे 'लिहित्या स्त्रियांची कार्यशाळा'

अनेकींना लिहायला मनापासून आवडतं... किंबहुना आपल्या मनातल्या भावना, विचार शब्दबद्ध करावेत, त्यांना वाचक मिळावेत, आपले विचार, आपले लेखन लोकांनाही आवडावं, त्यावर चर्चा व्हावी, अशी अनेकींची इच्छा असते, पण... हा पणच आडवा येतो. लिहिल्या स्त्रीचा हात अनेक ठिकाणी अडखळतो. कसं लिहायचं, नेमकं काय लिहायचं, आपण लिहू ते बरोबरच कशावरून, बरोबर असलं तरी छापणार कोण, अशी स्वत:चीच स्वत:वर लादलेली सेन्सॉरशिप कितीदा तरी या लिहित्या स्त्रियांचे शब्द डोक्यात जिरवून टाकते आणि लिहायचं राहूनच जातं. त्या लिहू इच्छिणाऱ्या, लिहित्या लेखिकांसाठी, लिहित्या स्त्रियांची कार्यशाळा नागपूरमध्ये पार पडली. यासाठी नागपूर, कोल्हापूर, दिग्रस, वर्धा, वाशिम इथूनही अनेक जणी आल्या होत्या. या कार्यशाळेची मूळ संकल्पना 'आकांक्षा' मासिकाच्या प्रकाशक अरुणा सबाने यांची होती. ती 'क्लिक' झाली आणि ज्येष्ठ कनिष्ठ साहित्यप्रेमी स्त्रिया कामाला लागल्या. नागपूरच्या 'आकांक्षा प्रकाशन' आणि 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान'च्या विभागीय केंद्राच्या एकत्रित प्रयत्नांतून संपन्न झालेल्या या कार्यशाळेसाठी ना वयाची अट होती, ना अन्य कसली. त्यामुळे उत्तम उपस्थिती लाभली.

या कार्यशाळेची संकल्पना प्रसिद्ध कादंबरीकार आशा बगे यांनी उलगडून दाखवली. ''या कार्यशाळेने लिहित्या स्त्रियांच्या सुप्त गुणांना चालना देण्याची मोठी जबाबदारी पार पाडली.'' असं सांगून, जुन्या पिढीतील अनेक स्त्रियांची, ज्यांनी प्रत्यक्ष नसेल लिहिलं, पण ज्यांच्यात लिहिण्याची ऊर्मी होती, प्रचंड ऊर्जा होती, खूप सारं लिहायचं होतं, स्वत:च्या स्वानुभवातून व्यक्त व्हायचं होतं. अक्षरज्ञान

नसल्याने लिहायचं राहून गेलं. केवळ मौखिकरीत्या ते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला संक्रमित झालं. अशा अक्षररूप देऊ न शकलेल्या अनेकींची उदाहरणे त्यांनी दिली. स्त्रियांना कादंबरी, कथा, कविता, नाटकाचं तंत्र सांगून स्त्रियांना एकदम लिहिण्यासाठी तयार करायचं असा कार्यशाळेचा हेतू नव्हता. स्त्रियांनी व्यक्त व्हावं, स्वत:मधल्या लिखाणाच्या गुणाला नीट पारखावं, हा एक प्रमुख संदर्भ त्यामागं होता. म्हणजे एकमेकींची ओळख करून देण्यातून, कवितेच्या सादरीकरणातून, संचालन व स्वागत करण्यातून आत्मविश्वास मिळवलेल्या महिला सुखावलेल्या दिसल्या.

## ✯ 'श्यामची आई' हे पुस्तक म्हणजे बालसंस्काराचे विद्यापीठच




साने गुरुजी यांनी नाशिकच्या कारागृहात असताना श्यामची आई या पुस्तकाच्या लेखनाला ९ फेब्रुवारी १९३३ रोजी आरंभ केला. त्या घटनेला ८०वर्षे पूर्ण झाली. आपल्या लहानपणाच्या सात्विक भावनांचा कसा विकास होत गेला हे साने गुरुजींनी मार्मिकपणे आणि अंत:करण हेलावून टाकेल, अशा सहृदयतेने सांगितले आहे. यामध्ये बाापणीच्या जीवनकथेपेक्षाही मातेचा महिमा हे मध्यवर्ती सूत्र आहे.

या पुस्तकाच्या ४२ पैकी ३६ भाग गुरुजींनी नाशिक येथील तुरुंगामध्ये लिहिले. उर्वरित भाग तुरुंगातून बाहेर आल्यानंतर लिहिले. या पुस्तकावरच आचार्य अत्रे यांनी चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटाला राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले. साने गुरुजी यांनी पुणे विद्यार्थी गृह संस्थेला या पुस्तकाच्या प्रकाशनाचे हक्क दिले होते.

स्वामीत्व हक्काच्या कायद्यानुसार एखाद्या लेखकाच्या निधनाला ६० वर्षे पूर्ण झाल्यावर त्या पुस्तकावरील हक्क संपुष्टात येतो. त्यानुसार आता पुणे विद्यार्थी गृह या संस्थेबरोबरच वरदा प्रकाशन, अजब, सरस्वती ग्रंथ भांडार यांनीही नवीन आवृत्त्या बाजारामध्ये आणल्या आहेत. जवळपास प्रत्येक मराठी घरामध्ये पोहोचलेल्या या पुस्तकाची मोहिनी ८० वर्षांनंतरही कायम असल्याची प्रचिती या पुस्तकाच्या खपावरून येते.

◈




### ✤ महाराष्ट्राला ६ पद्मभूषण तर १९ पद्मश्री

चित्रकार हैदर रझा, प्रसिद्ध शास्त्रज्ञ प्रा. यशपाल यांना पद्मविभूषण, तर कविवर्य मंगेश पाडगावकर, दिवंगत सुपरस्टार राजेश खन्ना, अभिनेत्री शर्मिला टागोर, क्रिकेटपटू राहुल द्रविड, ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती मेरी कॉम यांच्यासह शिवाजीराव गिरीधर पाटील, डॉ. कनक रेळे, उद्योगपती आदि गोदरेज, डॉ. नंदकुमार लाड यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. चित्रपट अभिनेता नाना पाटेकर, श्रीदेवी, जयमाला शिलेदार, सुरेश तळवलकर, सुधा मल्होत्रा, रमेश सिप्पी, नीलिमा मिश्रा, मिलिंद कांबळे, कल्पना सरोज, डॉ. राजेंद्र अच्युत बडवे यांच्यासह महाराष्ट्रातील १९ मान्यवरांना पद्मश्री पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी चार पद्मविभूषण, २४ पद्मभूषण आणि ८० पद्मश्री अशा एकूण १०८ पद्म पुरस्कारांना मंजुरी दिली. पद्म पुरस्कारांच्या यादीत २४ महिलांचा समावेश असून, ११ पुरस्कार विदेशी नागरिक, अनिवासी भारतीय ११ पुरस्कार विदेशी नागरिक, अनिवासी भारतीय वंशाचे विदेशी नागरिक आणि मरणोत्तर या विभागात देण्यात आले आहेत, पद्म पुरस्कारांचे वितरण मार्च आणि एप्रिल महिन्यात होईल.

### महाराष्ट्रातील मानकरी

**पद्मभूषण :** डॉ. श्रीमती कनक रेळे, स्व. राजेश खन्ना (कला), शिवाजीराव गिरीधर पाटील (सार्वजनिक जीवन), आदि गोदरेज (व्यापार व उद्योग), डॉ. नंदकुमार लाड (औषधशास्त्र), मंगेश पाडगावकर (साहित्य आणि शिक्षण),

**पद्मश्री :** श्रीदेवी, ब्रह्मदेव पंडित, नाना पाटेकर, जयमाला शिलेदार, सुरेश तळवलकर, अपूर्व किशोर बीर, सुधा मल्होत्रा, रमेश सिप्पी, माहरुख तारापोर (कला). नीलिमा मिश्रा (समाजकार्य), मुस्तनसीर बर्मा, प्रा. दीपक फाटक, शरद पांडुरंग

काळे, कल्पना सरोज (व्यापार आणि उद्योग), डॉ. राजेंद्र अच्युत बर्वे, डॉ. अमित मायदेव, डॉ. सुंदरम नटराजन (औषधशास्त्र) नांगोम डिंको सिंह (क्रीडा).

### ❖ डॉ. भालचंद्र नेमाडे यांना 'जनस्थान' पुरस्कार

पाश्चात्त्य वृत्ति-प्रवृत्तींना नकार देत 'देशीवादी' भूमिका घेणारे आणि 'कोसला', 'बिढार', 'जरीला', 'झूल', 'हूल', 'हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ' या गाजलेल्या कादंबऱ्यांचे लेखक भालचंद्र नेमाडे यांना कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या वतीने यंदाचा 'जनस्थान' पुरस्कार कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी म्हणजे २७ फेब्रुवारी रोजी नाशिक येथे हा पुरस्कार प्रदान केला गेला. एक लाख रुपये, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

यंदाचा हा बारावा जनस्थान पुरस्कार असून आतापर्यंत विजय तेंडुलकर, विंदा करंदीकर, इंदिरा संत, गंगाधर गाडगीळ, व्यंकटेश माडगूळकर, श्री. ना. पेंडसे, मंगेश पाडगावकर, नारायण सुर्वे, बाबुराव बागूल, ना. धों. महानोर, महेश एलकुंचवार हे मान्यवर साहित्यिक या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

### ❖ इला भट्ट यांना इंदिरा गांधी पुरस्कार

सामाजिक कार्यकर्त्या इला रमेश भट्ट यांना राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते शांतता, निःशस्त्रीकरण आणि विकासासाठी देण्यात येणारा इंदिरा गांधी पुरस्कार प्रदान करण्यात आला. राष्ट्रपती भवनात पुरस्कार प्रदान कार्यक्रम झाला. यावेळी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग, काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी उपस्थित होत्या. सेल्फ एम्प्लॉयमेंट वुमेन्स असोसिएशनच्या संस्थापक इला भट्ट यांनी महिला सक्षमीकरणासाठी दिलेल्या योगदानाबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. २५ लाख रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्काराला उत्तर देताना इला भट्ट म्हणाल्या, ''या पुरस्कारामुळे शांततेसाठीच्या नव्या कल्पना सुचण्यास मदत होणार आहे. निःपक्ष आणि उत्पादक समाजासाठी शांतता ही पूर्वअट आहे. शांततेमुळे सामाजिक समतोल पुन्हा निर्माण करणे शक्य आहे.''

### ❖ सुधा मूर्ती यांना राष्ट्रीय चारित्र्य पुरस्कार प्रदान

''पुण्याबद्दल माझ्या मनात कायम वेगळे स्थान राहिले आहे. हे शहर म्हणजे जणू माझे माहेरच आहे,'' अशा भावना व्यक्त करत पद्मश्री डॉ. सुधा मूर्ती यांनी २० जानेवारी रोजी जुन्या आठवणींना उजाळा दिला. राष्ट्रीय चारित्र्य पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला राज्याच्या निवडणूक आयुक्त श्रीमती नीला सत्यनारायण, परराष्ट्र मंत्रालयातील अप्पर सचिव निनाद देशपांडे, नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित कुमार, पुणे पीपल्स बँकेचे अध्यक्ष

विजयकांत कोठारी, चारित्र्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेश मेहता उपस्थित होते.

''आमच्या इन्फोसिस कंपनीची स्थापना पुण्यातच झाली. कुंटे चौक आणि लक्ष्मी रोडची आठवण आजही ताजी आहे. नीलायम, डेक्कन, प्रभात, लक्ष्मीनारायण टॉकीजमध्ये आम्ही चित्रपट पाहिले आहेत. त्यामुळे पुण्यात आल्यावर माहेरी आल्यासारखे वाटते. आपल्या माणसांनी केलेल कौतुक मला महत्त्वाचे वाटते,'' असे मूर्ती यांनी सांगितले. ''छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी मला कायम आदर वाटतो. शिवाजी महाराजांचे सुरत येथे काढलेले चित्र आणि त्यांची वाघनखे ब्रिटिश संग्रहालयात पाहायला मिळाली,'' अशी आठवणही त्यांनी यावेळी सांगितली. ''तुमच्या मातृभाषेवर, संस्कृतीवर आणि देशावर प्रेम करा,'' असे त्यांनी सांगितले. माझे लेखन सर्वसामान्यांसाठी आहे. आतापर्यंत मी कानडी आणि इंग्रजी भाषेतच लेखन केले आहे, मराठीमध्ये नाही. पण तरीही माझे सर्वाधिक वाचक मराठीत आहेत. महाराष्ट्रात माझ्या पुस्तकांच्या दोन लाखांहून अधिक प्रतींची विक्री झाली आहे. सर्वाधिक रॉयल्टी मला महाराष्ट्रातून मिळाली आहे. असे सांगून अनिल व सुनील मेहता या पितापुत्राचा त्यांनी खास गौरव केला.

## ❖ पं. रविशंकर यांना मरणोत्तर ग्रॅमी

प्रख्यात सतारवादक पं. रविशंकर यांच्या निधनानंतर ६० दिवसांनी त्यांना ग्रॅमी सोहळ्यात जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. रविशंकर यांच्या दोन्ही कन्यांनी संयुक्तरीत्या हा पुरस्कार स्वीकारला.

''जगात शांतता निर्माण करण्याची शक्ती संगीतात आहे, असे माझे वडील म्हणत; कारण सर्वसामान्य लोकांच्या जाणिवा जागृत करण्याचे सामर्थ्य संगीतात आहे. असे ते मानत. त्यांना सतार वाजवताना जेव्हा मी पाहत असे तेव्हा लोक चिंतनात मग्न होत.'' असे त्यांची कन्या अनुष्का म्हणाली. ''ते फार मोठे संगीतकार होते. ते संगीतावरच जगले; त्यांच्या श्वासात संगीत होते,'' असे नोरा ही दुसरी कन्या म्हणाली.

अनुष्का स्वत: सतारवादक आहे, तर नोरा गायक आणि गीतकार आहे. ११ डिसेंबर २०११ रोजी रविशंकर यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झाले होते. हा सन्मान स्वीकारताना त्यांना अतिशय आनंद झाला असता. आम्हाला त्यांची फार आठवण येते, असे ९ वेळा ग्रॅमी पुरस्कार मिळविणाऱ्या नोराने सांगितले.

## ❖ गौरी शिंदे यांना सिम्बायोसिस सांस्कृतिक पुरस्कार

आपल्या आईची कथा 'इंग्लिश-विंग्लिश' मध्ये मांडणारी दिग्दर्शिका गौरी शिंदे हिला 'सिम्बायोसिस सांस्कृतिक पुरस्कार' अभिनेते अमोल पालेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ''हिंदी चित्रपटसृष्टीत स्त्रियांचे योगदान मोठे आहे. त्यांच्या कर्तृत्वाला आपण भरभरून दाद द्यायला हवी; पण पुरुषप्रधान व्यवस्थेत हे

होत नाही. स्त्री-दिग्दर्शकांना मानाचे स्थान मिळात नाही.'' अशी खंत व्यक्त करीत पालेकर म्हणाले, ''चित्रपटसृष्टीत अपर्णा सेन, सई परांजपे, झोया अख्तर अशी नावे अपवादानेच घेतली जातात. चित्रपटसुद्धा नायकप्रधान असतात. त्यामुळे नायिकेला गृहीत धरले जाते. अशा स्थितीत नायिकेला मध्यवर्ती स्थान देऊन चित्रपट काढण्याचे धाडस 'इंग्लिश-विंग्लिश'च्या निमित्ताने झाले. 'मुलगा मुलीला भेटला' असेच चित्रपट आपण वेगवेगळ्या पद्धतीने करत आहोत. वेगळेपणाची वाट चोखाळली तरच आपले आयुष्य ताजे, रसरशीत, जिवंत, अर्थपूर्ण राहील.''

श्रीदेवी नावाचा हा धागा मला व गौराला जोडणारा आहे, असे सांगून पालेकर म्हणाले, ''तमीळ चित्रपटातून श्रीदेवी चित्रपटक्षेत्रात आली. ही तिची पहिली इनिंग. तिचा 'सोलवाँ सावन' हा पहिला हिंदी चित्रपट माझ्यासोबत आला, ती दुसरी इनिंग. जितेंद्रसोबत तिचे चित्रपट आले आणि पुढे तिने भरारी घेतली. ही तिची तिसरी इनिंग. नुकताच गौरीसोबत आलेला 'इंग्लिश-विंग्लिश' ही श्रीदेवीची चौथी इनिंग.''

''इथेच सिम्बायसिसच्या कँटीनमध्ये बसून मी टाइमपास करीत असे आणि आज इथेच मला पुरस्कार मिळतोय, याचा आनंद अवर्णनीय आहे. शिक्षणात असे स्वातंत्र्य मिळाले तरच मनाप्रमाणे काहीतरी वेगळे करून दाखवता येते,'' असे गौरी शिंदे हिने सांगितले.

## ✤ राजेन्द्र बनहट्टी पुरस्कार

वाचनसंस्कृती विसरायला लावणारा समाज इडियट बॉक्स आणि चॅनल्स यांच्या माध्यमातून निर्माण होत आहे, अशी खंत ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर यांनी व्यक्त केली. पुणे मराठी ग्रंथालयातर्फे 'साहित्यिक राजेंद्र बनहट्टी कथा पुरस्कार' लेखिका मृणालिनी चितळे यांना प्रदान करण्यात आला. पाच हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. सुरेश पळसोदकर, नंदकुमार खेडकर, प्रतिभा पटवर्धन, सुहास नातू आदी या वेळी उपस्थित होते. ''पुणे मराठी ग्रंथालयासारख्या संस्था या समाजाचे सांस्कृतिक आरोग्य जपत असतात. मात्र, सत्तरच्या दशकापर्यंत टिकलेली वाचनसंस्कृती सध्या विसरायला लावण्याचे काम क्षीण होत आहे,'' असेही नायगावकर म्हणाले.

'कथालेखनांतून नातेसंबंधांचा शोध घेता येतो. त्याने जाणीवा समृद्ध होतात.'' अशी भावना चितळे यांनी व्यक्त केली. 'मी हाडाचा वाचक असून इडियट बॉक्सच्या कृपेनेच सेलिब्रेटी झालो, असे सांगत नायगावकरांनी आपल्या खास शैलीत उपस्थितांना हसवत ठेवले.

## ✤ 'एफटीआयआय'च्या पीयूष शहाला पुरस्कार

पुणे येथील राष्ट्रीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेत (एफटीआयआय)

साउंड रेकॉर्डिस्टचे शिक्षण घेणाऱ्या पीयूष शहा या विद्यार्थ्याने 'एलए-इंडिया ऑनलाइन शॉर्ट-फिल्म स्पर्धे'चे विजेतेपद पटकाविले आहे. या स्पर्धेतील यशामुळे पीयूषला फॉक्स स्टार स्टुडिओ आणि डिस्ने-युटीव्ही या जगद्विख्यात स्टुडिओमध्ये काम करण्याची संधी मिळाली आहे.

भारत आणि लॉस एंजेलिस येथील विद्यार्थ्यांना आपल्या कलाकृती सादर करता याव्या म्हणून गेल्या तीन वर्षांपासून ही स्पर्धा घेण्यात येते. लॉस एंजेलिसमधील तज्ज्ञ या स्पर्धेचे परीक्षक असतात. पीयूषने बनविलेल्या 'लूप्स' या चित्रपटासाठी त्याला ॲवॉर्ड देण्यात आले.

## ❖ विनोद मेहता यांना राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार

केसरीचे विश्वस्त संपादक डॉ. दीपक टिळक यांच्या हस्ते विनोद मेहता यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार प्रदान करण्यात आला. ''सध्या पत्रकारितेची विश्वासार्हता कमी झाली आहे. जनतेचा विश्वास गमावला तर हा व्यवसाय संपुष्टात येईल. त्यामुळे पत्रकारितेची विश्वासार्हता जपण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे,'' असे मत 'आऊटलूक समूहा'चे संपादकीय अध्यक्ष विनोद मेहता यांनी व्यक्त केले.

विनोद मेहता म्हणाले, ''वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झाले म्हणजे सत्य अशी वाचकांची धारणा होती. मात्र, गेल्या दशकापासून ही परिस्थिती राहिलेली नाही. ९९ टक्के माध्यमे ही नफा मिळविण्यासाठीच चालविली जातात. वृत्तपत्र हा महागडा व्यवसाय आहे. दिल्लीमधील अनेक संपादक आणि पत्रकार सरकारकडून सोयी-सुविधांचा लाभ मिळविण्यासाठी धडपडत आहेत. कुणाला पद्मश्री हवी आहे तर, कुणी राज्यसभेत खासदारी मिळावी यासाठी प्रयत्नशील आहेत.ज्या सरकारचे मूल्यमापन करून त्यांच्यावर टीका करायची त्या सरकारकडून सवलती घेतल्यावर आपण हा अधिकार गमावू शकतो. पत्रकारितेमध्ये येणाऱ्या युवकांमध्ये आदर्शवाद असतो. पण तो कायम राहात नाही. अनेकांना बातमी आणि मते यातील फरक समजत नाही. दूरचित्रवाणीच्या बातम्या हे मनोरजनाचे माध्यम झाले आहे. त्या तुलनेत वृत्तपत्रे अजूनही आपले आदर्श टिकवून आहेत.''

''दिल्लीतील दुर्दैवी घटनेचे वार्तांकन चांगल्या पद्धतीने झाले. त्यामुळे सत्ताधारी संभ्रमात पडले. या घटनेचा निषेध करण्यासाठी झालेल्या आंदोलनामध्ये राजकारणी लोक नसल्यामुळे सत्ताधाऱ्यांना हे आंदोलन दडपता आले नाही.'' असेही मेहता म्हणाले.

## ❖ डॉ. माशेलकर, कवी गुलजार, हुरजूक यांना कृतज्ञता पुरस्कार

नामवंत शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, अपंगांसाठी संपूर्ण आयुष्य वेचणाऱ्या

नसीमा हुरजुक आणि प्रसिद्ध गीतकार गुलजार या दिग्गजांचा यशवंत प्रतिष्ठानतर्फे कृतज्ञता पुरस्कार सोनई येथे प्रजासत्ताक दिनी गौरव करण्यात आला.

आमदार शंकरराव गडाख व प्रशांत गडाख या बंधूंनी नेवासे, नगर मध्ये 'यशवंत प्रतिष्ठान'च्या वतीने विविध सामाजिक उपक्रम हाती घेतले आहेत. चालू वर्षापासून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा गौरव करण्यासाठी हे पुरस्कार सुरू केले आहेत.

## ❖ डॉ. भटनागर पुरस्कार

विज्ञानक्षेत्रातील प्रतिष्ठित शांतिस्वरूप भटनागर पुरस्कार न्यूरोसायन्टिस्ट डॉ. शुभा टोळे यांना चेतासंस्थाशास्त्रासह (न्यूरोलॉजी) मूलभूत विज्ञानातील संशोधनासाठी देण्यात आला.

शुभा टोळे यांनी १९८७ मध्ये मुंबईच्या सेंट झेवियर्स कॉलेजमधून जीवरसायनशास्त्रात पदवी घेतली. त्यानंतर कॅलिफोर्नियातील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधून एमएस्‌सी आणि पीएचडी केली. शिकागो विद्यापीठातून पोस्ट डॉक्टरेट करून त्या भारतात परतल्या. टाटा मूलभूत संशोधन संस्थेत जीवशास्त्र विभागात १९९९ पासून न्यूरोसायन्स लॅबचे काम बघू लागल्या.

२००७ मध्ये मेंदूमधील विशिष्ट भागाच्या वाढीसाठी आवश्यक असलेल्या प्रक्रियेचा शोध त्यांनी लावला. त्यामुळे ऑटिझम आणि स्किझोफ्रेनियासारख्या आजारात संशोधन करण्याचा मार्ग मोकळा झाला. नेमकी कोणती प्रक्रिया चुकते ते लक्षात आले. या संशोधनासाठी त्यांना शांतिस्वरूप भटनागर पुरस्कार देण्यात आला. त्यांना नॅशनल वुमन बायोसायंटिस्ट पुरस्कारानेही गौरविण्यात आले.

## ❖ 'सालं एकदा तरी' आणि 'ॲनेस्थेशिया' प्रथम

थिएटर ॲकॅडमी आयोजित व्होडाफोन रंगसंगती एकांकिका स्पर्धेचे पारितोषिक वितरण निर्माते दिग्दर्शक महेश मांजरेकर, राष्ट्रीय पारितोषिक विजेता अभिनेता उपेंद्र लिमये यांच्या हस्ते बालगंधर्व रंगमंदिर येथे झाले. यंदा या स्पर्धेवर पुण्याच्या नाट्यसंघांचे वर्चस्व राहिले. संगीत एकांकिका विभागात 'एक सूचक बाकी वाचक' या संस्थेच्या 'सालं एकदा तरी...' आणि गद्य विभागात अनुभव पुणे, या संस्थेच्या 'ॲनेस्थेशिया' यांनी प्रथम पारितोषिक पटकावले.

या वेळी विजय केंकरे, मुक्ता बर्वे, श्रीरंग गोडबोले, सुमीत राघवन, श्रीराम पेंडसे, ऋषिकेश देशपांडे, माधव अभ्यंकर, 'व्होडाफोन'चे इश्मित सिंग, थिएटर ॲकॅडमीचे अध्यक्ष प्रसाद पुरंदरे आदी उपस्थित होते.

संगीत ही संहितेची अपरिहार्यता असली पाहिजे. दोन-तीन गाणी असली म्हणजे संगीत एकांकिका होत नाही. या स्पर्धेला मिळणाऱ्या प्रतिसादात वाढ होत

असली, तरी मुंबईहून प्रवेशिका अधिक याव्यात असे ज्येष्ठ दिग्दर्शक विजय केंकरे म्हणाले.

महेश मांजरेकर म्हणाले, 'मी स्वत: नाटकातूनच पुढे आलो आहे. मराठी इंडस्ट्रीला नाटकानेच घडवले आहे. एकांकिका स्पर्धांमधून चांगले कलाकार पुढे आहेत.' यंदापासून सुरू केलेला 'रंगसंगती लक्षवेधी रंगकर्मी पुरस्कार' आलोक राजवाडे, ऋचा आपटे, हेमंत हजारे आणि अनिल शिंदे या कलाकारांना देण्यात आला. पंचवीस हजार रुपये आणि प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## ✤ डॉ. संजय धांडे यांना पद्मश्री

कानपूर येथील इंडियन इन्स्टिट्यूट टेक्नॉलॉजीचे (आयआयटी) माजी संचालक डॉ. संजय गोविंद धांडे यांना विज्ञान आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील कामगिरीसाठी 'पद्मश्री'ने गौरविण्यात आले. डॉ. धांडे हे मूळचे पुण्याचे आहेत. डॉ. धांडे यांचे शिक्षण पुण्यातील नूतन मराठी विद्यालय व मॉडर्न हायस्कूल, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून (सीओइपी) येथे झाले. आयआयटी कानपूर येथे अभियांत्रिकीची पदवी व पीएचडी मिळविली. त्यानंतर अमेरिकेत दोन वर्षे त्यांनी नोकरी करून ते भारतात परतले. आयआयटी कानपूर येथे गेल्या १० वर्षापासून ते संचालक म्हणून काम पाहत आहेत.

## ✤ यू. आर. अनंतमूर्ती 'मॅन बुकर'च्या स्पर्धेत

आंतरराष्ट्रीय स्तरावरील मानाच्या 'मॅन बुकर' पुरस्कारासाठी ज्येष्ठ कन्नड साहित्यिक यू. आर. अनंतमूर्ती यांना अखेरचा १० नामांकनामध्ये स्थान मिळाले आहे. जयपूर लिटररी फेस्टिव्हलमध्ये घोषित करण्यात आलेल्या नामांकनामध्ये अनंतमूर्ती हे एकमेव भारतीय साहित्यिक आहेत. २२ मे रोजी लंडन येथे होणाऱ्या सोहळ्यात विजेत्याची घोषणा केली जाईल.

संपूर्ण कारकीर्दीतील कामगिरीसाठी दिला जाणारा हा पुरस्कार इंग्रजी भाषेत साहित्य उपलब्ध असलेल्या देशांतील साहित्यिकांना दिला जातो. कन्नडमधील नवसाहित्य चळवळीचे अग्रणी अनंतमूर्ती यांच्या नावावर पाच कांदबऱ्या, आठ लघुकथासंग्रह आणि तीन कवितासंग्रह आहेत. प्रामुख्याने 'संस्कार' या १९६६च्या कादंबरीसाठी ओळखले जाणारे अनंतमूर्ती यांची भरतीपुरा ही इंग्रजी कांदबरीही गाजली होती.

## ✤ तुका म्हणे साहित्य पुरस्कार

''लोकभाषेतून येणारे साहित्य दु:खाचे मूल्य शोधत माणसाला झोंबी आणणारे असते. त्या झोंबीने दु:खाचे मूल्य माणसाला कळत असते. साहित्याला मूल्यप्रामाण्याची जोड दिली की, ते साहित्य त्रिकालाबाधित कार्यरत असते. प्रादेशिकतेचे प्रामाण्य

नवे कोरे

मूर्तिमंत पुरुषार्थ, दानशूर चैतन्य, सूर्यपुत्र कौंतेय
मृत्यूच्या महाद्धारातही जो राहिला 'मृत्युंजय!'




# मृत्युंजय

**शिवाजी सावंत**

**किंमत : ३७५/-रु.**

**पोस्टेज : ३०/-रु.**

असा हा कर्ण, भीष्माचं पतन होईपर्यंत समरांगणात पायच टाकणार नव्हता! इंद्रानं पूर्वीच त्याची कवच-कुंडलं आपल्या पुत्रासाठी – अर्जुनासाठी म्हणून दानाच्या मिषानं त्याच्यापासून हस्तगत केलीच होती. परशुरामांनी, 'तुला ऐन युद्धप्रसंगी ब्रह्मास्त्र स्फुरणार नाही.' असा मर्मभेदी शाप त्याला दिला होता. महेंद्र पर्वतावरच्या ब्राह्मणाचे 'तुझ्या रथाचं चक्र, भूमीही युद्धात अशीच रुतवून ठेवील!' हे उद्‌गार कोणीही विसरू शकत नव्हतं.

जगात अनेकांनी दान केलं असेल पण – पण मरणाच्या दारातील एवढं चित्तथरारक, उत्तुंग एकनिष्ठ, अजोड दान तो एकटाच करू जाणत होता – पहिला पांडव! ज्येष्ठ कौंतेय! अजोड दानवीर, सूर्यपुत्र!

झुगारून जीवनाचा तळ शोधणारे साहित्य आले पाहिजे. कारागिरी न करता जसे आहे तसे साहित्याला रूप येऊ द्यावे. अशाच प्रकारची साहित्य निर्मिती कवी भगवान ठगांनी केली. हेच काम भगवान ठग तुका म्हणे साहित्य पुरस्काराच्या निमित्ताने बुलडाणा येथे होत आहे.'' असे मत प्रख्यात विचारवंत डॉ. गंगाधर पानतावणे यांनी 'भगवान ठग तुका म्हणे साहित्य पुरस्कार २०१२'च्या वितरण सोहळ्यात व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अध्यक्ष तथा प्रमुख अतिथींच्या हस्ते विद्रोही कवी तुकाराम महाराज आणि कवी, समीक्षक व अनुवादक भगवान ठग यांच्या प्रतिमेस ५८ व्या जयंती निमित्ताने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

**कवितासंग्रह :** बहरलेलं झाड : मनोहर रणपिसे (मुंबई), पालाला पंख फुटू दे दिनकर राठोड (सुलतानपूर, जि. बुलडाणा), **कादंबरी :** कृष्णातीर शाम फरांदे (पुणे) **वैचारिक :** जागतिकीकरण मराठी भाषा आणि शासन प्रा. डॉ. भास्कर पाटील (अकोला) **कथासंग्रह :** नातगोतं दिवाकर बोबडे (नागपूर) **समीक्षा / संपादन :** बिराड च्या निमित्ताने प्रा. डॉ. अनंता सूर (यवतमाळ). **अनुवाद :** द फ्रेण्डशिप फॅक्टर डॉ. शकुंतला कोलारकर (नागपूर) यांना पुरस्कार देण्यात आले.

## ✤ मंगलाताई शहा यांना विजयाताई लवाटे मानव्य पुरस्कार

मानव्य संस्थेतर्फे प्रसिद्ध अभिनेते माधव अभ्यंकर यांच्या हस्ते पंढरपूर येथील प्रभा-हिरा प्रतिष्ठानच्या संस्थापक संचालिका मंगलाताई शहा यांना 'कर्मयोगी विजयाताई लवाटे स्मृती मानव्य पुरस्कार' प्रदान करण्यात आला. दहा हजार रुपये, शाल, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. संस्थेच्या अध्यक्षा अरुंधती सरदेसाई आणि विश्वस्त शिरीष लवाटे या प्रसंगी उपस्थित होते.

विजयाताईंच्या कार्यापासून प्रेरणा घेत मी या क्षेत्रात काम करण्याचे ठरविले. विचार आणि कृतीच्या माध्यमातून त्या अजून आपल्यामध्येच आहेत. हा पुरस्कार म्हणजे विजयाताईंचा आशीर्वाद आहे, अशा शब्दांत कृतज्ञता व्यक्त करून मंगलाताई शहा म्हणाल्या, काम करणाऱ्याला कितीही अडचणी आल्या, तरी त्यातून मार्ग हा निश्चितपणे निघतो. या क्षेत्रात काम करताना प्रामाणिकपणा, निष्ठा याप्रमाणेच सातत्य हे देखील महत्त्वाचे असते. सध्या संस्थेमध्ये ५४ मुलांची सोय केली जात आहे. या मुलांचे मृत्यू लांबवू शकतो. पण, थांबवू शकत नाही याची खंत वाटते. केवळ पंढरपूर तालुक्यामध्ये दीड हजार एचआयव्हीबाधित आहेत. त्यापैकी मुलांपैकी पाचशे मुलांच्या निवासी प्रकल्पासाठी श्वेतांबर समाजाचे विश्वकल्याणजी महाराज यांनी ३ एकर जागा दिली आहे.

माधव अभ्यंकर म्हणाले, वंचितासाठी काम करणारे डॉ. बाबा आमटे, विजयाताई

लवाटे, डॉ. वा. ना. तुंगार हेच खरे देव आहेत. ऐहिक सुखाचा विचार करणारी माणसे 'नवसाला पावणाऱ्या' देवावर खैरात करतात. पण, समाजामध्ये अशा स्वरूपाचे काम करणाऱ्या संस्थांना पुरेशी मदत मिळत नाही हे वास्तव बदलण्याची आवश्यकता आहे.

### ❖ डॉ. एडके यांना कृतज्ञता पुरस्कार

माध्यमिक शिक्षक प्रशिक्षक परिषदेच्या पंढरपूर येथील अधिवेशनात डॉ. सुनंदा एडके यांना डॉ. एम. बी. बूच कृतज्ञता पुरस्कार प्रदान करण्यात आला. स्मृतिचिन्ह, मानपत्र व रोख १० हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. महाराष्ट्र अध्यापक शिक्षण परिषद व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागाच्या अध्यापकांतर्फे सेवानिवृत्त अध्यापकाला हा पुरस्कार दिला जातो.

### ❖ डॉ. सोनवणे यांचा सोलापूरात सत्कार

सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल डॉ. पी. डी. सोनवणे यांना सोलापूर येथे केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते वीरशैव कक्कय्या समाजातर्फे गौरविण्यात आले. डॉ. सोनवणे यांनी महाराष्ट्रात सातशेहून अधिक आरोग्य शिबिरे आयोजित केली. तीस वर्षे वैद्यकीय सेवा करून ते ससून हॉस्पिटलमधून निवृत्त झाले.

### ❖ डॉ. राक्षे यांना 'आयुर्वेदभूषण पुरस्कार'

इंटरनॅशनल आयुर्वेद असोसिएशनतर्फे डॉ. अतुल राक्षे यांना आयुर्वेद संशोधन, उपचार, प्रशिक्षण, प्रचार, आरोग्यविषयक लेखन यासाठी सातारा येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय आयुर्वेद परिषदेत असोसिएशनचे संस्थापक प्रा. डॉ. पां. ह. कुलकर्णी यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला.

### ❖ माणदेश फाउंडेशनतर्फे देशमुख, पोळ यांना पुरस्कार

माणदेश फाउंडेशनच्या वतीने आयोजित स्नेहमेळाव्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांचा सत्कार केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आला. 'यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार गणपतराव देशमुख यांना, प्रशासकीय सेवा पुरस्कार पोलिस आयुक्त गुलाबराव पोळ यांना आणि जिल्हाधिकाऱ्यांचे स्वीय सहायक प्रदीप बडवे यांना देण्यात आला.

### ❖ विजय देवधर यांना आदर्श ग्रंथपाल पुरस्कार

राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे निवृत्त ग्रंथपाल विजय देवधर यांना पुणे नगर

वाचन मंदिराचा ज्ञानकोशकार केतकर आदर्श ग्रंथपाल पुरस्कार सात फेब्रुवारीला ग्रंथालयाच्या वर्धापनदिनी डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते देण्यात आला.

## ✤ आबणे यांना साठे पुरस्कार

डॉ. राम आबणे यांना भाई वैद्य यांच्या हस्ते अण्णा भाऊ साठे पुरस्कार देण्यात आला. स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. अध्यक्षस्थानी दादासाहेब सोनवणे होते. शिक्षणाकरिता शहरात येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची चळवळ सुरू केली पाहिजे, अशी अपेक्षा भाई वैद्य यांनी व्यक्त केली.

## ✤ डॉ. मथू सावंत यांना दांडेकर पुरस्कार

साहित्यप्रेमी भगिनी मंडळातर्फे देण्यात येणारा मालतीबाई दांडेकर लेखन पुरस्कार डॉ. मथू सावंत यांना २८ जानेवारीला राजन खान यांच्या हस्ते देण्यात आला. चार हजार रुपये रोख आणि प्रशस्तिपत्रक असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

## ✤ डॉ. संजय ढोले यांना संत तुकडोजी पुरस्कार, डॉ. राहुल गोखले यांना र.धों. कर्वे पुरस्कार

पुणे विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील डॉ. संजय ढोले यांच्या 'अश्मजीव' या विज्ञान कथासंग्रहास महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीचा 'संत तुकडोजी महाराज ललित विज्ञान साहित्य पुरस्कार २०११' जाहीर झाला आहे.

डॉ. ढोले यांचे आंतरराष्ट्रीय शास्त्रीय नियतकालिकांमध्ये ७५ हून अधिक संशोधन निबंध प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या 'सोन्याची खाण' या विज्ञान कथासंग्रहास बालकुमार साहित्य संमेलनाचा, तर 'प्रेमाचा रेणू' या विज्ञान कथासंग्रहास राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला आहे. हे पुस्तक मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे निघाले आहे.

राहूल गोखले यांच्या 'विज्ञानातील सरस आणि सुरस' या पुस्तकास ललित विज्ञान विभागातील र. धों. कर्वे पुरस्कार जाहीर झाला आहे.

## ✤ अशोक पत्की यांना 'राम कदम गौरव पुरस्कार'

शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा 'स्व. राम कदम कलागौरव पुरस्कार यंदा ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की यांना १९ फेब्रुवारी रोजी प्रदान करण्यात आला. ५१ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## ✤ 'सख्यांच्या गोष्टी' पुस्तकाला पुरस्कार

डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या 'सख्यांच्या गोष्टी' या पुस्तकाला मराठी बालकुमार

साहित्य सभा कोल्हापूर या संस्थेचा पुरस्कार देण्यात आला. डॉ. इंगोले यांचे हे ६१ वे पुस्तक आहे. त्यात गंगू गाय, डोमा कुत्रा, हुशार हत्ती, चिऊताई आणि भुरी बकरी या कथांचा समावेश आहे. त्यातून मानवतेचा संदेश देण्यात आला आहे.

### ✤ भारत अस्मिता पुरस्कार

माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहातर्फे २०१३ वर्षासाठीचे ‘भारत अस्मिता राष्ट्रीय पुरस्कार प्रा. डॉ. देवीसिंग, खासदार डॉ. अशोक तन्वर, स्तंभलेखक चेतन भगत, गीतकार जावेद अख्तर व डॉ. देवी प्रसाद शेट्टी यांना प्रदान करण्यात आले. प्रत्येकी सव्वा लाख रुपये, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व ताम्रपट असे पुरस्काराचे स्वरूप होते.


गूढकथेला मानवी कंगोरे देणाऱ्या आणि त्यामुळेच मराठी कथासाहित्यात अढळपद मिळवणाऱ्या, **रत्नाकर मतकरी** यांच्या कथांचे आगळेवेगळे संग्रह.




**५वी आवृत्ती**


**फाशी बखळ**

**किंमत : १२०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**

**७वी आवृत्ती**

**मध्यरात्रीचे पडघम**

**किंमत : १२०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**



## ✤ ऑस्ट्रेलियातील संस्कृतीदूत कृष्णा अरोरा

ऑस्ट्रेलियन व भारतीय संस्कृतींत समन्वयाचे कार्य करीत असलेल्या कृष्णा अरोरा यांना 'ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया मेडल' हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. आन्टीजी म्हणून प्रसिद्ध असलेल्या कृष्णा मोहिनी अरोरा या पाकसिद्धीबाबत सल्ला देण्यासाठी दूरध्वनी संपर्कसेवा आणि भारतीय पाककृती शिकविण्याचे वर्ग चालवतात.

गेल्या वर्षी क्रिकेटपटु सचिन तेंडुलकर यांचाही या पुरस्काराने गौरव झाला होता. याआधी जॉयस वेस्ट्रिप (२०००) माला मेहता (२००६) आणि वेट्टा राजकुमार (२००९) या भारतीय वंशाच्या महिलानांही हा पुरस्कार लाभला होता.

## ✤ 'बर्फी'ला उत्कृष्ट सिनेमाचा मान

हिंदी सिनेरसिकांचे लक्ष लागलेल्या ५८ व्या फिल्म फेअर पुरस्कार वितरण सोहळ्यात अभिनेता रणबीर कपूर आणि अभिनेत्री विद्या बालन यांनी बाजी मारली. 'बर्फी' मधील भूमिकेसाठी रणबीरला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा तर 'कहाणी'साठी विद्याला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. विशेष म्हणजे गेल्या वर्षी रणबीरला 'रॉक स्टार' साठी तर विद्याला 'डर्टी पिक्चर'साठी उत्कृष्ट अभिनेता-अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला होता. 'बर्फी' चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपट घोषित करण्यात आले, तर 'कहाणी'साठी दिग्दर्शक संजय घोषला उत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार मिळाला.

समीक्षकांनी मात्र उत्कृष्ट अभिनेत्यासाठी इरफान खानला पसंती दिली. 'पानसिंग तोमर'मधील भूमिकेसाठी इरफानला समीक्षकांनी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार दिला. चित्रपटसृष्टीला दिलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल यश चोप्रा यांना मरणोत्तर जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला. अभिनेत्री माधुरी दीक्षित हिच्या हस्ते यश चोप्रा यांच्या पत्नी पामेला यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

**प्रमुख पुरस्कारविजेते :**

गीतकार - गुलझार (जब तक है जान 'छल्ला...')
संगीत आणि पार्श्वसंगीत - प्रीतम (बर्फी)
सहाय्यक अभिनेता - अनू कपूर - (विकी डोनर)
सहाय्यक अभिनेत्री - अनुष्का शर्मा (जब तक है जान)
पार्श्वगायक - अंशुमन खुरान (विकी डोनर - 'पानी दार रंग...')
पार्श्वगायिका - शाल्मली खोलगडे (इशकजादे - 'परेशान...)
नवोदित अभिनेता - अंशुमन खुराना (विकी डोनर)
नवोदित अभिनेत्री - एलिना डिक्रुझ (बर्फी)
नवोदित दिग्दर्शक - गौरी शिंदे (इंग्लिश विंग्लिश)

◈

१०वी आवृत्ती




# प्रेममयी

**वपु काळे**

**किंमत : ११०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**

हजारो वर्षांपूर्वी बाऊल नावाची एक जमात होती. जमात हा जातीवाचक शब्द वापरणंही योग्य नाही. तो एक मेळावा होता. बाऊल हा शब्द मूळ संस्कृत 'वातुल' या शब्दावरून आला प्रेम, प्रेम आणि प्रेम हा ह्या मेळाव्याचा स्थायीभाव होता. ही माणसं सतत हसत, खेळत, बागडत होती. द्वेष, मत्सर, हेवा, स्पर्धा हे शब्द त्यांच्या शब्दकोशात नव्हते. स्वत:चं शरीर हे मंदिर आणि आत वास्तव्याला असलेलं चैतन्य हा त्यांचा देव. साहजिकच त्यांची कुठेही प्रार्थनामंदिरं नव्हती. निसर्ग, झाडं, झरे, नद्या यातच त्यांचा परमेश्वर. त्यामुळे त्यांना शत्रूही नव्हते. ते कधी कधी अचानक रडायचे. कुणी कारण विचारलं, तर ते सांगत, 'हे असीम आकाश, अमर्याद समुद्र, पर्वतशिखरांची रांग त्या शक्तीनं निर्माण केली. आणि हे सगळं बघण्यासाठी आम्हाला जन्म देऊन पंचेंद्रिये बहाल केली. ह्या देणगीचा भार असह्य होऊन आम्ही रडतो.

आज फक्त प्रेम वगळलं, तर बाकीच्या षड्रिपुंवर राज्य चाललं आहे. ओशो यांच्या 'बिलव्हेड' या ग्रंथाच्या आधारे केलेलं हे स्वैर लेखन आहे. ज्या लेखनाने मी भारावलो, ते वाचकांपर्यंत पोहोचावं हा हेतू.

# सुकृत प्रकाशनची वैविध्यपूर्ण पुस्तके

स्वातंत्र्यपूर्व काळापासून आत्तापर्यंत...
अशा विशाल कालपटाच्या प्रत्यक्ष
साक्षीदार ठरलेल्या एका डॉक्टरचे आत्मकथन

**माझी गोष्ट**
**डॉ. लीला गोखले(रानडे)**

नवीन
रु. २५०

रु. २००

**जॉय ऑफ रनिंग**
**मूळ लेखक : डॉ. आशिष रॉय**
**अनुवाद : श्रीकांत जोशी, विनीता जोशी**

**'मॅरेथॉन मॅन ऑफ इंडिया'**
अशी स्वत:ची ओळख जगाच्या
नकाशावर रेखणाऱ्या डॉ. रॉय यांचे
अनोखे रोमांचक अनुभवकथन

**स्वत:ची प्रकृती 'फिट' ठेवण्यासाठी**
**अनुभवसिद्ध मार्गदर्शन**

निवृत्तीनंतर धावण्यास सुरुवात करून
डॉ. रॉय यांनी आजपर्यंत ११३ मॅरेथॉन धावून
गिनिज बुक रेकॉर्डमध्ये नाव नोंदले आहे.

पर्यावरण रक्षणाचा जागर करणारं,
प्रत्येक नागरिकाला आपल्या
पर्यावरणविषयक जबाबदारीची
जाणीव करून देणारं, आलेख, तक्ते
यासह केलेलं सहज सोपं विवेचन

**करूया रक्षण पृथ्वीचे, पर्यावरणाचे**
**ज. शं. आपटे**

रु. १००

रु. १२५

**सागरी झेप**
**शब्दांकन : माधवी कुंटे**

**कोवळ्या वयातील अथांग पराक्रम**
१७व्या वर्षीच पाच सागरी विक्रम करणाऱ्या
श्रुती लिमयेची रोमांचक अनुभवगाथा

**नीता गद्रे** यांच्या सिद्धहस्त लेखणीतून
अवतरलेल्या सर्वांगसुंदर कथा

**महानगर**

रु. १५०

रु. १००

**दत्तप्रभूंच्या गोष्टी**
**संकलक : श्री. राजाभाऊ शिधये**

श्रीगुरुचरित्रातील
ललित कथांचे संकलन

प्रमुख विक्रेत्यांकडे उपलब्ध

**सुकृत प्रकाशन, पुणे**
Website: www.sukrutprakashan.com
Email : info@sukrutprakashan.com

८४, शुक्रवार पेठ, प्रभुकृपा सोसायटी,
फुले मार्केटच्या मागे, पुणे ४११ ००२
फोन : (०२०) २४४५१५८४,
९९२१००८८४५/९८२२८६४९८७

## मेहता मराठी ग्रंथजगत

### दि रजिस्ट्रेशन ॲक्ट ऑफ न्यूजपेपर्स (सेंट्रल रुल्स : १९५६)
### नियम क्र. ८ अन्वये निवेदन (फॉर्म ४)

१) प्रकाशन स्थळ : मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ३०
२) प्रकाशन काल : मासिक
३) मुद्रक, प्रकाशक व संपादक : सुनील अनिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, पुणे - ३०.
४) प्रकाशनाची मालकी : सुनील अनिल मेहता,
५) राष्ट्रीयत्त्व : भारतीय

मी, सुनील अनिल मेहता, असे घोषित करतो की, वर दिलेला तपशील माझ्या समजुतीप्रमाणे व माहितीप्रमाणे बरोबर आहे.

दि. १.३.२०१३

**सुनील अनिल मेहता**
प्रकाशक




८वी आवृत्ती

# वैज्ञानिक खेळणी

**डी. एस. इटोकर**

**किंमत : ८०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**

ज्या मुलांना काही तरी, करावेसे वाटते; पण नक्की
काय करावे, हे त्यांना, किंवा त्यांच्या पालकांना
सांगता येणार नाही,
त्यांच्यासाठी हे पुस्तक, नक्कीच मार्गदर्शक ठरेल
व ही 'वैज्ञानिक खेळणी', तयार करता-करता
त्यांमागील सिद्धान्तांचा
संबोध स्पष्ट होईल...

# : राज्य सरकारचे मराठी वाङ्मय पुरस्कार :

उत्कृष्ट मराठी वाङ्मयनिर्मितीसाठी राज्य सरकारतर्फे २०११-१२ च्या पुरस्कारांसाठी ८१ साहित्यिकांची नावे जाहीर करण्यात आली. नरेंद्र चपळगावकर, अशोक पाटोळे, फादर फ्रान्सिस दिब्रिटो, नरेंद्र दाभोलकर, राजीव तांबे, शरद जोशी, जोसेफ तुस्कानो, आदींचा समावेश आहे. रोख ५०,००० रुपये ते २०,००० रुपये आणि प्रमाणपत्र असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे.

- **गणेश विसपुते,** *कवी केशवसुत पुरस्कार : ५०,००० रु.*
  आवाज नष्ट होत नाही' / काव्य प्रौढ
- **अनिल धाकू कांबळी,** *बालकवी पुरस्कार : ५०,०००रु.*
  'किलकिल्या उजेडाची तिरीप' / काव्य प्रौढ
- **संतोष शेणई,** *बहिणाबाई चौधरी पुरस्कार : ३०,००० रु.*
  'घटकापळाने' / काव्य प्रथम
- **संजीवनी तडेगावकर,** *इंदिरा संत पुरस्कार : २०,००० रु.*
  'अरुंद दारातून बाहेर पडताना' / काव्य विशेष,
- **अशोक पाटोळे,** *राम गणेश गडकरी पुरस्कार : ५०,००० रु.*
  'अग्निदिव्य' / नाटक प्रौढ
- **नरेंद्र चपळगावकर,** *लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार : ५०,००० रु.*
  'तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ' / चरित्र-प्रौढ
- **मिलिंद संगोराम,** *सी. डी. देशमुख पुरस्कार : ५००० रु.*
  'बयर भारतीय प्राप्तिकरांची अर्थशास्त्र / प्रौढ
- **अभिजित घोरपडे,** *डॉ. सलीम अली पुरस्कार : ५०,००० रु.*
  'संथ वाहते', पर्यावरण प्रौढ
- **राजीव तांबे,** *राजा केळकर पुरस्कार : ५०,००० रु.*
  गंमत शाळा / सर्वसामान्य ज्ञानछंद
- **जयंत पवार,** *किर्लोस्कर पुरस्कार : ५०,००० रु.*
  'काय डेंजर वार सुटलाय' / नाटक प्रौढ,
- **विलास सारंग,** *शिरवाडकर पुरस्कार : २०,००० रु.*
  'गांधीजींचं माकड' / नाटक विशेष
- **मीना देशपांडे,** *हरी नारायण आपटे पुरस्कार : ५०,००० रु.*
  'हुतात्मा' / कादंबरी प्रौढ


- **अशोक कौतिक कोळी,** *खांडेकर पुरस्कार : ५०,००० रु.*
  ‘कुंधा’ / कादंबरी प्रौढ
- **आनंद विंगकर,** *श्री. ना. पेंडसे पुरस्कार : ३०,००० रु.*
  ‘अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट’ / कादंबरी प्रथम
- **जी. के. ऐनापुरे,** *उद्धव शेळके पुरस्कार : २०,००० रु.*
  ‘जाईच्या घरी जाई’ / कादंबरी विशेष
- **डॉ. रवींद्र केशवराव शोभणे,** *दिवाकर कृष्ण पुरस्कार : ५०,००० रु.*
  ‘चंद्रोत्सव’ / लघुकथा प्रौढ
- **जयंत राजाराम पवार,** *पु. भा. भावे पुरस्कार : ५०,००० रु.*
  ‘फिनिक्सच्या राखेतून  उडला मोर’, लघुकथा प्रौढ
- **निशिकांत गुरव,** *ग. ल. ठोकळ पुरस्कार : ३०,००० रु.*
  ‘वाणीकिडे’ / लघुकथा प्रथम
- **प्रा. डॉ. देवेंद्र पुनसे,** *बी. रघुनाथ पुरस्कार : २०,००० रु.*
  ‘पोळा आणि बाहुली’ / लघुकथा विशेष
- **डॉ. प्रकाश जोशी,** *अनंत काणेकर पुरस्कार : ५०,००० रु.*
  ‘अशी माणसे असा निसर्ग’ / ललितगद्य- प्रौढ
- **अशोक प्रभाकर डांगे,** वि. द. घाटे पुरस्कार : ५०,००० रु.
  ‘लगंडी आजी आणि, रावणमामा’ / ललितगद्य - प्रौढ,
- **धोंडुजा इंगोले,** *ताराबाई शिंदे, पुरस्कार : ३०,००० रु.*
  ‘रेल्वाई कोटर’ / ललितगद्य- प्रथम
- **इंद्रजित भालेराव,** *मधुकर केचे पुरस्कार :२०,०००रु.*
  ‘नाद’ / ललिगद्य विशेष
- **दिवाकर मोहिते,** *मामा वरेरकर पुरस्कार : ५०,००० रु.*
  ‘कुणाच्या खांद्यावर’, एकांकिका- प्रौढ
- **डॉ. हरिश्चंद्र बोरकर,** *जयवंत दळवी पुरस्कार : २०,००० रु.*
  वात्सल्य / एकांकिका विशेष
- **भा. ल. महाबळ,** *कोल्हटकर व आचार्य अत्रे पुरस्कार : ५०,००० रु.*
  ‘नवे ते हवे’ / विनोद प्रौढ
- **बंडा यज्ञोपवीत,** *दत्तू बांदेकर पुरस्कार : २०,०००रु.*
  ‘दणका’ / विनोद-विशेष
- **प्रा. राम बापट,** *बागल पुरस्कार : ५०,००० रु.*
  ‘परामर्श’ / संकीर्ण-प्रौढ

- **सतीश काळसेकर,** *कृष्णराव भालेकर पुरस्कार : २०,००० रु.* 'वाचणाऱ्याची रोजनिशी' / संकीर्ण-विशेष
- **राहुल गोखले,** *र. धों. कर्वे पुरस्कार : ५०,००० रु.* 'विज्ञानातील सरस आणि सुरस' / ललित विज्ञान-प्रौढ
- **डॉ. संजय ढोले,** *संत तुकडोजी पुरस्कार : २०,००० रु.* 'अश्मजीव' / ललित विज्ञान विशेष
- **डॉ. अनंत देशमुख,**' 'समाजस्वास्थ्यकार'/ चरित्र प्रौढ, (विभागून); **विलास खोले,** आचार्य प्र. क. अत्रे / चरित्र-विशेष, धनंजय कीर पुरस्कार : २०,००० रु.
- **चंद्रकांत वानखेडे,** *केळकर पुरस्कार : ५०,००० रु.* 'अपुलाच वाद आपणांसी' / आत्मचरित्र प्रौढ
- **ज्योत्स्ना संभाजी कदम,** 'सर आणि मी' / आत्मचरित्र- प्रौढ, (विभागून); **विजय फळणीकर,** 'पराजय नव्हे विजय' / आत्मचरित्र विशेष, *यशवंतराव चव्हाण पुरस्कार : २०,००० रु.*
- **डॉ. हरिश्चंद्र थोरात,** *श्री. के. क्षीरसागर पुरस्कार : ५०,००० रु.* कादंबरी: एक साहित्यप्रकार / समीक्षा प्रौढ
- **डॉ. वसंत पाटणकर,** *कुरुंदकर पुरस्कार : ५०,००० रु.* 'कवितेचा शोध' / समीक्षा प्रौढ
- **प्रा. रवीन्द्र किंबहुने,** *कुसुमावती देशपांडे पुरस्कार : ३०,०००रु.* 'किंबहुना' / समीक्षा आणि सौंदर्यशास्त्र प्रथम'
- **डॉ. श्यामला वनारसे,** *वा. ल. कुलकर्णी पुरस्कार : २०,००० रु;* 'सत्यजित राय आणि भारतीय मन्वंतर' / समीक्षा विशेष
- **गजानन भास्कर मेहेंदळे, संतोष प्र. शिंत्रे,** *फुले पुरस्कार : ५०,००० रु.* 'शिवछत्रपतींचे आरमार' / इतिहास प्रौढ
- **डॉ. सतीश साळुंके,** *नाना पाटील पुरस्कार : २०,००० रु.* बीड जिल्ह्याचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास / इतिहास विशेष
- **डॉ. नरेंद्र दाभोलकर,** *डॉ. आंबेडकर पुरस्कार : ५०,००० रु.* 'तिमिरातून तेजाकडे' / समाजशास्त्र- प्रौढ
- **शरद जोशी,** बळीचे राज्य येणार आहे / समाजशास्त्र प्रौढ (विभागून); **सीताराम पं. खेर,** 'दारिद्र्याची संकल्पना आणि निवारण' / विशेष, *बॅ. नाथ पै पुरस्कार : २०,००० रु.*
- **फादर फ्रान्सिस दिब्रिटो,** *नांदापूरकर पुरस्कार : ५०,००० रु.* 'सुबोध बायबल' / तत्त्वज्ञान प्रौढ

- **संदीपकुमार साळुंखे,** *भाऊराव पाटील पुरस्कार : ५०,००० रु.*
  'हम होंगे कामयाब'/ शिक्षणशास्त्र प्रौढ
- **सुरेश पांडुरंग वाडे,** *कालेलकर पुरस्कार, ५०,००० रु.*
  'संकल्पना कोश' / भाषाशास्त्र व व्याकरण प्रौढ
- **अशोक वाडकर,** *तावडे पुरस्कार : ५०,००० रु.*
  आविष्करण आधुनिक वास्तुकलेचे' / भौतिकशास्त्र
- **जोसेफ तुस्कानो,** 'विज्ञानवाटा', तंत्रविज्ञान (विभागून);
  **प्रा. यादव गायकवाड,** 'सम्यक संवाद, दलित– पददलितावरील आदर्श साहित्य',
  *अण्णा भाऊ साठे पुरस्कार : ३०,००० रु.*
- **सुनंदा अमरापूरकर,** *तर्कतीर्थ जोशी पुरस्कार : ५०,००० रु.*
  'डिसअपिअरिंग डॉटर्स', अनुवादित प्रौढ,
- **सत्यसिद्ध बर्वे,** 'श्रीमद् भागवत महापुराण' / अनुवादित, (विभागून);
  **उषा तांबे,** 'जाणीव' / अनुवादित,
  *वा. रा. कांत पुरस्कार : ३०,००० रु.*
- **महेश केळुसकर,** *कोलते पुरस्कार : ५०,००० रु.*
  'मधु मंगेश कर्णिक : सृष्टी आणि दृष्टी' / संपादित प्रौढ
- **अरुण शेवते,** *रा. ना. चव्हाण पुरस्कार : ३०,०००रु.*
  'ऐवज' / संपादित प्रथम
- **पांडुरंग दत्तात्रेय देशपांडे,** *गाडगे महाराज पुरस्कार : ५०,००० रु.*
  'ज्ञानेश्वरी' (सांकेतिक शब्ददर्शन) / आधारित प्रौढ
- **डॉ. कृष्णा शेंडे,** *माडखोलकर पुरस्कार : ५०,००० रु.*
  'मुलतानी समाज व सामाजिक परिवर्तन' / संशोधन-प्रौढ
- **पूर्णिमा भागवत,** 'माधव मधुपुरीचा' / संशोधन प्रौढ, (विभागून);
  **माधवी मेहेंदळे,** 'दैवी प्रतिभेचा कलावंत मायकेल अँजेलो' / ललितकला आस्वाद प्रौढ,
  *पु. ल. देशपांडे पुरस्कार : ५०,००० रु.*
- **महावीर जोंधळे,** 'नाद अंतरिचा' / ललितकला आस्वाद प्रौढ, (विभागून);
  **अशोक भेलके,** 'सिंचन व्यवस्थापन' / शेतीपूरक लेखन प्रौढ
  *वसंतराव नाईक पुरस्कार : ५०,००० रु.*
- **डॉ. बी. एस. कापसे,** *डॉ. पंजाबराव देशमुख पुरस्कार : ५०,००० रु.*
  'आंबा लागवड ते निर्यात' / शेतीपूरक लेखन
- **सुबोध मयुरे,** *राजर्षी शाहू पुरस्कार : ५०,००० रु.*
  'चला क्रिकेट शिकूया' / क्रीडा वाङ्मय

- **माधव शिरवळकर,** *रँग्लर परांजपे पुरस्कार : ५०,००० रु.*
  ‘संगणकावरील मराठी आणि युनिकोड’ / संगणक व इंटरनेट
- **श्री. बा. जोशी,** बृहन्महाराष्ट्र पुरस्कार, सयाजी महाराज पुरस्कार, ५०,००० रु.
  ‘उत्तम मध्यम’
- **रमेश तांबे,** *भा. रा. तांबे पुरस्कार*
  ‘स्वप्न’ / कविता
- **डॉ. शोभा नाईक,** *बृहन्महाराष्ट्र पुरस्कार, विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार, ५०,००० रु.*
  ‘देखणी : जगण्याचे ऊर्ध्वपातन’


**अल्पावधीतच दुसऱ्या आवृत्तीचा टप्पा गाठणारे पुस्तक**




# डोंगरी ते दुबई

**मुंबईतील माफियांची साठ वर्षे**

**एस. हुसेन झैदी**

अनुवाद - **अशोक पाध्ये**

**किंमत : ३५०/-रु.**

**पोस्टेज : ३०/-रु.**

मुंबईवर ६० वर्षे आपला प्रभाव पाडणारे गुंडाच्या टोळ्यांचे डॉन होते. त्यात हाजी मस्तान, करीम लाला, वरदराजन मुदलियार, छोटा राजन, अबू सालेम हे होते. पण या सर्वांवर कडी केली ती दाऊदने. या सर्वांची तपशीलवार माहिती काढून अभ्यासपूर्वक त्यांच्यावर लिहिलेले हे पहिलेच पुस्तक आहे. एका साध्या शाळकरी पोरापासून टोळीच्या दादापर्यंत दाऊदची उत्क्रांती कशी होत गेली, दाऊदने पोलिसांचा उपयोग करून आपल्या प्रतिस्पर्ध्यांना कसे निपटले आणि शेवटी तो मुंबई पोलिसांचा एकमेव सूडकरी कसा बनला, याचे वर्णन यात आहे.

# : बालसाहित्य पुरस्कार :

- **लीला शांतिकुमार,** *वा. गो. मायदेव पुरस्कार*
  'शहा', कविता पर्यावरणाच्या आणि नव्या विचारांच्या कविता,
- **मोहन विष्णुपंत जोशी,** *ओक पुरस्कार*
  'आपले राष्ट्रपती' / चरित्र बाल वाङ्मय
- **श्री. बाळ राणे,** *ग. ह. पाटील पुरस्कार*
  'गाऊ त्यांना आरती' / चरित्र,
- **डॉ. प्रमोद चौबे,** *रघुनाथ थत्ते पुरस्कार*
  'भिंगाची करामत' / छंद व शास्त्रे,
- **डॉ. सतीश साळुंके,** *राम गणेश गडकरी पुरस्कार*
  'पास की नापास' / नाटक व एकांकिका बालवाङ्मय
- **शरद पिदडी,** *शाहीर अमरशेख पुरस्कार*
  'चिऊकाऊची कथा नवी' / नाटक व एकांकिका बालवाङ्मय,
- **डॉ. भगवान अंजनीकर,** परीक्षा / नाटक बालवाङ्मय, (विभागून);
  **श्रीमती मृण्मयी बारपांडे,** 'चला लावूया झाडे, नको ते देवपण स्वर्ग' / नाटक व एकांतिका बालवाङ्मय
  *वा. गो. आपटे पुरस्कार*
- **संजय वझरेकर,** *गोपीनाथ तळवलकर पुरस्कार*
  'टर्निंग पॉईंट' / बालकादंबरी
- **श्रीमती कविता मेहेंदळे,** *साने गुरुजी पुरस्कार*
  'लल्ली' / बालकादंबरी
- **संजय कप्तान,** *कवी दत्त पुरस्कार*
  'फॅनीच्या साहस कथा'
- **श्रीमती मंगला गोडबोले,** *ना. धों. ताम्हनकर पुरस्कार*
  'सही रे सही' / बालकथा,
- **रमेश महाले,** *ना. वा. टिळक पुरस्कार*
  'अंतराळातील स्टेशन' / बालसाहित्य संकीर्ण, रेव्हरंड

◈

## पुस्तक परिचय

# नोबेल ललना
# भाग -२

### एकविसाव्या शतकातील पहिल्या दशकातील
### १४ नोबेल ललनांच्या कर्तृत्वाचा परिचय




**मीरा सिरसमकर**

पृष्ठे **११६** । किंमत **१००/-रु.** । सभासदांना सवलतीत

***नोबेल ललना या मीरा सिरसमकर लिखित पुस्तकाची पहिली आवृत्ती नोव्हेंबर २००८ मध्ये प्रसिद्ध झाली. या पुस्तकात १९०१ ते २००० पर्यंत नोबेल पुरस्कार मिळवणाऱ्या ३५ स्त्रियांचा परिचय होता. नोबेल पुरस्काराचे जनक 'सर अल्फ्रेड नोबेल' यांचे चरित्र व नोबेल पुरस्कारांच्या योजनेची सविस्तर माहिती देखील दिलेली होती. जानेवारी २०१३ मध्ये नोबेल ललना भाग - २ प्रसिद्ध झाला. या भागात २००१ सालापासून नोबेल पुरस्कार मिळवणाऱ्या १४ स्त्रियांचा परिचय दिलेला आहे.***

सुरुवातीच्या दोन प्रकरणांमध्ये शांततेचे नोबेल पुरस्कार मिळवणाऱ्या दोन स्त्रियांची माहिती दिलेली आहे. इराणी शांतिदूत शिरीन इबादी ही इराणची पहिली महिला ठरली की जिला 'शांततेचा नोबेल पुरस्कार' मिळाला. (इ.स. २००३) या पुरस्काराने जगभरातील मुस्लिम स्त्रियांचा गौरव झाला. ''धर्मांच्या नावाखाली अन्याय करणे म्हणजे धर्मभंग करणे'' असे म्हणणाऱ्या शिरीनचा फोर्ब्ज मासिकाने जगातील शंभर शक्तिशाली स्त्रियांमध्ये समावेश केलेला आहे.

इराणमध्ये २००० साली विचारवंत लेखक, प्राध्यापक यांच्या हत्याकांडाचे सत्र आले. त्यावेळी शिरीनने न्यायालयात त्यांच्या कुटुंबीयांच्या बाजूने धैर्याने लढा दिला. तिने स्वीकारलेल्या धोरणामुळे तिला अटक करण्यात आली. तरी सुद्धा पुढेही ती निरपराध लोकांचे प्रतिनिधित्व करीत राहिली. पुढे २००१ साली तिने तेहरानमध्ये 'ह्युमन राईट्स डिफेन्स सेंटर' स्थापन केले. या संस्थेद्वारे ती निरपराध लोकांना मदत करणे, शासनाला कारवाई करण्यास उद्युक्त करणे यासारखी कामे करत असते.

सन २००४ सालचा शांततेचा नोबेल पुरस्कार केनियाच्या वेंगरी मुटा मथाई या पर्यावरणवादी महिलेला मिळाला. केवळ सात झाडे लावून आपली 'हरित पट्टा चळवळ' सुरू करणाऱ्या वँगरीनं आजवर तीन कोटी झाडे लावून, जगवून आपल्या देशाची आणि आसपासची भूमी हरित केली आहे. तिची 'ग्रीन बेल्ट मूव्हमेंट' ही अद्यापही चालू आहे. केनियातील राष्ट्रीय महिला आयोगाची अध्यक्षा या नात्याने तिने अनेक आफ्रिकन व पाश्चात्त्य देशांतील महिला संघटनांना भेटी दिल्या. पर्यावरणाचे रक्षण करण्यातूनच स्त्रीविषयक प्रश्न कसे सुटतील, याचे योग्य मार्गदर्शन करणाऱ्या वँगरीला जगातील १०० नायिकांमध्ये स्थान मिळाले आहे. १९८३ ते २००७ पर्यंत तिला अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार व चार ख्यातनाम विद्यापीठांची 'डॉक्टरेट' ही मानाची पदवी मिळाली आहे.

२००४ सालचा साहित्यातील नोबेल पुरस्कार पटकावणारी ऑस्ट्रियाची लेखिका एल्फ्रिड येलिनेक एकांतप्रिय आहे. १९८९ साली तिने लिहिलेली 'लस्ट' ही कादंबरी तिची आवडती कादंबरी आहे. एल्फ्रिड ही प्रखर स्त्रीवादी विचारवंत

आहे. ज्या समाजव्यवस्थेत स्त्रीच्या कर्तृत्वाला कवडीमोल समजून केवळ देहसौंदर्य, तारुण्य, नटवेपणा यांनाच किंमत आहे, अशा व्यवस्थेचे तिने आपल्या साहित्यकृतीतून वाभाडे काढलेले आहेत.

नोबेल पुरस्काराच्या आधी तिला दोन डझन नामांकित पुरस्कार मिळाले आहेत. २००४ सालच्या वैद्यकीय क्षेत्रातील नोबेल पुरस्कार पटकावणारी गंधसंवेदक लिंडा बक ही अमेरिकन महिला होय. चेतासंस्था (Nervous system) या विषयात तिला रुची असल्यामुळे तिने बोस्टन येथील हार्वर्ड मेडिकल स्कूलमध्ये संशोधन करायचे ठरवले. तिला तेथील संचालकांनी स्वतंत्र प्रयोगशाळा उपलब्ध करून दिली. संशोधन करण्यास लिंडाला दहा वर्षे लागली. तिला आणि रिचर्ड ॲक्सेल यांना या शोधाबद्दल वैद्यकीय नोबेल पुरस्कार मिळाला. वाढते वय आणि जनुके यांचा परस्परसंबंध शोधणे हे तिचे पुढील प्रकल्प आहेत.

प्रख्यात ब्रिटिश लेखिका डॉरिस लेसिंग हिला सन २००७ चा साहित्यातील नोबेल पुरस्कार मिळाला. गेल्या ९८ वर्षातील साहित्याचा नोबेल पुरस्कार पटकावणाऱ्या एकूण अकरा महिलांमधील ही अकरावी महिला. पहिला पुरस्कार स्वीडनच्या महिलेला १९०९ साली मिळाला होता. विसाव्या शतकातील स्त्री-पुरुष संबंधांवर आधारलेल्या काही मोजक्या चांगल्या पुस्तकांपैकी एक, असा तिने लिहिलेल्या 'गोल्डन बुक' या पुस्तकाचा गौरव नोबेल समितीने केला.

'स्त्रीवादी लेखिका' हे विशेषण अमान्य असणाऱ्या या लेखिकेने विशिष्ट विषयांच्या दृष्टिकोनांच्या आणि शैलीच्या मर्यादेत न राहता चतुरस्त्र लिखाण केले आहे. तिचे साहित्य सर्वस्पर्शी व परिवर्तनवादी आहे. 'आपल्या परखड, धाडसी आणि ज्वलंत लिखाणाने समाजाला आत्मपरीक्षण करायला लावणारी लेखिका' असे उद्‌गार नोबेल समितीने डॉरिस लेसिंगबद्दल काढले आहेत.

२००८ सालचा वैद्यकीय विभागाचा नोबेल पुरस्कार तिघांना विभागून मिळाला. एड्‌सच्या विषाणूच्या शोधाबद्दलचा नोबेल पुरस्कार मिळाल्यानंतर फ्रांस्वाज वारे सिनूस्सी हिने उद्‌गार काढले, ''व्हेरी मूव्हड्‌, व्हेरी ऑनर्ड, व्हेरी हॅपी फॉर फ्रान्स.''

फ्रांस्वाजने एड्‌सच्या विषाणूचा शोध लावल्यानंतर गेल्या पंचवीस वर्षात एड्‌सच्या संबंधात अफाट कार्य केले आहे. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक संस्थांची ती सदस्य आहे. तिचे जवळजवळ २१६ लेख प्रसिद्ध झाले असून परिषदांमधून २५० शोधनिबंध तिने वाचले आहेत. संशोधनाची एकूण १७ पेटंट्‌स तिने दाखल केली आहेत.

२००९ सालचा अर्थशास्त्राचा नोबेल पुरस्कार विजेती आहे अमेरिकेची अर्थतज्ज्ञ एलिनॉर ऑस्ट्रॉम. १९६९ सालापासून या विभागाचे नोबेल पुरस्कार दिले जाऊ लागले. १९६९ नंतर २००९ साली, म्हणजे तब्बल ४० वर्षांनी एका महिलेला हा

पुरस्कार मिळाला. कोणत्याही कामासाठी शासनावर किंवा एखाद्या खासगी संस्थेवर अवलंबून न राहता योग्य दिशेने स्वत: प्रयत्न केले, तर उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेपूर लाभ मिळतो, हे सूत्र एलिनॉरने सिद्ध केले. नोबेल समितीने घेतलेल्या एका मुलाखतीत ती म्हणते, ''या विभागाचा पुरस्कार मिळणारी मी पहिली स्त्री आहे; परंतु मी शेवटची निश्चितच नाही. या क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक तरुण स्त्रिया मला दिसतात. 'अर्थशास्त्र' या तथाकथित पुरुषी समजल्या जाणाऱ्या विषयात त्या नैपुण्य मिळवत आहेत. आपल्या संशोधनाने भर टाकत आहेत, याचा मला सार्थ अभिमान वाटतो.''

इस्रायलच्या अदा योनॅथला २००९ साली रसायनशास्त्रातील नोबेल पुरस्कार मिळाला. गेल्या शतकात स्त्रियांना नोबेल पुरस्कार खूप कमी प्रमाणात मिळाले होते. पण या शतकात परिस्थिती सुधारली आहे असे दिसते. 'रायबोसोम्स' या सजीवांच्या पेशींमध्ये असणाऱ्या घटकांच्या रचना व कार्य याविषयी तिला अत्यंत जिज्ञासा होती. त्यामुळे याबाबत पुढील संशोधन करायचे तिने ठरविले. अमेरिका आणि इंग्लंड देशातील संशोधकही तिच्या संशोधनाची माहिती घेऊ लागले. तिच्यासमेवत नोबेल मिळवणारे भारतीय वंशाचे इंग्लंडमधील रसायनतज्ज्ञ वेंकटरमण रामकृष्णन यांनी एका मुलाखतीत सांगितले की, ''अदा योनॅथ ही रायबोसोम्सची आद्य नायिका आहे. तिच्या कामामुळेच आम्हाला आमचे संशोधन करण्याचा मार्ग खुला झाला.''

जवळपास वीस वर्षांच्या अथक परिश्रमानंतर तिला यश मिळाले. "I am a Scientist, not male or a female– A Sceintist!" असे ती स्त्रीवादी भूमिकेतून प्रश्न विचारल्यावर सांगते.

एलिझाबेथ ब्लॅकबर्न हिला २००९ चे वैद्यकीय क्षेत्रातील नोबेल पारितोषिक मिळाले. सूक्ष्म गुणसूत्रांमधील अतिसूक्ष्म 'टेलोमियर' ला निरखून तिने आयुष्यभर संशोधन केले. त्यामुळे तिच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वालाच वेगळा 'निखार' आला. व्यक्तीमध्ये बुद्धीचे व कर्तबगारीचे टेलोमरेजसारखे संरक्षण विकर अस्तित्वात असेल, तर व्यक्तीचे सौंदर्य जीवनाच्या कोणत्याही टप्प्यावर अबाधितच राहते हे एलिझाबेथच्या आयुष्यावरून अधोरेखित होते. ती एक उत्तम माता, कसदार लेखिका व कुशल प्राध्यापिकाही आहे. एलिझाबेथ ब्लॅकबर्न व अमेरिकेतील संशोधक डॉ. जॅक झोस्टॅक यांच्यासमवेत २००९ साली वैद्यकीय विभागाचा नोबेल पुरस्कार कॅलोर ग्रेडरला विभागून मिळाला. एलिझाबेथ ही तिची गुरू आणि मार्गदर्शक होती. सहकार्य हाच विज्ञानाचा पाया होय असे कॅरोल मानते.

आपल्या प्रयोगशाळेत तिने चाइल्ड केअर सेंटर ठेवलेले आहे. जास्तीत जास्त स्त्रियांना ती संशोधनाची संधी देते. स्त्री-संशोधकांना कौटुंबिक पाठबळ मिळणे अत्यंत आवश्यक आहे, असे ती आवर्जून सांगते. संशोधनाचे पेपर्स, निष्कर्ष, बक्षीसे, कागदपत्रे यांची रीतसर आणि अद्यावत नोंद ठेवणे इतके काम जरी स्त्री

संशोधिकेच्या कुटुंबातील लोकांनी केले तरी अर्धा पाठिंबा मिळाल्यासारखे असल्याचे तिचे मत आहे. जर्मन कवयित्री हॅर्टा म्यूलर हिला २००९ सालचा साहित्यातील नोबेल पुरस्कार मिळाला. तिने आजवर वीसच्या वर पुस्तके लिहिली. तिच्या पुस्तकांचे विविध भाषांमध्ये अनुवाद झाले. २० प्रतिष्ठित पारितोषिके तिला मिळाली आणि 'नोबेल पारितोषिक' हा त्या सर्वांवरचा कळस!

'बस्स... आता हे शेवटचे पुस्तक.' असे ती प्रत्येक पुस्तक लिहून झाल्यावर म्हणते; परंतु परत आणखी नवे पुस्तक लिहिण्यास सुरुवात करते. कारण दु:खांची चिवट जाळी तोडण्याचं सामर्थ्य तिच्या साहित्यातच सामावलेलं आहे असे मीरा सिरसमकर म्हणतात. लायबेरियाची सरताज एलेन जॉन्सन सरलिफ हिला २०११ साली शांततेचे नोबेल पारितोषिक मिळाले. एकाच वर्षी तीन महिलांना शांततेचा पुरस्कार मिळणे ही नोबेलच्या इतिहासातली विक्रमी घटना होय.

१९९० नंतर एलेन केनिया, नैरोबी आणि नंतर अमेरिकेत मोठमोठ्या आर्थिक संस्थांमध्ये उपसंचालिका, संचालिका या पदांवर कार्यरत होती. 'युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम' मध्येही तिने आफ्रिकेची प्रतिनिधी म्हणून काम केले.

ती १९९७ साली मायदेशी परतली. निवडणुकीत स्वत: उमेदवार म्हणून उभी राहिली पण पराजित झाली. २००५ साली मात्र एलेन सरलिफ खूप मोठ्या मताधिक्याने निवडून आली व तिची अध्यक्षपदी नेमणूक झाली. लायबेरियाची ती पहिली महिला अध्यक्ष तर ठरलीच, शिवाय आफ्रिका खंडातील देशांमधीलही ती पहिलीच महिला अध्यक्ष ठरली. स्त्रिया प्रामाणिक आणि कष्टाळू असतात. त्या योग्य रीतीने काम करतात यावर तिचा प्रचंड विश्वास आहे. अल्पबचत गटांची आफ्रिकेसारख्या खंडात स्थापना करणे हा तर एक चमत्कारच! 'स्त्रियांना अल्प खर्चात व्यावसायिक शिक्षण देऊन स्वत:च्या पायावर उभे राहण्याचे सामर्थ्य एलेनच्या अनेक योजनांमुळे मिळाले. शिक्षणाचे महत्त्व ओळखून सर्व मुलांना मोफत प्राथमिक शिक्षणाची संधी प्राप्त करून दिली व स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध तिने अत्यंत कडक कायदे सुरू केले. लायबेरियाची पुनर्बांधणी करण्याचे मोठे आव्हानात्मक काम तिने समर्थपणे केले.

२०११ साली शांततेचा नोबेल पुरस्कार मिळवणारी दुसरी स्त्री म्हणजे अहिंसावादी आफ्रिकन कन्या लीमा बोवी ही होय. बोवीच्या मार्गदर्शनाखाली उभी राहिलेली महिलांची चळवळ लायबेरियामध्ये बघता बघता क्रांती करून गेली. 'संपूर्ण परिवर्तन,' तेही अहिंसक मार्गांनी हा आफ्रिकन देशांच्या इतिहासातील एक चमत्कारच होता. तो घडवून आणला होता एका तरुण धाडसी युवतीने म्हणजे लीमा बोवीने! सध्या ती आफ्रिकेतील 'विमेन पीस ॲण्ड सिक्युरिटी नेटवर्क' या समितीची संचालिका आहे. २०११ साली येमेनी युवा नायिका तवक्कुल करनाम हिला शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाला. नोबेल विजेत्या स्त्रियांमधली ती सर्वात

तरुण स्त्री आणि नोबेल मिळवणारी पहिली अरब महिला. 'मदर ऑफ द येमेनी रिव्होल्युशन' हा किताब तिला वयाच्या अवघ्या बत्तिसाव्या वर्षी मिळाला.


नोबेल पुरस्कार मिळाल्यावर ती म्हणाली, ''हा पुरस्कार म्हणजे माझ्या शांततापूर्ण अहिंसक चळवळीला मिळालेला आंतरराष्ट्रीय पाठिंबा आहे. हा पुरस्कार केवळ माझा नसून अरब जनता व खास करून तेथील युवकयुवतींचा आहे.''

अशा रीतीने चौदा नोबेल ललनांच्या कर्तृत्वाचा परिचय वाचकांना होतो.

मीराताईंनी या स्त्रियांच्या चरित्रांचा अभ्यास करताना बरेच श्रम घेतलेले आहेत ते त्यांचे मनोगत वाचून आपल्या ध्यानात येते. पण लेखिकेच्या श्रमाचे चीज झाले असेच मला म्हणावेसे वाटते. नोबेल ललना भाग - १, भाग - २ दोन्ही पुस्तके प्रत्येकाने आवर्जून वाचावीत अशीच आहेत.

**- डॉ. निर्मला सारडा, पुणे**
मो. ९५०३६०८४४५

◈




**नवे कोरे**

# लॉस्ट होरायझन

मूळ लेखक : **जेम्स हिल्टन**

अनुवाद : **स्नेहल जोशी**

**किंमत : १८०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**

जिथं काळ निश्चल राहतो!

हिमालयीन पर्वतांच्या उंच भिंती असलेल्या एका दूरवरच्या तिबेटियन दरीत स्वप्नातीत असा शांग्रिलाचा मठ आहे. भारतातून अपहरण करून आणलेलं विमान कोसळल्यावर, ह्यूज कॉन्वेला त्या शांग्रिलाच्या मठात आणलं जातं. तिथे त्याला काहीतरी गूढपणा जाणवतो.


हे उड्डाण कोणी नियोजित केलं होतं? असं कोणतं रहस्य होतं जे त्या आदरणीय लामाने दडवून ठेवलं होतं? पियानोसारखं वाद्य वाजवणारी ती सुंदर चिनी मुलगी ह्या अशा विचित्र जागी कशी आली?

हळूहळू कॉन्वेला ते असंभवनीय सत्य कळतं...




# चिकन सूप फॉर द सोल इंडियन मदर्स

## भारतीय मातांच्या संस्कार समृद्ध आयुष्यातून कुटुंबसंस्थेला मिळत राहिलेले सौख्य आणि स्थैर्य




अनुवाद : **डॉ. वृषाली पटवर्धन**

पृष्ठे **२७२**। किंमत **२७०/-रु.** । सभासदांना सवलतीत

**'चिकन सूप' ही जागतिक पातळीवर लोकप्रिय ठरलेली सकारात्मक अनुभवांचे सादरीकरण करणारी मालिका. बहीण, भाऊ, आई, वडील, दांपत्य, पती, पत्नी, आजोबा, आजी, मित्र, मैत्रीण, शिक्षक, डॉक्टर, विद्यार्थी, पालक, भारतीय स्त्री, भारतीय माता, अशा अनेकविध नात्यांचा आणि नातेसंबंधांचा आपल्या जीवनाच्या सार्थकतेसाठी कसा उपयोग होतो याचे वास्तव, प्रत्यक्ष घडलेले प्रत्ययकारी अनुभव तीन चार पृष्ठांच्या मोजक्या मर्यादेत नेमके प्रकट करून वाचकाला प्रभावित करतात.**

**'इंडियन मदर्स' या पुस्तकात भारतीय मातांचे आपल्या मुलामुलींवर होणारे जीवन समृद्ध संस्कार आयुष्यभर आपल्याला आधार देत राहतात हे मनावर ठसते.**

*या पुस्तकाच्या एक संपादिका रक्षा भारदिया यांनी प्रस्तावनेत मांडलेले विचार-*

गेली दहा वर्षं मला एकच छंद जडलाय – अतिशय बुद्धिमान माणसं शोधायची आणि त्यांची जडणघडण कशी झाली, त्यांना प्रेरणा कशी मिळाली हे जाणून घ्यायचं! ही प्रखर बुद्धिमत्ता त्यांच्यात येते कुठून? ती आनुवंशिक असते का? त्यांच्या यशाच्या प्रवासात आजूबाजूच्या परिस्थितीचा किती वाटा असतो? असे प्रश्न मला पडत असतात. एखाद्या परिस्थितीत, प्रसंगात आपल्यापैकी काही जण अगदी कोलमडून पडतात; पण तशाच प्रसंगात काही जण ठामपणे उभं राहून सामना करतात – असं का? एखाद्या गोष्टीकडे एखादा माणूस अनेकानेक दृष्टिकोनातून पाहतो आणि त्याला त्यातून नवीनच गोष्ट दिसते; पण एखाद्याला ती गोष्ट 'मुद्दाम' घडवून आणल्याची खात्री वाटते – असं का? काही जण आपल्या क्षमतेच्या, कुवतीच्या पलीकडे जाऊन प्रयत्न करतात आणि त्यांना प्रगतीचं नवं क्षितिज गवसतं; मात्र काही जण स्वत:ला त्याच त्या चौकटीत बंदिस्त करतात आणि वर्षानुवर्षं तसंच आणि तेच तेच करत राहतात – असं का?

या प्रश्नांची उत्तरं अगदी सहजासहजी मिळणं तसं अवघडच! पण या पुस्तकावर काम करताना मला वाळवंटातलं एक 'ओॲसिस' सापडलं. तिथं शांतपणे बसून मला या सगळ्यांची उत्तरं सापडणार होती. 'चिकन सूप फॉर द इंडियन मदर्स' या पुस्तकाचं संपादन आणि संकलन करताना मला अतिशय वेगळ्या, असामान्य गोष्टींची झलक दिसली. यातली नावं किंवा व्यक्ती प्रसिद्ध नव्हत्या, टी. व्ही.वर दिसणाऱ्या नव्हत्या; उलट त्या सगळ्या अगदी सामान्य होत्या. घराघरात आढळून येणाऱ्या 'आई' होत्या. एकीकडे त्या साध्यासुध्या, सोशिक होत्या आणि एकीकडे कणखरही होत्या.

'आपण कितीतरी अवघड प्रसंगांतून चिकाटीनं आणि धीरानं मार्ग काढला, तेसुद्धा एवढंसंही 'प्रशिक्षण' किंवा मानसशास्त्राचं ज्ञान नसताना' असं या आयांनी सांगितलं. एका रम्य सकाळी (किंवा संध्याकाळी किंवा रात्री) त्यांच्या कुशीत एक गोंडस बाळ जन्माला आलं आणि तेव्हापासून दर दिवशी वाजवी आणि अवाजवी हट्टांची मालिका सुरू झाली; आणि तरीही आपल्या बाळांच्या निरागस हास्यात, त्यांच्या मऊमऊ हातांच्या मिठीत या आयांना आपल्या अंतरंगातल्या प्रचंड अज्ञात शक्तीचा शोध लागला. एका आईनं मनापासून सांगितलं – **''माझ्या बाळाच्या हातात जणू जादूची किल्ली होती. त्या किल्लीनं माझ्यातल्या कितीतरी गुणांची, क्षमतांच्या खजिन्याची दारं उघडली. तो खजिना माझा असूनही आत्तापर्यंत मलाच ठाऊक नव्हता.''**

आईच्या निरपेक्ष, दिव्य प्रेमाच्या गोष्टी आपण आत्तापर्यंत कथा-कादंबऱ्यांत वाचत होतो; पण या पुस्तकातल्या बहुतेक सर्व कथा वास्तवात हा आनंद अनुभव देणाऱ्या आहेत. आपल्या आईपणातून त्यांनी जे प्रेम दिलं, ते केवळ असीम आहे; शब्दात सांगता येण्याजोगं नाही. त्या निरपेक्ष प्रेमात कसलीच देवाण-घेवाण नाही. तर्काचे कुठलेच नियम त्या अतर्क्य प्रेमाला लागू नाहीत. ते प्रेम त्यांना क्षणात 'मेणाहून मऊ' बनवतं, तर एखाद्या क्षणी 'वज्राहून कठीण!' त्या प्रेमानंच त्यांना खऱ्या अर्थानं क्षमा करायला आणि चुका पोटात घालून विसरायला शिकवलं. ''शहाणं होण्यासाठी आपल्याला थोडं वेडं व्हावं लागतं. आईपणात मला असा 'अधिकृत' तर्कविसंगत संयम धरावा लागला. त्यातूनच माझा अक्षय ठेवा म्हणजे काय ते कळलं.'' आणखी एका आईनं सांगितलं.

नवीन गोष्टी शिकून विकास करण्याची इच्छा, आवड आणि तयारी ही भविष्याची पहिली पायरी आहे. 'एकदा तुम्ही आई झालात की, अखंड विद्यार्थी होता.' अशा अर्थाची एक जुनी म्हण आहे. एका वेगळ्या संदर्भात मला या गोष्टीचा प्रत्यय या गोष्टीत आला. आई होणं म्हणजे आपली क्षितिजं विस्तारणं! म्हणून तर एखादी आई तरुणाईचं मत जाणून घेण्यासाठी पन्नाशीतही इंटरनेट वापरायला शिकून घेते, तर एखादी आई परदेशात स्थायिक झालेल्या आपल्या मुलाशी संपर्क साधण्यासाठी 'स्काईप' (skype) शिकते.

आपलं बाळ बोलायला शिकण्याआधीपासूनच आईची नव्या गोष्टी शिकून, समजून घेण्याची धडपड सुरू होते. आपलं बाळ का रडतंय, त्याचं रडं थांबवून त्याला शांत कसं करायचं, त्याची तब्येत कशी सांभाळायची, दात येताना त्याची काळजी कशी घ्यायची हे त्या सहज शिकतात. शाळेत नव्यानं जायला लागलेलं मूल असो की वयात येणारं 'वात्रट' मूल असो, आई एखाद्या

मानसशास्त्रज्ञासारखं त्याचं मन जाणू शकते, वाचू शकते. मुलाला स्वत:मधले अंगभूत गुण कळण्यासाठी, आयुष्यात योग्य क्षेत्र निवडण्यासाठी, करिअर निवडून त्यात स्थिरावण्यासाठी, इतकंच काय, पण आयुष्याचा जोडीदार निवडण्यासाठी... (ही यादी आणि आईची जबाबदारी न संपणारी आहे) आई नेहमीच आपल्या मुलांबरोबर असते.

मी जेव्हा माझे पदार्थविज्ञानावरचे पेपर्स लिहिले तेव्हा मला घर्षणाचं तत्त्वं जितकं कळलं, त्यापेक्षा माझ्या सातवीतल्या मुलीला ते समजावून सांगताना मला जास्त कळलं होतं! आणि 'शिकवणं' हा शिकण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे, हेही मला तेव्हाच समजलं.

**'आई'मध्ये एखादी अशी काही जबरदस्त गोष्ट असते की, त्यामुळे सामान्य आईसुद्धा एकदम 'असामान्य' वाटते. आईला पाच ज्ञानेंद्रियांबरोबरच आणखी एक 'अदृश्य' जाणिवेची देणगी असते; 'सिक्स्थ सेन्स'ची! त्यामुळे आयांना इतरांना न दिसणाऱ्या बऱ्याच गोष्टी दिसत असतात.**

स्त्री एक पत्नी, मुलगी, सहकारी किंवा मैत्रीण म्हणून कदाचित दुसऱ्याची बाजू समजून घ्यायला कमी पडेल, पण जेव्हा त्या गोष्टींचा, घटनांचा संबंध तिच्या मुलांशी असतो, तेव्हा आई म्हणून दुसरी बाजू ती सहज समजून घेऊ शकते, त्या भूमिकेत जाऊन विचार करू शकते. आपल्या मुलाच्या आयुष्यातल्या विविध टप्प्यांवर ती वेगवेगळ्या रुपांत त्याला समजून घेत असते. एखादी चांगली गोष्ट करण्यासाठी ती वेगवेगळ्या युक्त्या शोधते. पास्ता खाण्याचा हट्ट धरणाऱ्या मुलाला पास्त्याच्याच चवीत पौष्टिक, चौरस पदार्थ करून वाढणं, हे तीच करते! मुलांना गोष्टी सांगणं आणि बऱ्याचदा 'स्व-रचित' गोष्टी सांगून त्यांना रमवणं हे तिलाच जमतं. एक 'स्त्री' म्हणून एखाद्या वेळेस आपल्या हक्कांसाठी लढायला ती घाबरेल, पण जेव्हा मुलाच्या बाजूनं, त्याच्यासाठी लढायचं असतं, कोणाला विरोध करायचा असतो, तेव्हा हीच आधी 'गरीब गाय' वाटणारी स्त्री 'वाघिणी'चं रूप घेते!

माझ्या आजीच्या शक्तीची इथे मला आठवण येतेय. तिचं वय झालं होतं आणि तिची तब्येतही फारशी काही चांगली नव्हती. माझ्या चुलत भावाचं म्हणजे तिच्या नातवाचं लग्न होतं. त्या दिवशीची गोष्ट – इकडे भावाची सप्तपदी चालली होती आणि तिकडे आजीची तब्येत जास्तच खालावत होती. 'ती आजची रात्र काढू शकणार नाही' असं डॉक्टरांनाही वाटत होतं. आजी धड शुद्धीतही नव्हती आणि अगदी पूर्ण बेशुद्धही नव्हती. जरा शुद्धीत असताना तिनं तिच्या मुलाला, माझ्या काकाला जवळ बोलावलं (हा काका म्हणजे नवरदेवाचा

बाबा) आणि म्हणाली, ''हे बघ, काळजी करू नकोस, माझ्या नातवाला आणि नातसुनेला आशीर्वाद दिल्याशिवाय मी काही मरणार नाही. तू निश्चिन्त राहा.'' आणि खरंच तसंच झालं. नातवाचं लग्न निर्विघ्नपणे पार पडलं. नवं जोडपं तिच्या पाया पडायला आलं. तिनं दोघांच्या डोक्यावर थरथरता हात ठेवला. पाठीवर हात फिरवून दोघांना 'सुखी राहा' असा मनापासून आशीर्वाद दिला आणि मगच या जगाचा निरोप घेतला. हीच तिची इच्छाशक्ती! या गोष्टींमध्ये स्त्रीच्या जीवनातल्या 'आई'च्या भूमिकेतल्या काळाची झलक, काही निवडक प्रसंग आपल्याला दिसतील. (मातृत्व म्हणजे आयुष्यभराची बांधिलकी आणि जबाबदारी) जगात सगळीकडे प्राचीन काळापासून कमी-अधिक प्रमाणात स्त्रियांच्या बाबतीत आई म्हणून हेच चित्र दिसतं. शिवाय त्या हे प्रसिद्धी किंवा पुरस्कार मिळावा म्हणून करत नाहीत. आपल्या मुलांसाठी नवं शिकण्याची, प्रगती करण्याची त्यांना आंतरिक तळमळ असते, म्हणून त्या हे करतात. खरंतर त्या दुसरं काही करूच शकत नाहीत!


या पुस्तकाचं संकलन, संपादन करताना मला जेवढा आनंद मिळाला, तेवढाच तुम्हालाही हे वाचून मिळेल, अशी आशा करते!

**– रक्षा भारदिया**


◈


नवे कोरे


# फ्रँकलिनची नवीन पुस्तके





**फ्रँकलिन आणि हॅरिएट**




**फ्रँकलिनचा गुप्त क्लब**




**फ्रँकलिनची ख्रिसमस भेट**




आगामी

# सेंड देम टू हेल

मूळ लेखक : **सेबॅस्टियन विल्यम्स**

अनुवाद : **अभिजित पेंढारकर**

'सेंड देम टू हेल' हे बँकॉकच्या कुप्रसिद्ध तुरुंग व्यवस्थेत गेली दोन दशके ज्या प्रकारचे आयुष्य परदेशी कैद्यांच्या वाट्याला आले आहे, त्याची थरकाप उडविणारी वस्तुनिष्ठ कहाणी सांगणारे इतिवृत्त आहे.

....

खून, मानवी हक्कांची विटंबना, अमली पदार्थ, ब्लॅकमेलिंग, खंडणी, क्रूर हिंसाचार, वैद्यकीय गैरप्रकार आणि मृत्युदंड देण्याचे असमर्थनीय प्रकार या बँगवँग आणि क्लोंग प्रेम तुरुंगातील नित्याच्या गोष्टी आहेत.

...

थायलंडमधील कायदेव्यवस्था ज्यावर आधारित आहे, ती कल्पनेच्याही पलीकडची अमानवी दु:स्वप्ने अनेक वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागलेल्या एका पाश्चिमात्य कैद्याच्या वाट्याला आली. त्याच्याच नजरेतून सेबॅस्टियन विल्यम्स यांनी हे धक्कादायक वास्तव या पुस्तकातून सर्वांसमोर मांडले आहे.


भारतीय टपाल खात्याच्या नवीन अधिनियमानुसार मासिकाचे वितरण करताना पिनकोड सहित संपूर्ण पत्ता टाकणे अनिवार्य झाले आहे. आपला अंक नियमीत वितरित होण्यासाठी कृपया पिनकोडसह आपला संपूर्ण पत्ता पोस्टकार्डद्वारे अथवा ई-मेलद्वारे कळवावा.

ई-मेल - info@mehtapublishinghouse.com




# तडा

**स्वातंत्र्य आणि मुक्ती यांचे अर्थ न कळल्याने स्वतःचे आणि इतरांचे भावविश्व आणि आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्या मानसिकतेची विदारक कहाणी**




मूळ लेखक **: डॉ. एस.एल. भैरप्पा**

अनुवाद : **उमा वि. कुलकर्णी**

पृष्ठे **२८८ ।** किंमत **२७०/-रु. ।** सभासदांना सवलतीत

*डॉ. एस. एल. भैरप्पा यांच्या वंशवृक्ष, पर्व, मंद्र, काठ, सार्थ, आवरण वगैरे कादंबऱ्या आणि त्यांचे आत्मचरित्र या सर्व कलाकृती मराठी वाचकांना प्रिय ठरल्या आहेत. उमा कुलकर्णी यांनी त्यांच्या मूळ कन्नड पुस्तकांचे इतके नेटके अनुवाद केले आहेत की भैरप्पा हे मूळ मराठीतच लिहितात असे वाचकांना वाटते. मराठी अनुवादांसाठी त्यांना मिळणारे मानधन कदाचित कन्नडपेक्षाही जास्त असेल. सुधा मूर्ती यांचाही तोच अनुभव आहे. भारतीय पारंपरिक घराण्याचा वाटणारा अभिमान त्यांच्या वंशवृक्ष या कादंबरीच्या नायकाच्या व्यक्तिमत्त्वाला आणि कर्मठ आचारविचारांना बळ देतो.*

*'पर्व' मध्ये महाभारताची कथा चमत्कार वगैरे वगळून मानवी पातळीवरच्या रागलोभांचे व्यामिश्र रूप शोधू पाहते. 'मंद्र' मध्ये एका संगीतकाराच्या उच्च कलासाधनेचे आणि सामान्य मानवी भावभावनांचे विरोधाभास प्रकट करते.*

*'अनावरण' मध्ये भारतीय समाजावरील इस्लामी आक्रमकांच्या जुलूम जबरदस्तीचे आणि इतिहासाचे विकृतीकरण करण्याचे कारस्थान भैरप्पांना अस्वस्थ करते.*

*तथाकथित बुद्धिवाद्यांनी आपल्या लेखणीचा आणि बुद्धीचा वापर सत्ताधीशांच्या लहरी सांभाळण्यासाठी करून सत्य इतिहासाला झाकोळून टाकले या आवरणाचा पर्दाफाश ते करू पाहतात. त्यासाठी स्वत:वर 'प्रतिगामी' असा होणारा भडिमारही ते स्वीकारतात.*

*'तडा' ही त्यांची नवी कादंबरी सद्य:कालीन डोमेस्टिक व्हायोलन्स, कौटुंबिक अत्याचार आणि ॲट्रॉसिटी जातीवाचक शब्दांचा वापर या संदर्भातील कायदे मूळ हेतूंचा विपर्यास करून निरपराधी नागरिकांना छळण्यासाठी कसे वापरले जातात याचे भयावह स्वरूप ते दाखवू पाहतात. समानता, स्वातंत्र्य आणि स्त्रीमुक्ती यांचे चुकीचे अर्थ लावून स्वत:चे, कुटुंबाचे, इतरांचे भावविश्व आणि समाजव्यवस्थेचे सुविहीत स्वास्थ्य उद्‌ध्वस्त करून टाकणाऱ्या विकृत मानसिकतेवर ते प्रकाशझोत टाकतात. घाईगर्दीत मंजूर केलेल्या कायद्यांमुळे आपली कौटुंबिक आणि सामाजिक घडी बिघडवली जात आहे; समाजाला त्यामुळे तडे जात आहेत, याचे विदारक अनर्थकारक परिणाम आपल्या समाजात नवनवे ताण अकारण निर्माण करीत आहेत, असे भैरप्पांना वाटते. तशी अनेक प्रकरणे सध्या न्यायालयात निवाड्यासाठी दाखल होत आहेत. अधाशी वकील मंडळी, स्वार्थी आपमतलबी संधिसाधू आणि सत्याची चाड नसलेले कायद्यातील तरतुदींचा विकृत फायदा घेणारे समाज घटक यांची अभद्र युती मोकाट सुटली आहे.*

***— कार्यकारी संपादक***

*तडाच्या आरंभीचा काही भाग पुढे संपादित स्वरूपात देत आहोत –*

- १ -

लॉकअपमध्ये अशा प्रकारे येऊन पडणं कुठल्या न्यायाला धरून आहे? सतत चावणारे, सर्वांगाला फाडून खाणारे डास... उकाड्याचे दिवस म्हणून शर्टही अर्ध्या बाह्यांचा घातला होता. पायातही सॉक्स घातले नव्हते. अंगावरही गुडघ्यापर्यंतची स्लॅक होती. पायात नुसत्या चपला होत्या. रात्री आठ वाजता ड्रायव्हरलाही काही काम नाही म्हणून घरी पाठवून दिलं होतं, त्यामुळे स्वत:च गाडी ड्राईव्ह करून पोलीसस्टेशनवर आलो. इथल्या दोन कॉन्स्टेबल्सनी.. कॉन्स्टेबल म्हणजे पुरुषच. त्या युनिफॉर्मच्या आत स्त्री-देह असला तरीही... विचारलं, ''सर, जयंती हाय प्रोसीजन कंपनीचे चेअरमन एम. पी. जयकुमारसाहेब आपणच का?'' काय विनयपूर्ण बोलणं ते! पोलीस, त्यातही भारतातले पोलीस! त्यातही आमच्यासारख्या सुशिक्षितांबरोबर! ''मल्लेस्वर पोलीस ठाण्याच्या इन्स्पेक्टर साहेबांनी तुम्हाला घेऊन यायला सांगितलंय.'

''पण माझं काय अडलंय तुमच्या स्टेशनवर यायला? मी कशाला येऊ? जे काही आहे ते आधी एका कागदावर नीट लिहून द्यायला सांगा तुमच्या साहेबांना!''

''सर, क्रिमिनल कंप्लेण्ट दाखल झाल्यावर तुम्ही स्टेशनला यायचं नाकारू शकत नाही! बऱ्या बोलानं आला नाही तर जबरदस्तीनं घेऊन या, असा हुकूम आहे.''

लगोलग एखाद्या वकिलाला फोन करून सोबत घेऊन यायला हवं होतं, सुचलं नाही. केवढा घाबरलो होतो मी! आजवर एकही कायदा किंवा नियम मी मोडलेला नाही. कंपनीचा हिशोब-कागदपत्रं, आर्थिक व्यवहार, सगळ्याच बाबतीत चोख आहे आपला व्यवहार! कुठल्याही बाबतीत खोटेपणा नाही. इतक्या वर्षांत कर-खात्यालाही एका पैशाचीही लाच दिलेली नाही मी! मग काय झालं असेल? ड्रायव्हरनं कुठं अपघात करून कुणाला जखमी तर केलं नसेल?

''सर, उशीर करू नका! लवकर चला!'' त्यांची घाई सुरू झाली, तेव्हा मीही गडबडीनं पायात चप्पल सरकवून कारमध्ये जाऊन बसलो. माझी परवानगी न विचारता दोघेही कॉन्स्टेबल्स गाडीच्या मागच्या सीटवर घुसून बसले.

''हे काय सर! तुम्हीच ड्राईव्ह करताय? ड्रायव्हर नाही ठेवला? कार फारच छान आहे. तेवढा ए.सी. लावा बघू! व्वा! टोयाटा लक्झुरी! किती पडले सर?'' दहा लाखाची ती कार आपल्याच मालकीची असल्यासारखे आत घुसून बसणारे ते कॉन्स्टेबल्स! त्यांच्याबरोबर पोलीसस्टेशनात शिरत असताना तोल जाऊन गर्तेत कोसळल्यासारखं होत होतं. हे पोलीसस्टेशन! पोलीस म्हणजे जनतेचा मित्र म्हणून भाषणं ठोकली जातात! हे महिला-ठाणं. पहारेकरी- स्वागतकर्तीनं विचारलं, ''कुणाला भेटायचं होतं?''

''मला ठाऊक नाही. यांनी मला जबरदस्तीनं आणलंय.''

''म्हणजे इन्स्पेक्टर! चला आत, जरा थांबा. मी आधी विचारून येते... हं! चला.''

आत बसलेल्या त्या खाकी कपड्यातल्या आडदांड देहामध्ये, आत आलेल्याला खुर्ची दाखवून ‘बसा’ म्हणण्याइतकं सौजन्यही नव्हतं, त्यात, स्त्रिया जन्मजात सौजन्यशील असतात, म्हणून भाषणं ठोकली जातात!

‘‘नमस्कार मॅडम!’’ म्हणत मी स्वत:च तिच्या समोरची खुर्ची ओढून घेतली. माझ्या केसापेक्षा काळाभोर रंग, भुंडे कान, हाता-गळ्यात काही नाही. चापून-चोपून सपाट छातीला घेरलेला खाकी कोट आणि धगधगणारी नजर.

‘‘मी तुम्हाला बसायची परवानगी दिलेली नाही! आणि तुम्ही ती विचारलीही नाही.’’

‘‘आत आलेल्याला ‘बसा’ म्हणून सांगत तुम्ही आधी सौजन्य दाखवायला हवं होतं.’’

‘‘काय राव! आम्हाला सौजन्याचे धडे देताय काय? गुन्हेगारांना कुठल्याही पोलीस ठाण्यात सौजन्याची वागणूक मिळत नसते!’’

‘‘मॅडम! मी तुमच्याशी सौजन्यानं बोलतोय! मी काय केलंय क्रिमिनल कृत्य?’’ म्हणत खुर्चीवर बसत असतानाच इन्स्पेक्टरनं टण्ण... कन टेबलावरची घंटा वाजवली आणि दोन कॉन्स्टेबल्स धावत आत आले. त्यांना ‘‘याला आधी ओढून आत टाका’’ अशी आज्ञा सोडताच त्यांनी दोन्ही दंडांवर घट्ट पकड केली. एकीकडे मी म्हणत राहिलो, ‘‘हे काय चालवलंय तुम्ही? या देशात काही कायदा कानून आहे की नाही? मला माझ्या वकिलाला बोलावू द्या!...’’

पण तिकडं लक्ष न देता तिनं पुन्हा एकदा टेबलावरची घंटा वाजवली. आता आणखी दोन पुरुष कॉन्स्टेबल्स येऊन हजर झाले; खरं तर त्यांची काही गरज नव्हती. ‘या आधी असलेल्या दोन बायका म्हणवणाऱ्याच पुरेशा होत्या, मला आत टाकायला! हे दोघं कशाला आले,’ असंच वाटलं मला! म्हटलं, ‘‘तुम्ही सगळे मिळून मला मारताय की काय! जर मला काही इजा झाली तर तुम्हा सगळ्यांना फाशी होईल, लक्षात ठेवा! कोण समजलात मला!’’

नाही म्हटलं तरी माझा आवाज फाटलाच.

‘‘कोण समजलात मला! इण्डस्ट्रियालिस्ट जयकुमार!’’

कदाचित माझं ते किंचाळणं त्या बाहेरच्या लेडी-इन्स्पेक्टरला ऐकू गेलं असावं. ती आत आली. माझ्याएवढीच उंची असेल- पाच नऊ, अर्थात त्यात बुटाचीही उंची असेल. बांधा दणकट असल्यामुळे उंची तितकीशी वाटत नव्हती. त्या खाकी कोटात दडपून टाकलेला स्त्री-वैशिष्ट्यं असलेला देह त्याही अवस्थेत माझ्या लक्षात आला.

‘‘अरे वा! स्वत:ला इण्डस्ट्रियालिस्ट म्हणवतोयस ना! पोलीस-ठाण्यात कॅपिटॅलिस्टला आणि प्रॉलिटेरियटला सारखंच लेखलं जातं! नो एक्सप्लॉयटेशन. तुमच्या अपराधासाठी काहीही एक्सक्यूज नाही!’’

“पण माझा अपराध तरी काय?”

“बायकोला मारणं म्हणजे काय वाटलं? डोमॅस्टिक व्हॉयलन्स! नॉन-बेलेबल ऑफेन्स. वकिलाच्या नावानं शंख करत होतास ना? सुप्रीम कोर्टात गेलं तरी जामीन मिळणार नाही.” तिची नजर आग ओकत होती. तीच दंडाधिकारी आणि तीच न्यायदान करायच्या जागेवर असल्यासारखी. एखाद्या हिंस्र पशूसारखी पाच-नऊच्या देहातली ती बया! ती थयथयाट करत तिथून जायला वळली तेव्हा एखादं वाक्य कसलं, एक शब्दही बोलायला सुचू नये अशी माझी अवस्था झाली होती, त्यातच गजांचा दरवाजा बंद झाला. बाहेरून कुलूप लावून सगळ्या निघून गेल्या. ते दोघं कॉन्स्टेबल्सही निघून गेले. मनगटावरच्या घड्याळात पाहिलं, रात्रीचे दहा वाजले होते. दोन्ही हात, दोन्ही पाय, गळा-मान, विरळ केसांतून डोकं - जागा मिळेल तिथं तुटून पडणाऱ्या, मुद्दाम असल्या लॉकअपसाठी म्हणून पाळल्या-पोसलेल्या भयानक डासांच्या झुंडीच्या झुंडी! हातातल्या घड्याळावरचे काटे-आकडेही नीट दिसणार नाही असा तिथला अंधूक उजेड.

- २ -

भरपूर दमणूक जाणवत होती. साडेदहा वाजून गेले असावेत. भिंतीला टेकून दोन्ही पाय जवळ घेऊन तो जमिनीवर बसला. तेवढीच पाय, कंबर आणि मांड्यांना विश्रांती मिळाली. अजून डास चावतच होते. पोटात भूक जाणवू लागली.

‘तुला चांगली अक्कल शिकवते!’ म्हणत पायात चपला चढवून ती तरातरा बाहेर पडून कारचा दरवाजा धप्पकन ओढून निघून गेली तेव्हा संध्याकाळचे पाच वाजले होते. पोलीस त्याला पकडून नेण्यासाठी घरी आले तेव्हा तिनं आपल्याविरुद्ध पोलिसात तक्रार केल्याचं आपल्याला समजलं कसं नाही? तेव्हाही कंपनीच्या संदर्भात न केलेले कितीतरी अपराध मनात तरळून गेले, पण बायको या टोकाला जाईल याची कल्पना तरी कुठून येणार? शिवाय ती दररोज जे काही बोलते, त्यावर एवढा एक मार म्हणजे काहीच नाही, हे कुठलाही न्यायाधीश सांगू शकेल...

एक शिपाई आला. देह आणि वेश दोन्हीही पुरुषाचा. गजांच्या दारापाशी येऊन त्यानं विचारलं, “ओरडायला काय झालं?”

“लघवीला जायचंय!”

त्यानं मागच्या बाजूचा दिवा लावला. त्या उजेडात त्याचे जाड पाय दिसले.

“आवरायला येत नाही काय?”

“आलं असतं तर कशाला हाका मारल्या असत्या?”

“अशीच कारणं सांगून दार उघडायला लावतात आणि पळून जातात शिंचे!” तो शांतपणे म्हणाला, “तसं काही करायला गेलास तर तंगडं मोडून ठेवीन!

तो कॉन्स्टेबलही बाहेरच्या बाजूला एक स्टूल घेऊन बसला. थोड्या वेळानं

त्यानं विचारलं, ''सर, काय शिकलाय तुम्ही?''

''बी. ई.''

कॉन्स्टेबल गालातल्या गालात हसला.

**''काही नाही! सगळे शिकलेले पुरुष बायका होतात आणि सगळ्या शिकलेल्या बायका पुरुष होतात. म्हणून, जर पुरुष पुरुष राहायचे असतील आणि बायका बायका राहायच्या असतील तर शिक्षण घेता कामा नये, बघा!''**

आता कुठं जयकुमारच्या चेहऱ्यावरही हसू उमटलं. मनात दाटलेली व्याकूळताही थोडी हलकी झाल्यासारखी वाटलं.

''तुमचं नाव काय? गाव कुठलं?''

''नंजुंडेगौडा. नागमंगलजवळचं सुरगीमंडी.''

''मला का पकडून आणलंय? इथून बाहेर पडायला काय करायचं, सांगाल का? त्यासाठी काहीही खर्च आला तरी मी करेन.''

''आमच्या पोलीसखात्यात फी भरल्याशिवाय कुठलंही काम होत नाही. तुम्ही फॅक्टरीचे मालक! तुम्हाला ठाऊक नाही का हे? सगळं सांगतो. बाहेर पडायचा मार्गही दाखवतो. मला काही एका नया पैशाचीही आशा नाही. गावाकडे भाऊ आहे, तीन मुलं आहेत, बायकोही आहे. शेतात काही पिकत नाही. तुमच्या फॅक्टरीत एक नोकरी द्या. राबायला वाघ आहे तो!''

काय शिकलेत ते?''

''हायस्कूलचं पहिलं वर्ष झालंय. काही डोक्यात शिरेना, सोडून टाकलं. ते पुढचं पुढं बघू या. तुमचं लक्ष राहू दे म्हणजे झालं! सर, तुम्हाला इथं आणून टाकलंय ते शनिवारी संध्याकाळी. आता मध्यरात्र संपून रविवार सुरू झालाय. आज कोर्टाला सुट्टी. तुम्हाला उद्या मॅजिस्ट्रेटच्या समोर हजर केलं जाईल. तेवढा वेळ इथंच डासांकडून चावून घेत राहावं लागेल. तुम्हाला पोलीस खातं ठाऊकच आहे! तुम्ही इथं हताश असता. तुम्हाला हवं तसं वाकवून घेता येतं. तुम्ही सुशिक्षित आहात हे या बयेला ठाऊक आहे, नाहीतर तिनं तुम्हाला चार दंडुके लगावले असते. आमच्यासारख्यांकडून! नाही तर आम्हाला रक्षणासाठी उभं करून तिनंच तुमची हाडं ढिली केली असती.''

''हे महिला-ठाणे आहे ना? याचं काय कारण?''

''तुम्हाला ठाऊक नाही? सगळीकडे बायकांवर अन्याय होतो आहे, कंप्लेण्ट घेऊन गेलं तरी पुरुष-पोलीस ॲक्शन घेत नाहीत, म्हणून अन्याय करणाऱ्या पुरुषावर कारवाई करायला बायकाच पोलीस पाहिजेत, म्हणून सरकारनं ही चौकी स्थापन केली आहे. कुठल्याही बाईनं, 'नवऱ्यानं हुंडा आणला नाही म्हणून मारपीट

केली, सासू-सासऱ्यानं आणि दीर-नणंदेनं छळ केला, तू एवढंच का आणलंस म्हणून हिणवलं' अशी तक्रार केली की त्या सगळ्यांना पकडून इथं आणून डांबतात, मग जामीनही नाही, काही नाही! सगळ्यांना सात वर्षांची शिक्षा! समजलं? तसंच कुठल्याही बाईनं इथं येऊन 'माझ्या नवऱ्यानं मला मारलं' म्हणून तक्रार केली, किंवा 'नणंद-दीर-नणदेचा नवरा-सासरा यांनी छळलं.' अशी कंप्लेण्ट दिली की त्यांनाही लॉकअपमध्ये आणून टाकतात. जामीनही देत नाहीत. कुणाला चार वर्षं, कुणाला पाच वर्षांची शिक्षा! यासाठी बायकाच पोलीस पाहिजेत, पुरुष पोलिसांवर विश्वास नाही, असं सरकारनंच ठरवलंय...''

हे ऐकत असताना जयकुमारच्याही डोळ्यासमोर आपल्या घरातली परिस्थिती तरळून गेली. हुंडा दिला नाही म्हणून छळ केला असा आरोप करून केशवण्णाच्या बायकोनं आईविरुद्ध तक्रार करून तिला तीन वर्षं शिक्षा भोगायला लावल्याचं आठवलं. जेलमधून सुटका झाल्यावर ती कुठं गेली कोण जाणे! हयात तरी आहे की नाही कोण जाणे! कुणालाच ठाऊक नाही. केशवण्णा तर बायकोचा गुलाम! शोभक्का ही एकटीच आईच्या आठवणीनं व्याकूळ होणारी. हे सगळं आठवून जयकुमारला स्वत: अडकलेल्या परिस्थितीचं काही क्षण विस्मरण झालं.

नंजुंडेगौडा पुढं सांगत होता, ''या इन्स्पेक्टर शीलाराणीचं लग्न झालं नाही. कोण लग्न करणार म्हणा या पुरुषाशी? लग्न करून एखाद्या मुलाला जन्म दिल्यावरच समजणार ना पुरुष माणसाचं सुख-दु:ख!...''

पण जयकुमारचं त्या बोलण्याकडे तितकंसं लक्ष नव्हतं. तिकडं लक्ष गेलं तेव्हा तो सांगत होता, ''माला केरूर नावाची एक वकील बाई आहे. ती आणि ही एकत्र येतात आणि असली काही तक्रार असेल तर शिक्षा होईलच, असं करतात. सरकारी वकील आणि जज्जही बाईच असली पाहिजे म्हणून चळवळही चाललीय यांची! सगळी चळवळ बायकांची, त्यात कॉलेजच्या मुलींना बरोबर घेतात, धिक्कार करायला पाहिजे ना कुणीतरी! ठाऊक नाही तुम्हाला?''

''आता मी काय करायला पाहिजे? तुम्हीच सांगा, नंजुंडेगौडा!''

''फॅक्टरीचे मालक आहात तुम्ही. हातात पैसा आहे. मोठालं डबोलं दिलं की शीलाराणी तुम्हाला सोडून देईल. तुमच्या वतीनं कुणीतरी तशी व्यवस्था केली तर ही खात्रीनं कुलूप खोलेल. का सांगतोय, ऐका. तुम्हाला बोलावून आत टाकलं ते रात्री साडेसातच्या नंतर - रेकॉर्डमध्ये अजून काहीही लिहिलेलं नाही. एकदा लिहिलं तर पुढं काय झालं, त्याचा तपशील द्यावा लागतो. पैसे घेऊन सोडायला म्हणूनच हे असं करतात.''

त्याला, नाही म्हटलं तरी बरं वाटलं. पाठोपाठ आठवलं, आजवर आपण कधीही या असल्या मार्गाचा अवलंब केलेला नाही. त्यानं विचारलं, ''त्याऐवजी मी

कोर्टात भांडलो तर कसं म्हणता?''

''तुम्हाला पाच वर्षांची शिक्षा होईल हे निश्चित! त्याचबरोबर तुमची बायको घटस्फोट मागेल, तुमच्या इस्टेटवरही हक्क सांगेल!'

तो तल्लख झाला. काही क्षण विचारात पडला. आठवलं, अशा प्रसंगी आपण सी. एन. शेखरप्पांची मदत घेऊ शकतो. 'कन्व्हेयर बेल्ट'चे कारखानदार. बन्नेरु घट्टा रोड. फोननंबर? नाही आठवत!

''तुम्ही शोधून काढून त्यांना इथली परिस्थिती सांगाल काय?''

''सर, मी या ठाण्याचा पोलीस असल्यामुळे अशी मदत करता कामा नये. या स्टेशनचा फोन वापरला तर ठाऊक होईल. जवळच एक टेलिफोन-बूथ आहे, तिथून करू शकेन. फॅक्टरी बंद असेल तरी वॉचमन तरी असेलच ना? त्याच्याकडून घरचा फोन मिळेल, पण मी हे सगळं केलं म्हणून तुम्ही कुणालाही सांगू नका.''

''ती काळजी नको. मी शब्दाचा पक्का आहे!''

**- ३ -**

लॉकअपमधून सुटका झाली तेव्हा दुपारचा दीड वाजून गेला होता. नंजुंडेगौडाचा फोन येताच शेखरप्पा लगोलग जे. पी. नगरहून कार घेऊन मल्लेश्वरच्या महिला-ठाण्यात येऊन पोहोचले तेव्हा पहाटेचे पाच वाजले होते. इन्स्पेक्टरच्या परवानगीशिवाय कैद्याला भेटू देणं नियमाला धरून नसलं तरी नंजुंडेगौडानं तेवढं धैर्य दाखवून त्यांना आत सोडलं. पुढं काय आणि कसं करायचं याविषयी शेखरप्पाला कुणी काही सांगायची गरज नव्हती. सकाळचे सात वाजायची त्यांनी वाट पाहिली आणि त्यानंतर ते इन्स्पेक्टरच्या घरी गेले. प्राथमिक बोलण्यातच हिला पटवणं फारसं अडचणीचं जाणार नाही हे शेखरप्पांच्या लक्षात आलं. खरी घासाघीस चालली ती रकमेच्या बाबतीतच. जेव्हा 'हे काही माझ्या एकटीचं नाही, वरच्यांपर्यंत पोहोचवावे लागतात...' असं ती म्हणाली, तेव्हाच आपलं काम झालं याविषयी त्यांची खात्री पटली. तिची पाच लाखाची मागणी यांना आपलं व्यवहार-कौशल्य वापरून दोन लाखापर्यंत उतरवेपर्यंत कितीतरी औपचारिक गप्पा, मंद हास्य, भुवयांचे विभ्रम, आपल्या व्यवसायातली सुखं- दु:खं सांगत तासभर गप्पा माराव्या लागल्या. एवढं सगळं होऊन ती ठाण्यावर आली तेव्हा साडेदहा वाजले होते.

तिथून सुटका होऊन जयकुमार घरी येऊन पोहोचला तेव्हा दाराआड उभी राहून त्याचीच वाट बघणारी वत्सला 'अप्पप्पा...' म्हणत धावत आली आणि त्याच्या गळ्यात पडली. तिची ही मिठी किती सुखावह असते, हे त्याला पुन्हा एकदा जाणवलं... आणि याचाच हिच्या सावत्र आईच्या पोटात आगीचा डोंब उसळतो!

जयकुमारनं सांगितलं, ''अर्जंट काम होतं, बेटा! या नंतर तुला न सांगता जाणार नाही!''

या नंतर तिच्या चेहऱ्यावर थोडं समाधान दिसलं.

बायकांची वाढ सोळाव्या वर्षांपर्यंत पूर्ण झालेली असते, की ही आणखी एक-दोन इंच वाढेल? आताच हिचा चेहरा तिच्या आईसारखा दिसायला लागलाय, असं त्याला पहिल्यांदाच जाणवलं. तो किंवा द्यावक्का तिची तिपेडी वेणी घालायची. पद्धतही थेट तिच्या आईसारखीच होती.

त्यानं विचारलं, ''खाणं झालं?''

तिनं काहीच उत्तर दिलं नाही. आपण आधी न सांगता रात्रभर बाहेर राहिल्यामुळे तिनं काही खाल्लं नाही हे त्याच्या लक्षात आलं. घरात द्यावक्काही दिसली नाही. मंगळाही घरात नाही. सावत्र आई असा शब्द आहे, तसा सावत्र बायको असा काही शब्द आहे का?

''मीही काही खाल्लं नाही. मला खायला देशील?''

वत्सला त्याला हात धरून स्वयंपाकघरात घेऊन गेली. टेबलावर ताटल्या ठेवल्या. स्वयंपाकिणीनं, शांतम्मानं बनवून ठेवलेला स्वयंपाक न चुकता वाढून घ्यायची तिला सवय होती.

- ४ -

रात्रभर जागरण झालं असलं तरी खाऊन आंघोळ केल्यावर त्याला डुलकी आली नाही. वत्सलेच्या खोलीतच असलेल्या दुसऱ्या पलंगावर तो मुकाट्यानं डोळे मिटून पडला होता. दुसरं लग्न होईपर्यंत हीच त्याची झोपायची जागा होती. वत्सलाही खोलीत एकटी झोपायला घाबरत होती. सुरुवातीला त्यानं दोन पलंग शेजारी शेजारी घातले होते. हळूहळू तिची समजूत काढत त्यानं तिला पलंग एका भिंतीकडे सरकवून आपला पलंग बाजूला घेतला होता. आताही जर तो या खोलीत झोपला असेल तर ती संपूर्ण रात्रभर एकदाही जागी न होता गाढ झोपी जात होती. दुसरं लग्न झाल्यावरही जोपर्यंत तो तिच्या डोक्यावरून हात फिरवून तिच्याशी चार गप्पा मारत नाही, तोपर्यंत तिला गाढ झोप येत नाही, हे तो पाहात होता. रात्री जाग आल्यावर एकदा तरी तिच्या खोलीत जाऊन, ती गाढ झोपल्याची खात्री करून घेतल्याशिवाय त्याचं समाधान होत नसे.

याचाच मंगळेला अतिशय संताप यायचा. काल तोच संताप पराकोटीला पोहोचून ती काल बोलू नये ते बोलली होती, परिणामी माझाही संयम सुटून हात उगारला गेला होता. यावर तिनं पोलीस-कंप्लेण्ट देऊन... नंतर काल रात्रीचा सगळा प्रकार झाला होता. पाठोपाठ, आजवर हजारवेळा आठवलेली अपघाताची घटना पुन्हा आठवू लागली.

सोमवार... सकाळचे दहा वाजले असतील. मीच गाडी चालवत होतो. शेजारच्या सीटवर वैजयंती होती. तिनंही सीटचा बेल्ट लावला होता. मागच्या सीटवर दहा

वर्षांची वत्सला. समोर हिरवा दिवा स्पष्टपणे दिसल्यावरच मी गाडी स्टार्ट केली होती. एक कार आणि दोन रिक्षा पुढं गेल्यानंतर.

डावीकडून वेगानं आलेल्या वाहनानं इतक्या जोरानं धडक दिली होती की वैजयंती जागीच मरण पावली होती. तिचा जीव गेलाय हे समजूनही जयकुमारनं आपलं मनोधैर्य ढळू न देता वत्सलेला एका रिक्षात घालून निम्हान्स हॉस्पिटलमध्ये नेलं होतं. त्या वेळी तिथल्या डॉक्टर उमेशनी तर त्याचं मनापासून कौतुक केलं होतं! 'मिस्टर जयकुमार, त्या प्रसंगी तुम्ही दाखवलेलं धैर्य असामान्य आहे! वत्सलेच्या मेंदूत रक्त साखळलं असतं तर मोठाच प्रॉब्लेम झाला असता! लगोलग ऑपरेशन केलंय. कदाचित हिच्या बुद्धीवर आणि स्मरणशक्तिवर काहीसा परिणाम होऊ शकेल; पण बाकी देहाला काहीही अपाय झालेला नाही. बोलणं, शिक्षण या गोष्टींना सुरुवातीपासून प्रारंभ करावा लागेल कदाचित. बघू या. दोनेक आठवड्यात चित्र स्पष्ट होईल.'

निदान राणी तरी वाचली या भावनेत तिच्या पुढच्या शिकवण्यात मी वैजयंतीच्या मृत्यूचं दु:ख मागे सारलं. त्यात कंपनीची कामं तर होतीच. सुरुवातीपासून तिच्या सर्वांगीण वाढीपर्यंत मला पदोपदी साथ देऊन तिनंच वाढवलेली संस्था ही! जशी आमची राणी ही आम्हा दोघांची निर्मिती होती, तशीच ही कंपनीही. तिच्या वैजयंती या नावात माझंही जय हे नाव गुंफलं गेलं होतं, हाही एक योगायोग होता! त्यामुळे कंपनीचं नाव 'जयंती हाय प्रोसिजन' ठेवताना दोघांच्या नावाचा विचार करून ते नाव ठरवलं होतं.

''यांच्या हाताखाली कितीही राबलं तरी काहीही चीज होणार नाही. त्याऐवजी आपण स्वत:ची कंपनी काढून त्यात एवढेच राबलो तर आपल्या मेहनतीचं चीज होईल.'

''त्यासाठी भांडवल आवश्यक आहे, ते आपण कुठून उभं करणार? आपल्यासारख्यांच्या दृष्टीनं हे केवळ स्वप्नच राहील!''

लग्नाच्या वेळी स्त्री-धन म्हणून आलेले दागिने मोडून भांडवल उभं करायचा विचारही तिचाच. मी सुचवलं, ''एकदम मोडायला नकोत. त्याऐवजी बँकेत ठेवून त्यावर कर्ज काढू या.''

''नको. उगाच व्याजाचा भार! उलट चांगले दिवस येतील तेव्हा आपण नवेच दागिने करू या.''

मी धैर्य करून जर्मनीला एका यंत्रप्रदर्शनासाठी जाऊन आलो आणि तिथं आम्हाला हवी तशी यंत्रं दिसली. त्यांच्यापैकी आवश्यक त्या यंत्राची खरेदीची पद्धत, नियम, पाठवायची पद्धत जाणून घेऊन भारतात आलो. बँकेशी संपर्क साधला, त्यानंतर त्यासाठी आवश्यक असलेल्या जागेची व्यवस्था करण्यात पुढचं दीड वर्षं

गेलं. अशा प्रकारे साडेतीन वर्षांनंतर त्या कारखान्यातून उत्पादन मिळू लागलं. त्यानंतर वैजयंतीनं आपली जुनी नोकरी सोडली आणि खाकी शर्ट आणि पॅण्ट घालून कामगारांबरोबर फॅक्टरीत कामाला येऊ लागली. एकदा भरत शहा दहा एकर जमीन विकतोय असं समजल्यावर तिनं ती विकत घ्यायला लावली तर होतीच, शिवाय आर्किटेक्टबरोबर बसून तिनं नव्या इमारतीचं बांधकाम देखणंही व्हावं म्हणून त्यातही तेवढाच रस घेतला होता. प्रत्येक कामगार कारखान्यात प्रवेश करण्याआधी ज्या मार्गानं यायचा तिथं तिनं विस्तीर्ण बगिचा ठेवला होता.

- ५ -

दोघींमधला हा फरक हिच्याशी लग्न झाल्यावरच नव्हे, कामभावना प्रबल होऊन तिच्या प्रभावाखाली आल्यापासूनच त्याला जाणवत होता. त्याच बरोबर, आपण वैजयंतीच्या स्मृतीशी प्रतारणा केल्याची शिक्षा म्हणून हे भोग आपल्या नशिबी आले आहेत, असं वाटून त्याचं मन खंतावत होतं. त्यात काल दोन लाख लाच देऊन स्वत:ची सुटका करून घेऊन आल्यावर तर, तिच्यावरच्या रागाबरोबरच परमेश्वरानं आपल्याला अगदी योग्य शिक्षा केली असं वाटून स्वत:वर आसूड उगवल्यावर जाणवावी तशी आत्मनिर्भर्त्सनेची भावना जाणवत होती. आता आपल्या व्यक्तित्वाचा कडेलोट झाला आहे, आपण आता व्यक्तित्वहीन माणूस आहोत अशी त्याची भावना झाली होती.

त्या वेळी हिच्याकडे लक्ष गेलं, त्यात आश्चर्य ते काय! वस्तुत: हिची वैजयंतीनंच पर्सनल सेक्रेटरी म्हणून नेमणूक केली होती. हीही इंग्लिशमध्ये एम.ए.पर्यंत शिकली होती. दिलेलं डिक्टेशन उत्तम भाषेत मांडताना ती कुठल्या देशासाठी कशा भाषेचा वापर केला तर चांगलं, याचाही विचार करायची. तशा भाषेत उत्तम प्रकारे कॉम्प्युटर प्रिंट काढून समोर आणून ठेवायची, तेव्हा मनात न कळत 'वाहावा' उमटायचं.

ती विधवा असावी अशी माझी समजूत होती, कारण कपाळावर कधीही कुंकू किंवा टिकली नसायची. अंगावर बहुतेक वेळा सलवार-कमीज असायचा. क्वचित कधीतरी साडी, चेहऱ्यावर नेहमी सुतकी कळा! हसण्याचं नामोनिशाण नाही, पण तरीही चेहरा सुंदर आणि देहयष्टीही आकर्षक!

वैजयंती मरण पावल्यावर ही माझी पी.ए. झाली. कार्यशक्ती आणि बुद्धिमत्ता यामुळे तिनं माझं लक्ष वेधून घेतलं. प्रेम आंधळं असतं, असं म्हणायची पद्धत आहे, पण कामभावना आंधळी असते, असं म्हणणं अधिक योग्य होईल. मनात कामभावना निर्माण झाली की त्यावर परिहार म्हणून हिचीच आठवण न चुकता व्हायची. घेतलेल्या पगाराच्या बाबतीत तिची निष्ठा वादातीत होती.

एकदा, कुठून तरी गप्पा सुरू करायच्या म्हणून मी म्हटलं, ''इंग्लिशमध्ये

एम.ए. केलंत. कुठं तरी लेक्चरर व्हायच्याऐवजी इथं का आलात?''

''मिळायला हवी ना तशी नोकरी! आणि हे कामही तसं इण्टरेस्टिंग आहे!'' ती म्हणाली.

असाच आठवडा गेला. होय, संपूर्ण एक आठवडा! स्वत:च्या नकळत दुपारच्या वेळी मी माझ्या मोठ्या चेंबरच्या शेजारी असलेल्या तिच्या छोट्या खोलीत गेलो. ती कॉम्प्युटरवर काम करत होती. टेबलावरची बेल वाजवून हव्या त्या अधिकाऱ्याला आपल्या चेंबरमध्ये बोलावून घ्यायची माझी नेहमीची पद्धत. सगळ्याच अधिकाऱ्यांची ती पद्धत असते म्हणा! पण माझ्या फॅक्टरीत तसा मोठेपणा दाखवायच्या प्रथांचं मी अवडंबर ठेवलं नव्हतं.

''तुम्हाला मी जी वेळ सांगितली होती, त्यात बदल करायचा होता.'' माझ्याकडे कारण तर तयारच होतं. ती उठून उभी राहिली. तिला बसायला सांगत असतानाच माझं तिच्या टेबलावरच्या पुस्तकाकडे लक्ष गेलं. 'स्त्री-मुक्तीची बारा पावले.' ते मी हातात उचलून घेतलं. 'स्त्री-मुक्ती' हा विषयही मला काही पूर्णपणे नवा नव्हता. मार्केटिंगच्या कामासाठी युरोप-अमेरिकेचे दौरे करणाऱ्याला हे न ठाऊक असून कसं चालेल? मी विचारलं, ''हे पुस्तक मी वाचायला घेऊन जाऊ?''

''जरूर!'' ती म्हणाली.

मी पुस्तक चाळलं. चौथ्या प्रकरणानं माझं लक्ष वेधलं. त्या प्रकरणाचं नाव होतं, 'स्त्री-मुक्ती आणि लैंगिक स्वातंत्र्य.' माझ्या चेंबरमध्ये आल्या-आल्या मी ते प्रकरण वाचायला सुरुवात केली. '...पुरुषप्रधान समाजानं निर्माण केलेल्या नीति-नियमाच्या कल्पना कवटाळून जगत राहिलं तर स्त्रीला लैंगिक स्वातंत्र्याचा अनुभव येणं शक्यच नाही. तिला हे स्वातंत्र्य मिळू नये म्हणून जगात सर्व ठिकाणी आणि समाजात अनेकानेक नैतिकतेच्या कल्पना निर्माण करण्यात आल्या आहेत. आपल्या इच्छेप्रमाणे हव्या असलेल्या पुरुषाशी रत व्हायचा अधिकार स्त्रीला का असू नये? तिच्या अशा प्रकारच्या वागण्याला हीन कल्पून तिची अवहेलना करणं हे असांस्कृतिक आहे... सोळा वर्षे होऊन गेलेल्या कुठल्याही स्त्री-पुरुषाला लैंगिकतेचं मुक्त स्वातंत्र्य समाजात असलं पाहिजे... पण यात कुठेही बळजबरी असता कामा नये... या बाबतीत पुरुषापेक्षा स्त्रीला अधिक स्वातंत्र्य दिले जावे...

तिनं नजर वर करून माझ्याकडे रोखून पाहिलं. मीही तिच्या नजरेत नजर मिसळून पाहिलं. तिच्या नजरेची निरगाठ माझ्या नजरेला बसली.

''उद्या सकाळी दहा वाजता येणार? जमेल?''

''हो!'' ती उत्तरली.

त्या रात्री मला नीट झोप लागली नाही.

ठरल्याप्रमाणे मंगळा ठीक दहा वाजता आली. मी तिचा हात धरून बेडरूममध्ये

घेऊन गेलो. तिनं आढेवेढे घेतले नाहीत. तिला पलंगावर बसवली. जवळ घेतली. तिनं प्रत्येक बाबतीत सहकार्य दिलं. मी आदले दिवशी दुकानातून आणलेला रबरी निरोध जवळच्या टेबलाच्या ड्रॉवरमध्ये ठेवला होता. तो काढून मी त्यावरचं कव्हर काढू लागलो.

''नको! ते नको!'' ती म्हणाली.

''काही झालं तर?''

''काही नाही होणार!''

वाटलं, ही विधवा असली तरी एक-दोन मुलं झाल्यावर ऑपरेशन झालं असावं, म्हणून असं म्हणत असावी. कामवासना प्रबल असताना सगळंच आपल्याला सोयीस्कर असंच वाटतं ना!

मग काय! अडीच वर्षांची भूक एकदम भडकल्यासारखी झाली... मी तिला एकवचनानं हाक मारली. तिनंही.

क्षणभर मी चमकलो, तरीही त्यामुळे सुखात बाधा आली नाही.

त्या नंतरच्या श्रांत क्षणी तिनं विचारलं, ''कसं वाटलं?''

''छान!''

दोघेही गाडीनं फॅक्टरीपाशी आलो. तिला चौकात उतरवून मी पुढं गेलो.

- ६ -

फॅक्टरीत जाऊन पोहोचलो तेव्हा मन अपराधी भावनेनं भरून गेलं होतं. इमारतीच्या मोठाल्या भिंतीवर लावलेला वैजयंतीचा मोठा फोटो नजरेला पडताच बायको वारल्यावर दुसरं लग्न करणं ही काही फार वेगळी गोष्ट नाही आणि मीही काही लग्न केलेलं नाही म्हणा! करणारही नाही. शरीरधर्म म्हणून ती एक घटना घडून गेली, एवढंच...


यासाठी स्वत:ला क्षमा करता येईल, पण याच फॅक्टरीत माझ्या हाताखाली काम करणाऱ्या एका स्त्रीशी असे संबंध आल्यावर संस्थेची शिस्त काय राहिली? ह्या फॅक्टरीची सुरुवात करत असतानाच ज्या नैतिकतेची पायाभरणी केली होती, तीच नष्ट झाल्यासारखं वाटू लागलं, पण हे सगळं चूक करायच्या आधी का लक्षात आलं नाही? हे त्याच वेळी लक्षात आलं असतं तर ही चूक घडलीच नसती, असं तीव्रपणे वाटलं. संपूर्ण दिवसभर मन शरमेत बुडून गेलं होतं. खरं तर कितीतरी महत्त्वाची पत्रं पाठवायची होती, पण त्यासाठी तिला बोलावून, समोर बसवून डिक्टेशन देणं अवघड वाटत होतं. हिच्याऐवजी आणखी कुणाला तरी... नको. त्यापेक्षा हिलाच बोलावून घेऊन स्पष्टपणे 'झालं ते होऊन गेलं... त्यात चूक कुणाची या चर्चेला आपण थारा द्यायला नको... तुम्हाला दोन-तीन लाख देतो. तुम्ही आणखी कुठे तरी नोकरी बघा, त्यासाठी मीही हवं तर मदत करेन... म्हणजे आपली

दोघांचीही या अवघड परिस्थितीमधून सुटका होईल...' असं सांगितलं तर?

रात्री लवकर झोप आली. सकाळी जाग आली तेव्हा मन हलकं झालं होतं. मी काही दुसरं लग्न केलेलं नाही. वैजयंतीच्या गळ्यात बांधलेल्या पवित्र मंगळसूत्राशा द्रोह केला नाही! ही फक्त शरीराची अपरिहार्य गरज म्हणून घडलेली घटना होती.

त्याच वेळी आदल्या दिवशी अनुभवलेल्या सुखद स्पर्शाच्या आठवणीही तिला बघताच जागृत झाल्या होत्या. माझ्याही नकळत मी म्हटलं, "उद्याही त्याच वेळी घरी ये!"

◈


**३ री आवृत्ती**

# पाठदुखी घालविण्यासाठी योगसाधना

मूळ लेखिका : **बिजयालक्ष्मी होता**
अनुवाद : **प्रशांत तळणीकर**

**किंमत : ७०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**

मानेच्या मणक्यांना सूज येणं (सर्व्हायकल स्पॉण्डिलायटिस), स्लिप-डिस्क, सायटिका प्रोलॅप्स, आतड्यांमधील वायुदोष आणि स्कोलिओसिस यांसारख्या विविध प्रकारच्या पाठीच्या दुखण्यांसंबंधी आणि त्यावरील साध्या, सोप्या पण तरीही परिणामकारक योगिक आणि नैसर्गिक उपायांची माहितीया पुस्तकामध्ये वाचकांना मिळेल.

बिजयालक्ष्मी होता या एक नामांकित योगचिकित्सक असून गेली पंचवीस वर्षं या क्षेत्रात काम करत आहेत. अस्थमा, सांधेदुखी, पाठदुखी इ. पासून ते विविध प्रकारच्या गाठी (ट्यूमर) आणि कर्करोगापर्यंत अनेक आजारांवर त्यांनी यशस्वी उपचार केले आहेत.




# भालचंद्र नेमाडे यांना जनस्थान पुरस्कार

## *पुस्तक किंवा लेखक हे कधीच मोठे नसतात. ते मोठे केले जातात.*

''आपल्याकडे लेखकांपासून सर्वांचा हा भ्रम आहे की, अमुक अमुक माणूस मोठा झाला म्हणजे त्याचे वाङ्मय शुद्ध वाङ्मयीन निकषांनुसार निर्माण झाले असावे. हे एक पुन्हा समीक्षेला खोडून काढावे लागेल की पुस्तकं किंवा लेखक हे कधीच मोठे नसतात. ते मोठे केले जातात. शुद्ध असे वाङ्मयीन निकष कोणत्याही साहित्यात सापडल्याचा पुरावा नाही. प्रत्येक संस्कृतीचे, प्रत्येक काळाचे, वेगवेगळे निकष असतात. आणि त्यानुसार ग्रंथ किंवा लेखक थोर केले जातात. म्हणजे मुळात असं म्हणता येईल की चारपाचशे वर्षानंतर काही मोठे लेखक विसरले जातात. काही नवीन तयार होतात. सातत्यानं मोठे राहिलेत असे फार थोडे लोक असतात. पण हे ठरवतं कोण? तर हे समाज ठरवतो.'' ...

''दर वर्षांनी येणारी नवी पिढी जुन्या लेखकांना बाद करते; नव्या लेखकांना उभारत असते.'' हे प्रतिपादन कोणाचे असावे असा प्रश्न वाचकांना पडला असेल. नुकताच ज्यांना मराठीतील अत्यंत मानाचा, कुसुमाग्रज यांच्यासारख्या मातबर व्यक्तिमत्त्वाशी निगडित असणारा जनस्थान पुरस्कार देण्यात आला, त्या राजमान्य राजश्री भालचंद्र नेमाडे यांचे हे अवलोकन आहे.

ऐन पंचविशीत त्यांची कोसला ही 'कादंबरी' प्रसिद्ध झाली, आणि मराठी साहित्य– समीक्षाक्षेत्रात जबरदस्त खळबळ उडाली. ग्रामीण खानदेशातून पुणे या सुप्रतिष्ठित विद्यानगरीत महाविद्यालयीन शिक्षणासाठी आलेल्या आणि कॉलेजच्या वसतिगृहात राहणाऱ्या तरुणाला आपली भाषा, आपला वेश, आपल्या सवयी, आपला गावढळपणा, बुजरेपणा, आर्थिक अडचणी, प्राध्यापकांशी संवाद साधण्यात

जाणवणाऱ्या त्रुटी, मुलींशी बोलताना वाटणारा संकोच, मेसच्या व्यवस्थापनात बसलेला आर्थिक फटका- यामुळे एकीकडे जाणवणारी न्यूनगंडाची भावना आणि दुसरीकडे या सर्वांवर मात करण्याची, शहरी मध्यमवर्गीय मूल्ये झुगारून देऊन आपले स्थान निर्माण करण्याची वाटणारी खुमखुमी यांचे प्रत्ययकारी चित्रण 'कोसला' मध्ये आले आहे. ग्रामीण भागातून किंवा कनिष्ठ वर्गातून शहरात येणाऱ्या प्रत्येक तरुणाचीच अशी कुचंबणा होत असते, त्यामुळे तिचा मुक्तपणे होणारा हा स्फोट प्रत्येकाला आपल्याच भावभावनांचा उद्रेक वाटला. 'कोसला' ची उदाहरणार्थ, भंकस, वैताग, वगैरे हॉस्टेलमधील बोली, चुरचुरीत मिश्किल, व्यंगात्मक निवेदन शैली, लीळाचरित्रातील महानुभाव मराठीचे अनुकरण वगैरे प्रथम दर्शनीच वाचकांवर प्रभाव टाकणारे होते. पांडुरंग सांगवीकर प्रमाणेच कादंबरीच्या रूढ चौकटीत ही कादंबरी 'मिसफिट' होती. त्यामुळे या कादंबरीची समीक्षा कशी करायची असा प्रश्न परंपराप्रिय नेमस्त समीक्षकांना पडला. तिच्यातील नवनैतिकवादाने हा गोंधळ जास्तच वाढला. कादंबरी म्हणजे कथानक, व्यक्तिरेखा, वातावरण, संघर्ष, जीवनविषयक दृष्टिकोन आणि मूल्यभान, निवेदन, वर्णनशैली वगैरे घटक हे खरे; पण हें निकष या कलाकृतीला लागू करणे सोपे नव्हते. ही कादंबरी म्हणजे एक चकवा आहे अशीच बहुतेकांची भावना झाली. व्यक्तिरेखा उभी करणे वा नायक-खलनायक यांच्यातील संघर्ष चितारणे हा या कादंबरीचा हेतूच नव्हता. अपरिचित समाजात आपले अस्तित्व आणि वास्तव्य अर्थपूर्ण करण्याची धडपड चालू असताना नातेसंबंध, शिक्षणसंस्थेतील वातावरण, मानहानीचे प्रसंग यामुळे सगळे काही निरर्थक वाटणे, फोल वाटणे, भंकस वाटणे, वैताग येणे, परकेपण जाणवणे हे सर्व आत्माविष्काराचेच प्रकरण होते. ते समीक्षेच्या तत्कालीन मान्यताप्राप्त चौकटीपलीकडचे होते. पण तरीही ते हृदयाला भिडणारे, स्पर्श करणारे होते. जे.डी. सॅलिंजरच्या 'दि कॅचर इन दि राय' कादंबरीशी कोसलाची सांगड घालण्याचा मार्ग इंग्रजी वाचन असणाऱ्यांना सापडला. पण 'कोसला'चे देशीपणही अस्सल होते. वादातीत होते.

'कोसला' वादग्रस्त पण वाचनीय कलाकृती म्हणून गेली साठ वर्षे सतत चर्चेत आहे.

भालचंद्र नेमाडे यांनी 'कोसला'नंतर बिढार, जरीला, झूल, हूल या चार कादंबऱ्या १९८५ ते १९९५ दरम्यान लिहिल्या. त्यात कोसलाची वैशिष्ट्ये होतीच. शिवाय नेमाडे यांनी प्राध्यापक म्हणून काम करताना आलेले शिक्षणक्षेत्रातले अनुभव, सामाजिक ताणतणाव, संस्थाचालकांचे रागलोभ यांचे सर्वंकष चित्रण केले होते. हे कादंबरी चतुष्ट्य सर्वसाधारण आत्मकथनाच्या वळणावर जाणारे असल्याने समीक्षकांचा गोंधळ उडवणारे नव्हते. परंतु २०१० मध्ये बाजारात आलेल्या 'हिंदू'च्या पहिल्या खंडाने 'कोसला'ची परंपरा परिपुष्ट केली. 'हिंदू' मध्ये इतक्या

व्यक्तिरेखा, इतक्या उपकथानकांच्या गुंतागुंती, घटना प्रसंग निरीक्षणे, बोली भाषांचा वापर, गॉसिपच्या पातळीवरच्या नोंदी, स्थळे, जाती-धर्म-विशेष यांची सरमिसळ आहे की समीक्षकांचाच नव्हे तर वाचकांचाही गोंधळ उडावा. 'हिंदू' ही एक व्यामिश्र बृहत्कथा आहे. ती काय काय आपल्या पोतडीतून बाहेर काढणार याचा काहीच अंदाज येत नाही. थांग लागत नाही, ''मी धडधड धडधड लिहिणारा, बोलणारा लेखक आहे. वाचकांना गोंजारायला मला वेळ मिळत नाही. उलट त्यांना मी धारेवर धरून असतो. खरे तर मराठी माणसांच्या वृत्ती, स्वभाव प्रवृत्ती तत्त्वप्रणाली, जातीवार उतरंड यावर संपूर्ण चेतनेचे लिहिणे ही माझी वृत्ती आहे.'' असे ते म्हणतात, ते निश्चितच वस्तुनिष्ठ वाटते.

हिंदू या कादंबरीचे एक वैशिष्ट्य म्हणजे ती प्रथमपासून शेवटपर्यंत सलग वाचण्याची गरज नाही. कुठलेही पान उघडावे आणि वाचत जावे. प्रा. प्रभा गणोरकर यांनी म्हटले आहे **''आयुष्याला कोणताही तपशील या कादंबरीला वर्ज्य नाही... प्रचंड पसारा आणि असंख्य तपशील असूनही या कादंबरीतले अंतःसूत्र कोठेही विस्कळीत होत नाही. ही कादंबरी एका संस्कृतीतल्या चिवट मानवी वंशाचा भव्य, सेंद्रिय परिपूर्णत्वाने विस्तारलेला, शतकांमध्ये पसरलेला, फांद्यांनी लगडलेला विस्तृत अवकाश आपल्यापुढे साक्षात उभा करते.''**

'कोसला'चा उलगडा करताना सॅलिंजरच्या 'कॅचर इन दि राय'चा उपयोग होतो. 'हिंदू'ची संगती लावताना जेम्स जॉइसच्या 'युलिसिस'चा संदर्भ उपयुक्त ठरतो. युलिसिसचा मराठी अवतार म्हणजे हिंदू असे म्हणायला हरकत नाही. यातही एका वेगळ्या प्रकारे संज्ञाप्रवाहाचे तंत्र कार्यरत आहे.

'' 'हिंदू'मध्ये आपल्याला आत्मविश्वासाने ओतप्रोत भरलेली, संवादात कोठेही न अडखळणारी सशक्त मराठी भेटते आणि दिपवून टाकते... स्वतःच्या कथनावर लेखकाचा विश्वास असला आणि निवेदनाची उर्मी असली की भाषा कशी साकारते याचा विस्फारून टाकणारा अनुभव ही कादंबरी देते.'' असे निरीक्षण प्रा. सुहास पळशीकर यांनी नोंदवले आहे.

जनस्थान पुरस्कारामुळे कोसलाकार नेमाडे हिंदू अस्मितेचे भाष्यकार, नोंदकार (डॉक्युमेंटेशनकार) म्हणूनही मराठी वाचकांच्या मान्यतेला पात्र ठरले, असे म्हटले तर ते सर्वथैव उचित ठरेल. लेखक-कलावंतांना मोठे करण्याच्या प्रभावी मार्केटिंग तंत्राचेही हे एक नेमाडपंथी प्रात्यक्षिक ठरावे.

### ❋ दिल्लीतील जागतिक ग्रंथजत्रा

४ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी या दरम्यान दिल्लीतील प्रगती मैदानावर आंतरराष्ट्रीय ग्रंथजत्रेची गजबज होती.

ग्रंथप्रेमींना आणि रसिकांना नवनवे ग्रंथ पाहण्याची आणि भारतातील आणि परदेशातील नामवंत लेखककवींना भेटण्याची वार्षिक पर्वणी म्हणून दिल्लीतील प्रगती मैदानावर फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवड्यात भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय ग्रंथजत्रेने गेली ४० वर्षे ख्याती मिळवली आहे. गेल्या वर्षापर्यंत ही ग्रंथजत्रा दर दोन वर्षांनी भरत असे. या वर्षापासून ती आता दरवर्षी होणार आहे. आफ्रो-एशियन देशातील ही सर्वात मोठी ग्रंथजत्रा गणली जाते. ४४ हजार चौरस फूट क्षेत्रात सुमारे २००० स्टॉल्स, तीस देशांचा सहभाग, लक्षावधी वाचक-ग्राहकांची उपस्थिती, ग्रंथप्रकाशन, चर्चासत्रे, परिसंवाद लेखक तुमच्या भेटीला, कविसंमेलने, कथाकथन, बालसाहित्याचे दालन वगैरे कार्यक्रमांची रेलचेल असल्याने ही ग्रंथजत्रा म्हणजे केवळ पुस्तकांचे प्रदर्शन न राहता एक वाङ्मयीन उत्सव, लिटररी इव्हेंट म्हणूनही रसिकांना आकृष्ट करते. फ्रँकफर्ट बुकफेअर, लंडन बुकफेअर यांच्याच प्रमाणे दिल्लीची ही ग्रंथजत्रा देशविदेशातील प्रकाशकांना पुस्तकांचे हक्क देण्याघेण्याचे केंद्र म्हणूनही विकसित होत आहे. मी १९७२ पासून २००२ पर्यंत या ग्रंथजत्रेला आवर्जून हजर राहत असे. तिला जोडूनच मुद्रणयंत्रांचे प्रिंटेक्स हे प्रदर्शनही सर्वसामान्यपणे भरवण्यात येते. त्यामुळे विविध भाषांतील नवेजुने साहित्य आणि लेखक-प्रकाशक यांच्याच जोडीने मुद्रणक्षेत्रातील प्रगतीचे आणि नव्या तंत्रज्ञानाचेही दर्शन घडत असे.

या वर्षी या ग्रंथजत्रेचा केंद्रवर्ती विषय म्हणून 'भारतातील लोकसाहित्य आणि आदिवासींच्या साहित्याचे वैविध्य (मॅपिंग) हा असून गेस्ट ऑफ ऑनर म्हणून फ्रान्स या देशाला सन्मान देण्यात आला होता. फ्रेंच साहित्य, संस्कृती, संगीत, चित्रपट, लोककला, खाद्यपदार्थ यांचा आस्वाद रसिकांना घेता आला. फ्रेंच व भारतीय साहित्य यांच्यातील अनुवाद प्रक्रियेच्या दृष्टीने चर्चा झाल्या. हक्कांची देवाणघेवाण झाली. फ्रेंच साहित्यकार ही यावेळी उपस्थित होते. भारत हा (सर्वाधिक) इंग्लिश बोलणाऱ्या आणि जाणणाऱ्या देशांमध्ये पहिल्या पाच देशात गणला जातो. इंग्लिशमधील पुस्तकांची विक्री भारतात अमेरिकेच्या खालोखाल होते. सुमारे १४ हजार कोटी रुपयांची इंग्लिश पुस्तके भारतात दरवर्षी विकली जातात, अनेक देशातही निर्यात होतात हे वाचून अनेकांना आश्चर्य वाटेल. पण खरे तर यात आश्चर्य वाटण्याचे काही कारण नाही. भारतात ६ लाख प्राथमिक व माध्यमिक शाळा आहेत. एक हजार महाविद्यालये, २०० व्यावसायिक विद्यालये, ४५ केंद्रीय विद्यापीठे, २८५ राज्य विद्यापीठे, १३० अभिमत विद्यापीठे, ११२ खासगी विद्यापीठे आहेत. १३ कोटी विद्यार्थी आहेत. त्यापैकी १३६ लाख माध्यमिक शालेय तर ४५ लाख महाविद्यालयीन, विद्यार्थी आहेत. १५ लाख शिक्षक आहेत. हे आकडे लक्षात घेतले तर दरवर्षी पाठ्यपुस्तकांवर होणारा खर्च इतका अवाढव्य याचे काही आश्चर्य वाटायला नको. एस. चांद ही शतायुषी प्रकाशनसंस्था दरवर्षी

३ कोटी पुस्तके (प्रती) प्रसिद्ध करते आणि तीनशे कोटींच्या घरात तिची उलाढाल होते. यंदाच तिने विकास पब्लिशिंग ही कंपनी विकत घेतली. या कंपनीतर्फे कॉलेजची व शालेय पुस्तके शंभर कोटींची विकली जातात. बालभारती महाराष्ट्रात सुमारे ६ कोटी पुस्तके विकते. पुस्तकांची एक प्रचंड मोठी बाजारपेठ म्हणून भारताकडे इंग्लंड अमेरिकेप्रमाणे इतरही प्रगत देश पाहतात. त्यामुळे या पुढच्या काळात जागतिक ग्रंथजत्रेसारखे उपक्रम अधिकाधिक महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. प्रकाशनांच्या आऊट सोर्सिंगसाठीही भारत हे सोयीचे केंद्र ठरत आहे. २०-२२ भाषांमध्ये पुस्तके प्रकाशित करणारा भारत सोडला तर अन्य कुठला देश नाही. प्रगती मैदानावरील ही जागतिक ग्रंथजत्रा भव्य तर असतेच, जगातला प्रचंड ज्ञानाचा व माहितीचा खजिनाही ती खुला करते. ई-बुक्सच्या आणि डिजिटल क्रांतीच्या या आरंभपर्वात भारतीय प्रकाशनक्षेत्राला फार मोठा अवकाश असून भारतीय भाषांतील साहित्यालाही त्यामुळे विकासाच्या दशदिशा खुणावत राहतील.

लेखक प्रकाशक ग्रंथविक्रेते या सर्वांनीच या ग्रंथजत्रेला भेट देऊन प्रकाशन क्षेत्राचे विश्वरूप जाणून घ्यायला हवे. मराठीतील फारच थोडे प्रकाशक या जत्रेला भेट देतात. त्यामुळे आपण ज्या व्यवसायात आहोत त्या बद्दलचे त्यांचे एकूणच आकलन तोकडे राहते.

**– शंकर सारडा**
ई १० पाटील रिजन्सी, १५, एरंडवणे, पुणे -०४
मो. ९८२३२६१०२३

## ❋ वाङ्मयशोभाचे म. म. केळकर यांची जन्मशताब्दी

जुन्या पिढीतील मराठी वाचक 'वाङ्मयशोभा'कडे मराठीतील सोज्वळ आणि कौटुंबिक-सोवळे-कथाकवितांचे मासिक म्हणून पाहत. ते शेवटपर्यंत चालविणारे संपादक, मनोहर महादेव केळकर यांचे हे जन्मशताब्दी वर्ष. (जन्म २१ मार्च १९१३ : निर्वाण ५ नोव्हेंबर १९९४) काळप्रवाहात ते त्यांच्या मृत्यूनंतर बंद पडले. त्यांची जन्मशताब्दी त्यांचे रसिक स्नेही-कुटुंबीय, येत्या मार्चमध्ये पुणे येथे साजरी करीत आहेत.

मनोहर महादेव केळकर ('म.म.के.') यांचे शिक्षण B.A. LLB होते व १९३७ पासून सुमारे २५० पुस्तके ही 'मनोहर ग्रंथमाला' स्वरूपात प्रसिद्ध केली. ''स्वभावाला औषध नाही'' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे.

दहा वर्षे मद्रासला राहून मी महाराष्ट्रात १९७३ मध्ये परतलो. अचानकपणे 'म.म.के' यांचे पत्र आले. जळगाव येथे बंधूंकडे मी येत आहे. सुनबाई नलिनीसह अमुक अमुक ठिकाणी भेटा. आज जळगावात त्या ठिकाणी तेव्हाचा तो लाल


कौलारू बंगला शिल्लक नाही. तेथे आज 'केळकर मार्केट' हा भव्य मॉल उभा आहे. रिक्षावाला बरोबर नेतो इतका तो प्रसिद्ध आहे. नेहमी पुण्यात भेटणारे नाना, आम्हा उभयतांना त्या दिवशी प्रथम जळगावात भेटले. आज इतक्या वर्षांनंतरही आठवण ताजी आहे.

वाङ्मयशोभेत मी खूप कथा, खूप ललित लेख लिहिले. त्यापैकी एक लेख ज्ञानेश्वरांबद्दलचा होता. त्यामध्ये दूरान्वयाने ज्ञानेश्वरांना कमीपणा ध्वनीत होत होता. लेख प्रसिद्ध करण्यापूर्वी म.म.के. नी मला सावध केले. वाचकांकडून जर काही टीका/हरकत आली तर तोंड देण्यास तयार आहात का? असे स्पष्टपणे मला विचारले. माझे मौन त्यांना समजले. मग त्यांनी मला समजावले, ''हेच सारे कथेच्या स्वरूपात लिहा. कथेमधील एका पात्राच्या तोंडी ती वाक्ये टाका. अहो, लोकांच्या पूजनीय भावनांना धक्का न लावता, हे छापू की!'' त्याप्रमाणे 'एक बिचारा अज्ञानी-मी' ही कथा वाङ्मयशोभेच्या फेब्रुवारी- १९७७च्या अंकात प्रसिद्ध झाली. ते सारे राजस-तामस. पैकी सर्वोत्तम सात्विक दानाचे ज्ञानेश्वरीत विवेचन करताना ते उदाहरण असे देतात : सेवक भोजनानंतर राजाला विडा बनवून देतो. ते पान, सुपारी-कात-लवंग सारे राजाचेच. बनवून देण्याबद्दल राजा त्याला पगारही देतो, तरीही त्याला राजाची खुशी पाहून धन्यता वाटते. दुसरे उदाहरण मात्र वेगळेच आहे : ज्ञानेश्वरी अध्याय : १७.

**मा तेयाया ठाई वित्ता । निवर्तवावी स्व-सत्ता**
**परी प्रिया पुढे कांता । रिगे तैसे नि ।।**

स्त्री जेव्हा पतीला सर्वस्व अर्पण करते तेव्हा काय उपकाराची भावना असते? आपण होऊन ती स्वत:च्या शरीरावरील सत्ता काढून घेते, एकेक वस्त्र दूर करते. पतीच्या समाधानातच तिचे समर्पण पूर्ण होते. सात्विक दान म्हणजे– तुझे तुला अर्पण– ! या ठिकाणी माझ्या कथेचा नायक, नायिकेला विचारतो : ज्ञानेश्वर ब्रह्मचारी होते. ज्ञानेश्वरी लिहिली सोळाव्या वर्षी. मग त्यांना कोणता अनुभव होता? त्यावर कथेची नायिका उत्तर देते : ''सोळा वर्षांच्या ब्रह्मचारी पुरुषाने कदाचित् स्त्री पाहिलेली असेल, पण त्याला स्त्री समजलेली नक्कीच नसणार. इथेही नाही. अहो, स्त्री स्वशरीरावरील सत्ता काढून घेणे दूरच, त्याच्याही शरीरावर सत्ता गाजविते. निदान 'त्यावेळी' तरी!'' कथेचा नायक स्वत:लाच अज्ञानी समजतो. अर्थातच या कथेवर वाचकांची टीका आली नाही. कारण ती कल्पित कथा होती. म.म.के यांनी आपल्या दूरदर्शी वृत्तीने मला वाचविले होते– आणि स्वत:लाही.

**- चंद्रकांत अंबाडे**
नलिनी - ३, शांतीनगर, सोपान कॉलनी, भुसावळ जि. जळगाव.
मो. ९३७२६९४४००




**आगामी**

# प्रेमाची परिभाषा

मूळ लेखक

**अँड्रो लिंकलेटर**

अनुवाद

**मेघना जोशी**


पामेला किराज नावाची अतिशय चंचल, हेकेखोर आणि सुंदर तरुणी डोनाल्ड हिल नावाच्या रॉयल एअरफोर्समधील एका रुबाबदार आणि देखण्या पायलटला १९३९ च्या वसंतऋतूमध्ये भेटली आणि ते दोघे एकमेकांच्या प्रेमामध्ये पडले. इतर जोडप्यांप्रमाणेच त्यांना त्यांचा विवाह लांबणीवर टाकावा लागला, कारण जर्मनीबरोबरचे दुसरे महायुद्ध अगदी उंबरठ्यावर येऊन ठेपलेले होते आणि डोनाल्ड हिलची हाँगकाँगला नेमणूक झाली होती. तेथे भविष्यामधील होऊ शकणारा संभाव्य धोका लक्षात घेऊन डोनाल्डने सांकेतिक भाषेमध्ये डायरी लिहायला आरंभ केला.होता. त्याचे शब्द आकड्यांमध्ये रहस्यमयरीत्या बांधले गेले.

युद्धाहून परत आलेला डोनाल्ड हा विलक्षण बदललेला होता. तो युद्धकैदी म्हणून जपानी सैन्याच्या युद्धछावणीत असताना त्याचा अतोनात शारीरिक आणि मानसिक छळ झाला. त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्याची प्रेयसी आणि पत्नी पामेला हिने त्याच्या डायरीतील रहस्याची उकल करण्याचे ठरवले. डायरीमध्ये असणाऱ्या त्या आकड्यांत नक्कीच काही तरी संदेश असणार. आपण ज्या माणसावर अतोनात प्रेम केले, त्या माणसाला संपूर्णपणे जाणून घ्यायचे असेल; तर डायरीमधील रहस्य उलगडलेच पाहिजे म्हणून ती तिला एका गणितज्ज्ञाला भेटते.

त्याने त्या डायरीचा रहस्यभेद केला.

# Event In Pune

Mehta Publishing House went for a day long exhibition at The Westin, Koregaon Park, Pune dated 17th February 2013. It was open from 09:00 a.m. to 07:00 p.m. at the venue with one of the most coveted columnist and novelist of current times Ms. Shobhaa Dè as the chief guest of the event.



The event was organized by Indian Medical Association under the theme "Celebration of Womanhood - Women's Health and Safety Conference" and witnessed a turnout of more than 700 Doctors and guests from across Maharashtra and other parts of the country. Among the other exhibitors at the event (with the most being pharma companies)

## English Books

Mehta Publishing House emerged as the crowds' favorite with a vast variety of Marathi as well as English books in the offering to its readers. In addition to this, we also offered a special Sunday Discount only for a day for the event @ 10% on the MRP of the books. This infused the book lovers to get closer to the books for their advantage.

While at our stall at The Westin on 17th February 2013, Ms. Shobhaa Dè not only appreciated our organization for its successful diversification into English books but also appreciated our dedication towards providing the book lovers the best doze of literature from a vast spool of genres. She was happy signing of the books for all her reader fans and was generous enough to recommend Mehta Publishing House among all the others for buying her books. The most noteworthy fact here is that Ms. Dè is one of the most sought after authors among our vast bandwagon of writers with books like Speedpost, Selective Memories in the offering.

In all, it was an event to long for and rejoice. We thank Ms. Shobhaa Dè, Indian Medical Association, The staff of The Westin - Pune and above all our readers from all parts of the country and world for their constant support and best wishes.

And last but not the least, we would like to congratulate our sales team for their fabulous organizing and coordination for the event.


Happy Reading all !!!!!

◈


# Backlist





The Meaning of Madness




Parenting The Office




Speeches of War & Peace




Novgorod Diary




## Helen Garner

Helen Garner, who born in 1942, lives in Australia. She has written both fiction and non-fiction, and has been a Journalist, and her writing has been nominated for and won many awards. This is her first novel in fifteen years.

# Book review

## The Spare room

- by Helen Garner




Some time or the other, maybe we all have been through this experience of having a terminally-ill relative or friend in our care. Each of us might be having an array of good, bad, sweet or sour experiences to narrate about how life alters when it enmeshes with such a person's. Australian writer Helen Garner's first work of fiction titled 'The Spare Room' is more or a less a concoction of several such thoughts and experiences penned on the backdrop of a cancer-ridden friend staying with the protagonist for three weeks.

Helen the protagonist spares a room in the house for her bowel cancer-ridden friend Nicola for three weeks. A bohemian who has lived life on her own terms, Nicola puts herself up with a multitude of friends who are more than happy to accommodate and help her. So it is that the sixty-five year old Nicola comes to Helen's house in Melbourne to embark on a vitamin-C alternative medicine treatment at a shady-sounding institute called 'Theodore Institute'. Helen takes an instant dislike to the institute and its wonky staff; she keeps persuading Nicola to not fall prey to its glib marketing talk. However, the feisty Nicola brushes off Helen's advice with the argument that anything that promises to lessen her suffering is worth a try. The book portrays a vivid picture

of the parallel lives that these two friends try to lead even as their tracks keep crossing at every juncture. Helen tries to nurture and protect Nicola in every way she can – waking up several times at night to change her sweat-soaked sheets; cleaning her soiled clothes; taking her for the treatment; running around to get her medications; and motivating her every time she feels low. As for Nicola, she alternates between getting cosy in Helen's care and wanting to break free of it. While Nicola is certainly grateful for all that Helen is doing; at times she also unabashedly tries to slip out of the protective shell – especially when Helen tries to emphasise the futility of the Theodore Institute's 'treatments' that leave Nicola drained and quivering most of the times. Things come to an extreme when Nicola starts poking fun at Helen's 'over-protective' attitude and increasingly starts taking the reins of the decisions about her treatment in her own hands. While it does not come across very overtly in the narrative, the reader can read between the lines to empathise with Helen's hurt and pain borne as much out of care towards her gullible friend as out of rage towards her insensitive attitude. Nevertheless, Helen does not stop her efforts. As Nicola's condition goes from bad to worse due to the vitamin-C treatments, Helen talks tough with the institute's founder and even tries to initiate legal action against them. However, nothing substantial comes out of it. Lastly, Nicola goes in for regular medical treatment and eventually returns to Sydney where she is looked after by a string of friends till she embraces death – eventually in peace, instead of fighting against it.

While on the downside, the book seems a tad diary-esque than a work of fiction (maybe because Helen has drawn out of her real-life experience of caring for a friend in the last stages of cancer), one does get to savour the several tinges and layers that a 'friendship' goes through. Apart from the philosophy of the inevitability of death and the prudence in embracing it peacefully, the biggest lesson that this book teaches us is about the deep-rooted meaning of friendship. This unique relationship has generally either been pigeonholed or just unfairly branded into narrow segments. But 'The Spare Room' shows us that friendship can be much more than sharing a laugh or a cup of tea together. It can be about caring, nurturing, supporting; as much as about hurting, jibing and taking each other for granted. The pertinence of all these aspects is best understood whilst reading this novel. Definitely worth a read!

**- RESHMA S KULKARNI**

## नवे कोरे




# ॥ पावित्रम् ॥

**स्वाती चांदोरकर**

**किंमत : २००/-रु.**

**पोस्टेज : ३०/-रु.**

''सोडून देतो माझं काम. पण जसे जन्म होत राहतात, तसेच मृत्यूही. मग त्या कलेवरांचं काय करायचं? कोण दशक्रिया करणार, अग्नि देणार? कारण ही कलेवरं जर अग्निरहित राहिली तर रोगराई पसरेल. प्रेत खालच्या जातीतलं की वरच्या ह्यानं काय फरक पडणार? सडताना जात दिसत नाही.'' सगळे स्तब्ध झाले. दत्तू पुजारी शांतपणे उठला....

कालिंदी म्हणाली, ''तुम्ही योग्य तेच केलंत. आत्तापर्यंत प्रत्येक शुभकार्यात मला टाळण्यात आलं. हीन वागणूक देण्यात आली. आता नदीपलीकडच्यांनीही मला टाळावं? शेवंताकडे बारसं होतं. मला नाही बोलावलं. ही एवढीशी होती शेवंता. जेव्हा हिला कावीळ झाली, वैद्यांकडून पानं, पुड्या रोज घेऊन जात होते. वैद्य त्या वस्तीत यायला तयार नव्हते की तिला इथे आणलेलं त्यांना चालत नव्हतं. त्यांनाही आता पवित्र-अपवित्र जाणवू लागलं?''

दाराआडून ऐकणारा गोविंदा मात्र दुखावला. जो त्रास वर्गातली मुलं आपल्याला देतात, तसाच त्रास ही मोठी माणसं आईबाबांनाही देतात? मग त्यांच्याजवळ तक्रार ती काय करायची?

ही कथा अंत्येष्टिविधी करणाऱ्या दत्तूची, त्याच्या कुटुंबाची, होरपळलेल्या गोविंदाची आणि समाजमनात वसलेल्या जातिपातींची, अपवित्राची!




# मराठीतील कुमार साहित्य चळवळीचा पहिला प्रयत्न

*मराठीत बालसाहित्य खूप आहे. परंतू १३ ते २० वयोगटातील कुमारांसाठी फारच अल्प साहित्य आहे. टीनएजर्ससाठी स्वतंत्र, वेगळे साहित्य हवे, याकडे प्रथम लक्ष वेधले ते १९४४ साली वीरेन्द्र अढिया या तरुणाने. त्यासाठी त्याने पुण्यातील शालाप्रमुख आणि साहित्यकार यांच्याशी चर्चा करून १ एप्रिल १९४४ रोजी मराठी कुमार साहित्य मंडळ या संस्थेची स्थापना केली . दरवर्षी संमेलने भरवली. अनेक उपक्रम राबवले.*

*कुमारांच्या साहित्याला वृत्तपत्रात प्रसिद्धी मिळावी म्हणून प्रयत्न केले. महाराष्ट्रभर संचार करून अनेक शाखा काढल्या. हिंदी, गुजराथी, बंगाली वगैरे भाषांमध्येही स्वतंत्र कुमार साहित्य मंडळे स्थापन केली. सहा वर्षे हे मंडळ खूप उपक्रमशील राहिले. ना. धों. ताम्हनकर, का. रा. पालवणकर, सानेगुरुजी, गोपीनाथ तळवलकर, आचार्य अत्रे, ना. सी. फडके, वसंत बापट वगैरेंनी संमेलनाध्यक्ष म्हणून या मंडळाची प्रतिमा उंचावली. कुमार मासिक, पत्रमैत्री, हस्तलिखित प्रदर्शने, चित्रपटदर्शने वगैरे उपक्रम लोकप्रिय केले.*

*मी १९४८ पासून या मंडळाशी संबंधित होतो. डहाणू येथील संमेलनाला ही गेलो (१९४९). सानेगुरुजी उद्घाटक होते. १९५१ मध्ये अहमदाबादला संमेलन झाले. वसंत बापट अध्यक्ष व उमाशंकर जोशी उद्घाटक होते. त्यालाही मी गेलो होतो. १९५० नंतर या मंडळाचे कामकाज थंडावले. काम करत होतो. पुढे २५ वर्षांनी बालकुमार साहित्य संमेलनाची पुणे येथेच अमरेंद्र गाडगीळ, सुधाकर प्रभू, श्यामला शिरोळकर यांच्या पुढाकाराने स्थापना झाली (१९७५). या संस्थेतर्फेही संमेलने, पुरस्कार, मेळावे, कार्यशाळा, वगैरे कार्यक्रम होतात. कुमार साहित्य मंडळाविषयी फार तुरळक माहिती उपलब्ध आहे. बालकुमार साहित्य चळवळीतील एक ऐतिहासिक टप्पा म्हणून ही माहिती आपल्याला उपयुक्त वाटेल.*

**- शंकर सारडा**

## मध्यवर्ती कुमार मराठी साहित्य मंडळ : सत्तर वर्षापूर्वी सुरू झालेली पहिलीच चळवळ

श्री. वीरेन्द्र अढिया हे डहाणू येथील गुजराती युवक पुण्यात लॉ चा अभ्यास करीत असताना त्यांच्या असे लक्षात आले की, मराठीत प्रौढांसाठी भरपूर साहित्य आहे, परंतु १३ ते २० वर्षांच्या कुमारांसाठी फारसे साहित्य नाही. काही मुले राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, स्काऊट वा राष्ट्रसेवा दलात जातात, परंतु बहुतेक मुले ध्येयशून्य जिणे जगत आहेत. त्यांच्यासाठी काहीतरी करणे आवश्यक आहे. त्यांनी पुण्यातील शाळाप्रमुखांना भेटण्याचा धडाका लावला. त्यावेळी असे आढळून आले की, लेखन, अभिनय व चित्रकला यांची आवड असलेली बरीच मुले आहेत आणि बहुतेक शाळांमधून हस्तलिखिते निघत आहेत. या हस्तलिखित मासिकांतील उगवत्या लेखक-कवींचे लेख व चित्रे-व्यंगचित्रे लक्षवेधक आहेत. तेव्हा अशा कुमारांना एकत्र आणून एक संमेलन तसेच हस्तलिखितांचे प्रदर्शन भरवावे.

शाळाप्रमुखांनी व कुमार साहित्यिकांनी ही कल्पना उचलून धरली आणि १ मार्च १९४४ रोजी 'मध्यवर्ती मराठी कुमार साहित्य मंडळ, पुणे' ही संस्था स्थापन झाली. नूतन मराठी हायस्कूलचे तत्कालीन मुख्याध्यापक श्री. वा. मा. दबडघाव, भावे स्कूलचे श्री. नी. वा. किंकर व शिवाजी मराठा हायस्कूलचे मुख्याध्यापक गुरुवर्य बा. ग. जगताप ह्यांनी संस्थेला बहुमोल सहाय्य केले.

पहिले कुमार साहित्य संमेलन १९४४ मध्ये 'गोट्या'चे लेखक श्री. ना. धों ताम्हनकर यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे पार पडले. पुण्यातील व पुण्याबाहेरील सर्व प्रमुख शाळांमधून कुमार प्रतिनिधी उपस्थित होते. याशिवाय गोपीनाथ तळवलकर, श्री. के. क्षीरसागर, गं. भा. निरंतर, श्री. म. माटे व इतर मान्यवरही उपस्थित होते. त्यांनी या धडपड्या कुमारांचे कौतुक केले. त्यांना सर्वतोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन दिले. श्री. दबडघाव यांनी मंडळाच्या कार्यालयासाठी नू. म. हायस्कूलच्या कार्यालयाकडे जाणाऱ्या चक्राकार जिन्याजवळील छोटीशी खोली दिली. याशिवाय मंडळाच्या सभा व इतर कार्यक्रमांसाठी एक वर्ग विनामूल्य दिला. चित्रकार सिन्नरकर यांनी मंडळासाठी सुंदर बोधचिन्ह बनवून दिले. सभासद वर्गणी वार्षिक आठ आणे होती. मंडळाच्या दैनंदिन अडीअडचणीसाठी नू. म. वि. हायस्कूलचे पर्यवेक्षक श्री. अ. मो. भणगे यांचे साहाय्य मिळाले. माझे ज्येष्ठ बंधू श्री. वसंत थिटे हे 'ज्ञानप्रकाश'चे वार्ताहर व छायाचित्रकार होते; त्यामुळे पुण्यातील वृत्तपत्रांमधून मंडळाच्या कार्यक्रमांना प्रसिद्धी मिळणे सुलभ झाले. प्रख्यात चित्रकार व्ही. सिन्नरकर हे प्रथमपासून मंडळाशी जोडले गेलेले सक्रिय सभासद होते.

शुद्धलेखन, शुद्ध वाणी व सुवाच्य हस्ताक्षर यांसाठी दर रविवारी प्रात्यक्षिकासह मान्यवर शिक्षकांची मार्गदर्शनपर भाषणे होत. चित्रकला, हस्ताक्षर, निबंध, हस्तलिखित

मासिके यांच्या स्पर्धा त्यावेळी सर्व शाळांमधून विद्यार्थीप्रिय झालेल्या होत्या.

मंडळाची झालेली संमेलने पुढीलप्रमाणे –

पहिले : पुणे (१९४४) अध्यक्ष श्री. ना. धों. ताम्हनकर

दुसरे : अलिबाग (१९४५) अध्यक्ष 'खेळगडी'चे संपादक श्री. का. रा. पालवणकर

तिसरे : पुणे न्यू इंग्लिश स्कूल (नानावाडा) (१९४६) अध्यक्ष साने गुरुजी, उद्घाटक श्री. नानासाहेब परुळेकर

चौथे : मुंबई (गिरगाव) (१९४७) अध्यक्ष गोपीनाथ तळवलकर


पाचवे : बडोदे (१९४८) अध्यक्ष श्री. प्र. के. अत्रे

सहावे : मुंबई (दादर) (१९४९) अध्यक्ष श्री. ना. सी. फडके

सातवे : अहमदाबाद (१९४९) अध्यक्ष वसंत बापट

२४ डिसेंबर १९४६ रोजी झालेल्या पुणे येथील संमेलनाच्या वेळी मी चिटणीस म्हणून काम करीत होतो. माझ्या जोडीला दिगम्बर जोशी, सीता शिंदे व शकू भागवत हे अन्य चिटणीस होते. कुमारांचे दैवत असलेले साने गुरुजी हे संमेलनाला अध्यक्ष म्हणून लाभलेले होते. त्यावेळी ते संमेलन फारच गाजले. माझे ज्येष्ठ बंधू राजाभाऊ थिटे हे 'सकाळ'च्या स्थापनेपासूनचे डॉ. नानासाहेब परुळेकरांचे सहकारी होते. डॉ परुळेकर यांना उद्घाटनाबाबत विनंती करता त्यांनी तात्काळ संमती दिली. मंडळास रुपये १,००० /- ची देणगी दिली. शिवाय सर्व कार्यक्रमांना प्रसिद्धी दिली. त्या संमेलनात 'कुमारांचे अंतरंग' हे नाटक पुणे शाखेने सादर केले. नाटक गोपाळ सदाशिव कामत (नंतरच्या काळातील प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ) यांनी लिहिलेले होते. ते मंडळाचेच कार्यकर्ते होते. त्यांनी मंडळाचे घोषणागीतही लिहिले. त्या नाटकात नंतरच्या काळात रंगभूमी व चित्रपटसृष्टी गाजवलेले कुमार नट अरविंद देशपांडे त्याप्रमाणेच कु. मालती रेगे (नंतरच्या सौ. मालती श्रीराम लागू, ज्यांचा मृत्यू दुर्दैवी स्वरूपाचा ठरला.) पुण्यात अजूनही हिंदी नाटके होत नाहीत पण ५० वर्षापूर्वी आम्ही 'रक्षाबंधन' हे हिंदी नाटक पुण्यातील 'भानुविलास' नाट्यमंदिरात सादर केले होते (त्याकाळी तिथं फक्त नाटकांचेच प्रयोग होत असत.) त्यामध्ये अकबराच्या दरबारातील संगीत सभेत सौ. मालती पांडे-बर्वे यांनी दोन गाणी गायिली होती. त्याला भावगीतगायक श्री गजाननराव वाटवे यांनी संगीत दिलेले होते. भानुविलास रंगमंदिराच्या चालकांनी त्यावेळी आमच्याकडून नाममात्र रु. २५/- भाडे घेतले होते.

कुमार साहित्य मंडळाचे संचालक श्री. वीरेन्द्र अढिया यांचे व्यक्तिमत्त्व आकर्षक होते आणि भाषा लाघवी होती. प्रचारभाषणातील त्यांची काही वाक्ये अजूनही माझ्या स्मरणात आहेत. ''...आम्हाला भेळपुरीचे साहित्य नको; बदामपुरीचे साहित्य हवे... आमचे चुकले असेल तर आमचे कान ओढा, पण आमचे पाय ओढू नका. आम्ही पुढे जात आहोत...'' अढियांची संपर्क साधण्याची हातोटी विलक्षण



**मध्यवर्ती कुमार मराठी साहित्य संमेलन, पहिले अधिवेशन, पुणे**
**दि. १८ /१९ फेब्रुवारी १९४४. अध्यक्ष - ना.धों. ताम्हनकर**
पुढील रांग- क्र. ४ वीरेंद्र अढिया, ७. गं.भा. निरंतर, ८. ताम्हनकर,
९. गोपीनाथ तळवलकर, १०. श्री. के. क्षीरसागर

होती. त्यांच्याबरोबर मी सांगली, बुधगाव, मिरज, कोल्हापूर, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण इत्यादी ठिकाणी प्रवास केला. भाषणे व प्रचार करून प्रत्येक ठिकाणी कुमार साहित्य मंडळाच्या शाखा स्थापन केल्या. 'नवयुग' झंकार आदी साप्ताहिके, ज्ञानप्रकाश, सकाळ, काळ, लोकमान्य इत्यादी वर्तमानपत्रांनी कुमार साहित्य चळवळीला भरपूर प्रसिद्धी दिली. महाराष्ट्रातील बहुतेक सर्व थोर साहित्यिक कवी व मान्यवर पुढारी यांनी प्रत्यक्ष भेटी देऊन व व्याख्याने देऊन मार्गदर्शन केले. त्यांत मामा वरेरकर, श्री. म. माटे, गं. भा. निरंतर, श्री. के. क्षीरसागर, मालतीबाई दांडेकर, संजीवनी मराठे, आचार्य अत्रे, कमला फडके, ना. सी. फडके इत्यादी मान्यवर होते. त्यावेळी म्हणजे १९४४ ते १९४८ या दरम्यान असलेली जी मंडळी पुढे निरनिराळ्या क्षेत्रांत प्रसिद्धीस पावली त्यापैकी काहींचा नामोल्लेख करण्याचा मोह आवरता येत नाही.

अर्थशास्त्र : डॉ. द. रा. पेंडसे, डॉ. गो. स. कामत
प्रकाशन : श्री. पंडित अनंत कुलकर्णी (कुलकर्णी ग्रंथागार,) माधव कानिटकर (संपादक : प्रपंच, मानिनी)
चित्रकला : श्री. व्ही. डी. सिन्नरकर, मोहन तोष्णीवाल
नाटक : श्री. विजय तेंडुलकर
अभिनय : श्री. अरविंद देशपांडे, श्री. रंगनाथ कुलकर्णी (एकपात्री प्रयोग)
पत्रकारिता : श्री माधव गडकरी
वैद्यकीय : डॉ. सुशीला आगाशे
उद्योग व्यवसाय : श्री. मोहन रानडे, मनोहर साठे (साठे बिस्किट कारखाना)

मंडळातर्फे 'उगवत्या दिशेकडे' हा कुमारकवींचा काव्यसंग्रह आणि 'प्रेरणा' हा कथासंग्रह प्रकाशित झाला. अनेक साप्ताहिकांतून कुमारांच्या साहित्यासाठी सदर राखीव ठेवले जात असे. १९४४ ते १९५२ पर्यंत हे काम चालू होते. त्यानंतर त्यावेळची कुमारमंडळी प्रौढ झाली. नवीन कुमार मंडळाकडे फिरकेनासे झाले. जमाना बदलला. ही चळवळ हळूहळू बंद झाली. श्री. वीरेन्द्र अढिया हे पुढे दिल्लीला राहू लागले. नंतर टोरॅण्टो (कॅनडा) येथे स्थायिक झाले. चारपाच वर्षांपूर्वी त्यांचे निधन झाले. मंडळाने काही समित्या स्थापन केल्या होत्या.

१. वाचनालय समिती : नू. म. वि. प्रशालेत मोफत वाचनालय होते.

२. कुमार सांस्कृतिक समिती : यांत नाटके, नाट्यप्रवेश तसेच नकला यांचा समावेश होता. काही चित्रपट अल्पदरात दाखवले जात. 'मादाम क्युरी' हा चित्रपट गर्दीमुळे 'वसंत' व 'अपोलो' या दोन चित्रपटागृहांत दाखवावा लागला होता. चित्रपट चालकांनी केवळ २०/- नाममात्र भाडे आकारले होते.

३. सहली छंद प्रवास समिती

४. सर्वात महत्त्वाची व अत्यंत प्रिय झालेली पत्रमैत्री चळवळ

**- माधव थिटे**

## मध्यवर्ती मराठी कुमार साहित्य मंडळाची वाटचाल -

न्यू इंग्लिश स्कूल (नानावाडा) मध्ये १९४५ साली मी इंग्रजी पाचवीत असताना सूचना फलकावर मध्यवर्ती कुमार साहित्य मंडळाचे वतीने लागलेल्या एका निवेदन वाचून मी मुंबईच्या 'तिसरी आघाडी'कडे एक लेख पाठवला. त्याचवेळी मी मध्यवर्ती शाखेचा सभासद झालो. त्यानंतर मी माझे हस्तलिखित मासिक मध्यवर्ती शाखेकडे स्पर्धेसाठी पाठवले. हे हस्तलिखित म्हणजे एका वहीत लिहिलेले सात-आठ लेख व एक-दोन कथा होत्या. स्पर्धेसाठी आलेल्या हस्तलिखितांचे प्रदर्शन भरविण्यात आले. ते पाहिल्यावर मी चकितच झालो. साधारण ८॥ इंच बाय १२ इंच आकार असलेली हस्तलिखिते सुंदर सजावट व सुंदर हस्ताक्षर आणि रंगीबेरंगी कागदांनी आवेष्टित अशी होती. सगळ्यात गचाळ (एकमेव) असे माझे हस्तलिखित होते. मंडळाचे कार्यालय नू. म. वि. हायस्कूलमध्ये होते. शाळा सुरू होताना व संपल्यानंतर दिंडी दरवाजाचा वापर होत असे. पिछाडीची बाजू जोगेश्वरी बोळात होती. येथून माझे निवासस्थान हाकेच्या अंतरावर होते. त्यामुळे मी रोज मंडळाच्या कार्यालयात हजेरी लावू शकत होतो. हे कार्यालय साधारण ६ फूट बाय १२ फूट होते. एक टेबल खुर्ची होती. भिंतीवर कस्तुरबा गांधींचा फोटो होता. शाळा 'सदाशिव पेठीयां'ची आहे, हा समज त्याकाळी दृढ झालेला होता. त्या शाळेतील विद्यार्थ्यांचा फारच कमी प्रतिसाद मंडळाला मिळालेला होता.

कार्यालयाला लागून असलेल्या वर्गात काही सभा झालेल्या आठवतात.

सभासदांनी लिहिलेल्या साहित्याचे वाचन केले जाई. मी 'तिखट मीठ' हा (अनंत काणेकरी पद्धतीचे अनुकरण असलेला) लघुनिबंध वाचून दाखवला. त्यावर द. रा. पेंडसे यांनी प्रतिक्रिया नोंदवलेली होती.

सप्टेंबर १९४५ मध्ये मंडळाने शैक्षणिक चित्रपट 'डेक्कन' व अपोलो' या चित्रपटागृहांतून दाखवण्याचे ठरवले. त्याची तिकिटे खपवण्याची जबाबदारी सर्व सभासदांवर आली. नुकतीच शाळेच्या हस्तलिखित मासिकाच्या संदर्भात ओळख झालेल्या चिंतामण पारखीकडेही मी काही तिकिटे खपवण्यासाठी दिली. वीरेंद्र अढियांनी माझ्यावर एक जबाबदारीचे काम दिले. अपोलोमधून एकेक रीळ तेथे दाखवून झाल्यावर ते डेक्कनवर पोचवायचं. तिथलं रीळ घ्यायचं आणि ते अपोलोमध्ये द्यायचं. सायकलवरून! सर्व डॉक्युमेंटरी फिल्म चांगल्या होत्या. 'हेलपाटे' घालण्याच्या कामगिरीमुळे मी त्याचा पूर्ण आस्वाद घेऊ शकलो नाही. फिल्मस् डिव्हिजनने फिल्म पुरवलेल्या होत्या.

द. रा. पेंडसे यांनी चिटणीसपदाचा राजीनामा दिल्यानंतर त्या जागी माझी नेमणूक करण्यात आली. मला हा एक आश्चर्याचा धक्काच होता. त्यावेळी माधव थिटे, सीता शिंदे, शकू भागवत हे अन्य चिटणीस होते. सीता शिंदे ह्या 'गणू शिंदे कोल्ड्रिंक्स' चे शिंदे कुटुंबियांपैकी असाव्या, असे मला वाटते.

जादूगार रघुवीर (भोपळे) हे आफ्रिकावारी करून आलेले होते. त्यांनी तेथून आणलेल्या चमत्कारिक वाटणाऱ्या वस्तूंचे प्रदर्शन नू. म. वि. मध्ये भरवले. त्या वस्तूंची माहिती व प्रवासातील अनुभव त्यांनी सांगितले. सारे थक्क करणारे.

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे ह्यांनी शाळेच्या वर्गात एकदा सभासदांचे 'बौद्धिक' घेतलेले आठवते. त्यावेळी ते नू. म. वि. मध्येच शिक्षक होते.

भारतातील दैनिके, साप्ताहिके व नियतकालिकांचे एक भव्य प्रदर्शन भरवण्यात आले होते. या उपक्रमाचे अनेक मान्यवरांनी कौतुक केले. प्रसिद्ध कवयित्री संजीवनी मराठे ह्यांचा काव्यगायनाचा जाहीर कार्यक्रम केला गेला. नू. म. वि. चे सभागृह संपूर्णपणे भरलेले होते. श्रोत्यांमध्ये प्रचंड उत्साह होता. कार्यक्रम श्रवणीय झाला. स्वत:च्या कविता गाऊन दाखविणे याचे अप्रूप असते. 'शांत सागरी कशास...'' या त्यांच्या गीताला 'वन्स मोअर' मिळाला होता. (त्यांच्याच आवाजातली या गीताची ध्वनिमुद्रिकाही उपलब्ध आहे!)

मंडळातर्फे दिवंगत साहित्यिकांच्या स्मृतिदिनानिमित्ताने मान्यवरांची व्याख्याने होत. अशा प्रसंगी चिटणीस या नात्याने व्याख्यात्यांचा परिचय करून देणे, आभारप्रदर्शन करणे या गोष्टी मी कराव्यात असा मला अढियांचा आग्रह असे. मला त्या गोष्टीची भीती वाटे. एकदा अशाच एका स्मृतिदिनी महामहोपाध्याय द. वा. पोतदार हे व्याख्याते होते. नू. म. वि. च्या एका मोठ्या वर्गात हा कार्यक्रम होता. मी नेहमीप्रमाणे वर्गातल्या शेवटच्या बाकावर बसून वृत्तान्त लिहिण्याच्या उद्देशाने

सरसावून बसलेलो होतो. आणि अनपेक्षितपणे अढियांनी जाहीर केले की, ''आता दिगंबर जोशी हे व्यक्त्यांचा परिचय करून देतील.'' काय वर्णावी माझी अवस्था! त्याकाळी बहुतांश विद्यार्थ्यांचा (आणि तरुणांचाही) वेश पायमजा-सदरा असा असे. (थोडेसे अवांतर : पायजम्याचा तळाचा घेर मोठा असे. सायकल चालवताना पायजम्याचा पावलाजवळचा भाग सायकल चेनमध्ये अडकू नये म्हणून चंद्रकोरीसारख्या क्लिपा पोटऱ्यांवर चढवाव्या लागत! सदऱ्याच्या बाह्या लांब असत, मात्र ते कोपरा झाकला जाईल इथपर्यंत दुमडले जात.) माझे थरथरते पाय त्यामुळे कोणाला दिसले नसावेत. मात्र बोलण्यास सुरुवात करताना आवाजातला कंप नक्कीच सर्वांना जाणवला असणार! या धक्कातंत्रामुळे माझा 'सभाधीटपणा' मुरण्यास सुरुवात झाली. (पुढील आयुष्यात मला या 'सभाधीटपणा'चा खूपच उपयोग झाला.) यावेळेपर्यंत 'जोशी-पारखी-पुणेकर' हे अतूट त्रिकूट प्रसिद्धीस पावलेले होते.

मंडळातले ज्येष्ठ सभासद गोपाळ सदाशिव कामत ह्यांनी 'कुमारांचे अंतरंग' या नावाचे नाटक लिहिलेले होते. त्याचे प्रयोग करण्याचे ठरले. नू. म. वि. मधले मनोहर साठे यांचा नव्याने समावेश झाला. (नंतरचे साठे बिस्किट कारखानदार : माझी व साठे यांची मैत्री जमली. अनेक महिने आम्ही एकत्र हिंडलो फिरलो. ते नवजीवन... नंतर लाल निशाण... संघटनेमध्ये काम करत असत. मीही त्यात सामील व्हावे अशी त्यांची इच्छा होती. याच काळात मी कॉ. दि. के. बेडेकर, कॉ. के. एन. फडके, कॉ. वसंत लिमये आदींच्या सहवासात काही काळ आलेलो होतो. कामगार पुढारी न बनता साठे अखेर वारसाहक्काने एक उद्योगपती बनले!)

आणखी आठवते ते नाव म्हणजे यशवंत निक्रम (प्रभातचा १९४० चा 'संत ज्ञानेश्वर' चित्रपट पाहिल्यापासून मला त्यांच्या भेटीची विलक्षण ओढच लागलेली होती. संतांना विठूरायाची लागते तशी! चित्रपटात हाताचे दोन्ही तळवे क्षितिजाकडे करून 'एक तत्त्व नाम। दृढ धरी मना ।...' ही ओवी म्हणतानाचे त्याचे प्रवेशदर्शन मोटे मोहक आहे, पायाच्या घोट्यापर्यंत भूभाग... घोट्यापासून वरच्या सर्व शरीरास अनंत आकाशाची पार्श्वभूमी धीम्या गतीने परंतु विश्वासाने टाकत जाणारी आश्वासक पावले... त्याचा तो करुणार्द्र चेहरा... माझे मन हेलावून जायचे, त्या दृश्यात विरघळून जायचे.)

मंडळात मी दिगंबर जोशी या नावाने प्रवेश केला. एकदा अप्पा बळवंत चौकातील एका कोपऱ्यात गप्पागोष्टी करीत उभे होतो. तेवढ्यात रेडिओवरून मुकेशचे गाणे ऐकू येऊ लागले. मी हवेतल्या पियानोवर बोटे फिरवू लागलो. एकजण म्हणाला, 'तुझे आईवडील इतके कसे रे अरसिक! त्यांनी तुझं नाव दिगंबर कसं काय ठेवलं!' दुसरा म्हणाला, 'मग काय ठेवायला हवं होतं?... पहिला म्हणाला, याला मुकेशच्या गाण्याचं इतकं वेड आहे, तर 'मुकेश'शी यमक साधेल असं 'दिगेश' हा नाही ठेवलं?, झालं. सगळ्यांनी माझं दिगेश अशा नव्या नावाचं बारसं केलं. त्यानंतर मी मंडळात दिगेश याच नावाने ओळखला जाऊ लागलो.

एकदा मोठ्या फजितीचा प्रसंग ओढवला. गुरुदेव रवीन्द्रनाथ टागोर या विषयावर आचार्य स. ज. भागवत ह्यांचे भाषण अढियांनी ठरवले. पण या कार्यक्रमाची पूर्वसूचना सभासदांना वेळेवर मिळाली नाही. दुपारी वेळेच्या आधी मी कार्यालयात हजर झालो. गेटमधून आचार्य भागवत येत असलेले आम्ही पाहिले. ते अगदी ठरलेल्या वेळेवरच आलेले होते. आता काय करायचे असा प्रश्न पडला. माझा मित्रमोहन तोष्णीवाल म्हणाला, 'जोशी, तू त्यांच्याशी बोलत रहा. वरच्या मजल्यावर चित्रकलेचा वर्ग चालू होता. त्या शिक्षकांना म्हटले की, आमचे सभासद अद्यापि आलेले नाहीत. तेव्हा... (बहुतेक ते शिक्षक डेंगळे सर असावेत.) त्यांनी संमती दिली. वर्ग भरलेला होता. आचार्यांना कुमारांचा उल्हास पाहून आनंद झालेला असावा! यथावकाश बाकीचे सभासद तिथे उपस्थित झाले व भिंतीला टेकून उभे राहिले (लेटकमर्स).

साधारण याच सुमारास नू. म. वि. हायस्कूलमधील मंडळाचे कार्यालय हलवावे लागले. फडतरे चौकातील 'स्वीट होम' उपहारगृहाच्या वरच्या मजल्यावर थिटे कुटुंबियांची खोली होती. तिचा वापर करण्यास मंडळाला परवानगी मिळाली. अढियांखेरीज पुरुषोत्तम कोगेकर, मोहन तोष्णीवाल, थिटे बंधू, जोशी पारखी पुणेकर, सिंधू जोशी सुशीला आगाशे, विमल वायंगणकर आदी असत. इथंच अनेक कार्यक्रमांबद्दल चर्चा, त्यांचे नियोजन होत असे. मोहन तोष्णीवाल एक अष्टपैलू कलावंत होता. सजावटीचे काही काम असेल तर ते तो तिथंच करी.

नू. म. वि. प्राथमिक शाळेसमोर सिंधू जोशींचे निवासस्थान होते. कधीकधी अढियांसह ४-५ जणांचा त्यांच्या निवासासमोर गप्पांचा अड्डा जमे.

एकदा, मंडळात कुमार कुमारिकांनी बंधूभगिनी या नात्यानेच वागावे हे कृत्रिम बंधन कशासाठी? यावर साधकबाधक चर्चा झालेली होती.

एकदा अचानकपणे बनेश्वरची सहल ठरवली गेली. मी तयार नव्हतो. माझी परीक्षा दुसरे दिवशी होती. अत्याग्रहामुळे गेलो. २०-२५ जण होते. एका ट्रकमधून आम्ही गेलो. वाटेत 'आंधळी कोशिंबीर' ह्या खेळाचा आस्वाद घेतला. खेळीमेळीचे वातावरण निर्माण होण्यास अशा सहलींचा उपयोग होई.

तिसरे अधिवेशन गिरगाव, मुंबई येथे डिसेंबर १९४५ मध्ये भरले होते. श्री. गोपीनाथ तळवलकर अध्यक्ष होते. मी प्रथमच मुंबईला गेलो. पुण्याहून जाताना स्वतंत्र बस केलेली होती. बसमध्ये भावगीतगायक गजाननराव वाटवे व बबनराव नावडीकर हे होते.

श्री. गोपीनाथ तळवलकरांच्या मुद्रित भाषणाच्या शीर्षकस्थानी होते : 'देवांच्या मदतीस चला तर!' आणि भाषणाची अखेर : केशवसुतांच्या 'तुतारी'मधील या कडव्याने झालेली होती.

'पुर्वीपासुनि अजुनि सुरासुर
तुंबळ संग्रामाला करिती;
सम्प्रति दानव फार माजती

देवांवर झेंडा मिरवती!

देवांच्या मदतीस चल तर!''

संस्था चालवायची म्हणजे कोणकोणत्या दिव्यातून जावे लागते याचे ज्ञान कुमार साहित्य मंडळामुळे मिळालं. भावी आयुष्यात ज्या ज्या संस्थांत काम करावे लागले त्यांच्या यशाची मुळं या अनुभवात होती. संस्था अर्थिक आधाराशिवाय चालत नाही. देणगी मिळावी म्हणून स्वत:चे अहंकार बाजूला सोडून अंगी विलक्षण नम्रता बाणवावी लागते, दाखवावी लागते. हेलपाटे घालावे लागतात. त्यांच्या रास्त अपेक्षा पूर्ण कराव्या लागतात.

मंडळाचे चौथे अधिवेशन पुण्यात होणार होते. जागेचा प्रश्न आला. संमेलनाचे अध्यक्ष साने गुरुजी होते व संमेलन २४ डिसेंबर १९४६ रोजी होणार होते. २४ डिसेंबर हा गुरुजींचा जन्मदिन. आमच्या शाळेचे (म्हणजे नानावाड्याचे) स्नेहसंमेलन नेहमी नाताळच्या सुटीमध्ये होत असे. मुख्याध्यापक प्रा. पु. ना. वीरकर संस्कृत भाषेचे गाढे पंडित होते. त्यांना मी अढियांसह भेटलो. संमेलनासाठी शाळा देण्याची विनंती मान्य त्यांनी केली. एवढेच नव्हेतर खुर्च्या, आदी साहित्य तिसऱ्या मजल्यावरचे सभागृह वापरण्यास दिले. विनामूल्य! अढिया तर चकितच झाला. (थोडेसे अवांतर: शाळेच्या बाहेर आल्यावर त्याने मला या आश्वासनाचे 'इंगित' विचारले. मी शाळेत राबवीत असलेले विविध उपक्रम याबद्दल सांगितले नागपूरहून जे 'विकास' नियतकालिक निघते व जे कुमार साहित्यासाठी स्वतत्र अंक काढतात त्या नियतकालिकाच्या संपादिका सौ.सुशीला मोहनी ह्या त्यांच्या भगिनी आहेत. मी कुमार साहित्य मंडळाच्या चिटणीसांपैकी एक चिटणीस आहे, हे त्यांना माहित आहे)

डिसेंबर १९४६ चा दुसरा आठवडा, संमेलनाच्या पूर्वतयारीकरिता आम्ही सुधा आगाशेंच्या निवासस्थानी जमत असू. न्युमोनिया झाल्याने मी अंथरूणाला जखडून गेलो. तरीही दिनांक २४ ला गुरुजींचे भाषण ऐकण्यासाठी नानावाड्यात गेलो. सर्व कार्यक्रम डोळे भरून पाहिले.

धनिक मंडळाला देणगी देत असत. भावगीतगायक गजाननराव वाटवे आणि बबनराव नावडीकर हे मंडळाच्या कुटुंबातले सदस्य असल्याप्रमाणे मंडळात वावरत होते. त्यांनी भावगीतगायनाचे कार्यक्रम तिकीट लावून केले व त्याचे उत्पन्न त्यांनी मंडळाला दिले. माझ्या कार्यकाळात त्यांचे तीन कार्यक्रम झाले होते.

वीरेन्द्र अढिया संचालक होते. सुशीला आगाशे ह्या अनधिकृत सहसंचालिका होत्या, असं म्हणायला हरकत नाही. मंडळाच्या सर्व कामकाजात त्यांच्या निर्णयाला महत्व दिले जायचे. अढियांबरोबर त्या प्रचारार्थ दौऱ्यावर जात असत. माधव थिटेही अढियांबरोबर जात. या काळात सिंधू जोशी, विमल वायंगणकर, मालती रेगे ह्यांचे साहाय्य मिळत होते. आम्हा मित्रमंडळीत सुशीला आगाशे, सिंधू जोशी, विमल वायंगणकर, मालती रेगे, इंदू भाटे ह्यांना 'पंचम' या परवलीच्या शब्दाने उल्लेख व्हायचा.

वीरेन्द्र अढियांबद्दल सांगावे तेवढे थोडेच होईल. अढिया पुण्यात आला तो एक 'लॉ' चा विद्यार्थी म्हणून. होस्टेलवर राहावयाचा. त्याकाळी सायकल हेच एकमेव भ्रमंतीसाठीचे वाहन होते. दूरध्वनी फक्त श्रीमंतांसाठीच होता, त्यामुळे 'इंडियन पोस्टस् ॲण्ड टेलिग्राफ्स्' हेच एक खाते. 'मेघदूता'चे काम प्रामाणिकपणे दिवसांतून दोन वेळा व रविवारी एक वेळा विनातक्रार काम करायचे.

अढियाने 'मराठी कुमार साहित्य मंडळ,' गुजराती कुमार साहित्य मंडळ,' 'हिंदी कुमार साहित्य मंडळ' ह्यांचीही स्थापना केली. बंगाली, कन्नड कुमार साहित्य मंडळे स्थापन करण्याचे घाटत होते. याकरता सतत भ्रमंती चालूच होती. महाराष्ट्र त्याने पिंजून काढला. शाळेच्या मुख्याध्यापकांना भेटणे व मंडळ स्थापन करणे हे त्याचे प्रमुख तंत्र होते.

मंडळाच्या प्रचाराकरता 'प्रेरणा' हे मुखपत्र होते. अकोले येथून निघणाऱ्या 'मातृभूमी' या दैनिकाची पुरवणी म्हणून ते निघत असे. मंडळाकरता ही पुरवणी वेगळी काढून मिळत होती. पुण्यात असताना विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याच्या दृष्टीने मान्यवरांना भेटणे हे त्यांचे काम चालूच असे.

वीरेन्द्र अढियाला 'भाई किंवा नुसते 'अढिया' या नावाने संबोधले जायचे. बरोबरीच्या नात्याने तो सर्वांशी वागे. सगळा एकहाती कारभार होता. पुढे कामाची व्याप्ती वाढू लागल्यानंतर कामाची विभागणी करणे आवश्यक झाले. १९४७ च्या मॅट्रिकच्या परीक्षेस बसण्याची परवानगी न मिळाल्याने 'मी विरुद्ध कुटुंबीय' अशा अघोषित युद्धामध्ये माझी बरीच दमछाक होत होती. मी चिटणीपदाचा राजीनामा दिला. मंडळात माझे जाणेयेणे औपचारिक झाले.

अढियाचा विवाह ०१ मे १९४७ रोजी कस्तुरबा स्मारकनिधीचे व हरिजनसेवक संघाचे पूज्य ठक्करबाप्पा यांच्या नातीशी झाला. (नू. म. वि. हायस्कूलच्या कार्यालयात कस्तुरबा गांधींचा फोटो का होता याचे उत्तर येथे मिळते!) 'कुमार' नियतकालिक सुरू करण्याचे ठरले. संपादक म्हणून काम करण्यासाठी अनेकजण उत्सुक होते. मलाही त्याने एका पत्रानुसार संपादकाची जबाबदारी देण्याचे मान्य केलेले होते! मात्र प्रत्यक्षात संपादक मंडळ म्हणून वर नमूद केलेल्या 'पंचम'ची नेमणूक झालेली दिसली. पंचमविरुद्ध आधीच जे कलुषित मत झालेले होते त्यात भर पडली. मंडळातले आधारस्तंभ कुमारवय न राहिल्याने बाहेर पडलेले होते. राहिलेल्यांत गटबाजी सुरू झाली. सर्व मानाची पदे व कार्याचे सारे श्रेय पंचमला देण्याचे त्याचे धोरण अनेकांना रुचले नाही. मुंबई परिसरांतल्या शाखांनी स्वतःचा सवतासुभाही निर्माण केला.

पुढे मला नोकरी लागली. मंडळाशी असलेला संबंध संपुष्टात आला. मात्र अढियाशी असलेल्या स्नेहात संबंधात अंतराय निर्माण झाला नाही. त्यानंतरही आमचा पत्रव्यवहार नैमित्तिक स्वरूपाचा का होईना पण होत होता. नंतर तो दिल्ली येथे बालकल्याण विभागात नोकरीस्तव गेला. पुढे तो कॅनडात स्थायिक झाला. एकदा संध्याकाळी मुंबई दूरदर्शनवरील कार्यक्रम पाहत होतो. 'आजचे पाहुणे' या

कार्यक्रमात 'वीरेन्द्र आढिया' मुलाखत देताना दिसला. कुमार साहित्याचा ओझरता उल्लेख आला. बहुतांश वेळ कॅनडाबद्दल बोलण्यात गेला.

मंडळाच्या उद्दिष्टांत 'पत्रमैत्री' चा उल्लेख आहे. माझ्या एका पत्रमित्राने कळवले आहे की, 'कुमार'च्या एका अंकात 'पत्रमैत्रीवर' कोरडे ओढलेले आहेत. कुमारचे अंक माझ्या वाचनात येत नसल्यामुळे नेमक्या कोणत्या मुद्द्यावर कोरडे ओढलेले आहेत त्याची मला कल्पना नाही. व्यक्तिश: बोलायचे झाले तर माझ्याइतकी यशस्वी पत्रमैत्री कुणालाही जमली असेल असे मला वाटत नाही.

मंडळाच्या शाखा चिटणीसांशी असलेली मैत्री बरीच वर्षे टिकली. जिव्हाळ्याने ओथंबलेली अशी पत्रे वाचनीय आहेत. अढियाला माझ्या पत्रमैत्रीची पूर्ण कल्पना होती. माझ्या पत्रमित्रांनी अढियांकडे, जेव्हा त्यांची भेट होई त्यावेळी, त्याबद्दल व माझ्याबद्दल गौरवपर उद्‌गार काढलेले आहेत. (थोडेसे अवांतर : मी ज्यावेळी शाखाचिटणीसांशी पत्रव्यवहार करीत असे त्यावेळी त्यांना अनाहूतपण का होईना मार्गदर्शनपर सूचना करीत असे. असेच एक पत्र कोल्हापूरच्या चिटणीसाला लिहिलेले होते. 'आगरकरदिनाच्या निमित्ताने कोल्हापुरात प्रसिद्ध लेखक वि. स. खांडेकर यांचे व्याख्यान ठेवा... अशा आशयाचे ते पत्र होते. चिटणीसांनी ते पत्रच खांडेकरांना दाखवले. कोल्हापूरला अढिया खांडेकरांना भेटला तेव्हा त्यांनी म्हटले की, जोशींनी फक्त पत्रेच लिहिली तरी चालेल. साहित्य त्याची नोंद घेईल... हे अढियाने मला सांगितले तेव्हा मीच माझी पाठ थोपटून घेतली!)

गेल्या पाच-सात वर्षांपासून जुजबी स्वरूपाचे संगणकज्ञान मिळवले. सर्व पत्रमित्रांच्या पत्रांचे 'डीटीपी'करण केले व त्यांचे खंड तयार केले. हे सारे स्वत:च्या समाधानासाठी.

(ए-४ आकाराची पृष्ठे : शकुन्तला उपासनी, कल्याण - २१२ पृष्ठे. पुरुषोत्तम पाटील, अमळनेर - ८१ पृष्ठे. मोरेश्वर देशमुख, महाड - ७१ पृष्ठे. चिंतामण पारखी. मुंबई - ६५ पृष्ठे. धीरेन्द्र पुणेकर, बेळगाव - ६६ पृष्ठे. राजा कारळे, मुंबई - ३ पत्रे, सय्यद हसन, वेंगुर्ले - ३ पत्रे, शिवराम बोरकर, मुंबई - १ पत्र, गौरीशंकर मधवे, राजगुरुनगर - १ पत्र, त्र्यं. द. देशमुख, नागपूर - १ पत्र, रामदास वाणी, धुळे - पत्र, वामन वैद्य, कराड - पत्र.)

एका सेवानिवृत्त प्राध्यापकांनी ही पत्रे प्रकाशित करणे कसे आवश्यक आहे, हे मला पटवून दिले. या वर्षात ते पत्रसंकलन प्रकाशित होईल अशी आशा आहे.

**- दिगंबर जोशी**

द्वारा, सुषमा सोलापूरकर, रमाप्रसाद अपार्टमेंट,
प्रभात रोड, गल्ली क्र. ६, पुणे - ४११००४.
फोन - २५६७९४९०




## ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य म. वि. कौंडिण्य

शिक्षण हाच ध्यास आणि श्वास मानणारे, ‘मुक्तांगण’सारखा अनोखा उपक्रम राबविणारे संगमनेर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ मधुसूदन विष्णू तथा म. वि. कौंडिण्य (वय ७९) यांचे १८ जानेवारी रोजी पुणे येथे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे विवाहित मुलगी, जावई व नात, असा परिवार आहे.

संगमनेर महाविद्यालयाची स्थापना झाल्यानंतर १९६१ पासून सलग ३३ वर्षे कौंडिण्य प्राचार्य होते. हे महाविद्यालय त्यांच्याच नावाने ओळखले जाई. त्यांचा जन्म ७ मार्च १९३३ रोजी नशिराबाद (जि. जळगाव) येथे झाला. अत्यंत गरिबीच्या परिस्थितीत वाढलेल्या कौंडिण्य यांना सानेगुरुजींचा सहवास व प्रेम लाभले. उच्चशिक्षणासाठी त्यांना नानासाहेब परुळेकर व डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी मदत केली. अर्थशास्त्रात एम. ए. झाल्यानंतर कौंडिण्य अहमदनगर महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रुजू झाले. त्यानंतर दोन वर्षांनी संगमनेर महाविद्यालयाची स्थापना झाली आणि त्याचे प्राचार्यपद कौंडिण्य यांनी १९९३ पर्यंत सांभाळले. १९९९ मध्ये संगमनेर सोडून पुणे येथे स्थलांतरित झाले. पुण्यात सूस व त्याजवळील दोन गावांमध्ये त्यांचे समाजसेवेचे काम सुरू राहिले. कचरा गोळा करणाऱ्या महिलांना संघटित करून त्यांनी सरकारकडून त्यांना जागा मिळवून दिली.

## बंडोपंत सोलापूरकर

आपल्या क्लॅरोनेट वादनाने रसिकांना मंत्रमुग्ध करणारे ज्येष्ठ वादक, ‘प्रभात बँड’चे संस्थापक मोरेश्वर वासुदेव तथा बंडोपंत सोलापूरकर (वय ८०) यांचे वृद्धापकाळाने २२ जानेवारीला निधन झाले. त्यांच्यामागे दोन मुलगे, एक मुलगी, सुना व नातवंडे, असा परिवार आहे.




# गलिव्हर्सच्या प्रवासातील गणिताच्या — गमतीजमती —

गलिव्हर्स ट्रॅव्हल्स हे पुस्तक मी शाळेत असतानाच वाचले; आणि त्या पुस्तकातील गमती-जमतींनी मला गुंगवून टाकले. गलिव्हर हा लिलिपुटमधल्या ठेंगू लोकांच्या देशात जातो. तेव्हा तेथील छोट्या चिमुरड्या लोकांची जी धांदल उडते ती वाचताना सारखे हसू येत राहते. मुंग्यांच्या वारूळात हत्तीने जावे तसे काहीतरी घडते. मुंग्यांनी हत्तीला कैद करणे वा तुरुंगात ठेवणे ही कल्पनाच कशी हास्यास्पद वाटते! गलिव्हरला बुटबैंगण लिलिपुट सैनिक पकडून आणतात तेव्हा तसेच वाटते.

पुढे हाच गलिव्हर ब्रॉबडिंगनाग या राक्षसी लोकांच्या देशात जातो; तेव्हा त्या प्रचंड आकाराच्या लोकांपुढे तो अगदीच किरकोळ बुटबैंगण ठरतो आणि नेमके लिलिपुटच्या उलटे चित्र आपल्यासमोर उभे राहते.

संदर्भ बदलला की सारे तपशीलही बदलतात. एकाच व्यक्तीला राक्षस म्हणून कोठे सारेजण वचकून असतात तर दुसरीकडे त्याच व्यक्तीला अन्य राक्षसी लोकांच्या समोर क्षुद्र असहाय्य प्राणी म्हणून होणारी अवहेलना पत्करावी लागते.

एम. ए. ला. असताना गलिव्हरचा लेखक जोनाथन स्विफ्ट याच्यावर स्पेशल पेपर असल्याने हे पुस्तक पुन्हा माझ्या वाचनात आले. आणि त्यावेळी लिलिपुट ब्राबडिंगनागच्या ढोबळ वर्णनांपेक्षा अधिक बारीकसारीक तपशिलांकडे माझे लक्ष गेले. उदाहरणार्थ, गलिव्हरने लिहिले आहे की, ''बादशहाच्या त्यातल्या त्यात मोठ्या पंधराशे

घोड्यांनी मला राजधानीकडे ओढत नेले.''

गलिव्हरचा दररोजचा आहार लिलिपुट देशात जो ठरवला गेला तो असा असतो या मानवी पर्वताला दररोज आपल्या १७२८ नागरिकांना पुरेल एवढे मांस व मद्य यांचा आहार देण्यात यावा.'

ब्रॉबडिंगनागमध्ये गलिव्हर एका सफरचंदाच्या झाडाखालून चालला होता. ''तेव्हा तेथील राणीनं एक झाड हलवले. त्यामुळे बारा सफरचंदे खाली पडली आणि माझ्या कानाजवळून गेली. ती एकेका बॅरलएवढी मोठी होती. त्यांतले एक माझ्या पाठीवर आदळले आणि मी एकदम जमिनीवर आडवाच झालो.''

ब्रॉबडिंगनागच्या राणीने खूष होऊन गलिव्हरला आपल्या करंगळीतली अंगठी काढून भेट म्हणून दिली. ''माझ्या डोक्यावरून तिने ती एखाद्या हारासारखी (कॉलरसारखी) माझ्या गळ्यात टाकली.'' असं गलिव्हर म्हणतो.

या वर्णनांकडे अधिक बारकाईने लक्ष दिल्यावर मला जाणवले की हे सगळे तपशील केवळ मनाला आले तसे गंमत म्हणून दिलेले नसावेत. त्यामागे काही गणिती हिशेब असावा. लिलिपुटमधल्या १७२८ बुटक्यांना पुरेल एवढं अन्न गलिव्हरला देण्यात यावे असा फतवा काढला जातो, तेव्हा १७२८ हाच आकडा का आला? दोन हजार का नाही आला? असा विचार माझ्या मनात आला. इतरही तपशिलातले बारकावे असेच अर्थपूर्ण असावे असे वाटत राहिले.

परंतु त्यावर त्यावेळी यापेक्षा जास्त काही गवसले नाही.

नुकतेच पेरेलमन या रशियन लेखकाचे एक पुस्तक वाचनात आले. आणि गलिव्हरच्या तपशिलातील गणिताची त्याने लावलेली संगती वाचायला मिळाली.

त्या रशियन लेखकाने गलिव्हरच्या प्रवासातल्या अनेक तपशिलांचा उलगडा गणिताद्वारे करून दाखवला आहे, तो मोठा रंजक वाटला.

आपल्या पृथ्वीवरच्या माणसांच्या म्हणजे गलिव्हरच्या तुलनेने लिलिपुटमधील माणसे प्राणी, झाडे व इतर गोष्टी या एकबारांश एवढ्या आकाराच्या आहेत. तर ब्रॉबडिंगनागमधील राक्षसी माणसे,

प्राणी, झाडे, फळे, दागिने वगैरे आपल्यापेक्षा बारापट मोठी आहेत. हे सूत्र ध्यानात घेतले म्हणजे अनेक तपशिलांचे नेमकेपण आपोआप उलगडत जाते.

जोनाथन स्विफ्ट हा ब्रिटिश लेखक. १६६७ ते १७४५ हा त्याचा काळ. गलिव्हर्स ट्रॅव्हल हे पुस्तक १७२६ साली प्रसिद्ध झाले. म्हणजे त्याला आता २८५ वर वर्षे होतील. बारा इंच म्हणजे एक फूट, बारा वस्तूंचा एक डझन, बारा पेन्स म्हणजे एक शिलिंग, बारा डझन म्हणजे एक ग्रोस हे बाराच्या पटीतले मोजमाप ब्रिटनमध्ये रूढ आहे. त्यामुळे स्विफ्टने लिलिपुटियन्सला बारा पट लहान केले तर ब्रॉबडिंगनागमधील सर्वांना बारा पट मोठे केले असे म्हणता येईल.

गलिव्हरला राजवाड्याकडे ओढून नेण्यासाठी गाडीला १५०० घोडे लावावे लागले, असा तपशील दिला आहे. एका दिवसाचा गलिव्हरचा आहार १७२८ लिलिपुटियन्स एवढा आहे. म्हणजेच १७२८ लिलिपुटियन्स आणि गलिव्हर यांची बरोबरी होऊ शकते. १२ चा घन १७२८ हा आहे. उंची, रुंदी व घेर यांची बारापट केली की झाले असा स्विफ्टचा आडाखा असावा.

लिलिपुटमधील सर्वात उंच घोडे व बैल हे चार ते पाच इंच उंचीचे आहेत. शेळ्या व मेंढ्या दीड इंचाच्या जवळपास आहेत. त्यांचे बदक हे आपल्या चिमणी एवढे असते... आणि या प्रकारे लहान लहान होणारे प्राणी शेवटी आपल्या नजरेलाही टिपता येत नाहीत. लार्क पक्षी हा माशीपेक्षाही लहान होता आणि एक तरुण मुलगी सुईच्या अणीतून दोरा ओवत होती तेव्हा ती सुई व दोरा हे तर मला कुठे दिसेनातच असे तो म्हणतो. लिलिपुटमधील गायी १२ सेंटिमीटर उंच आणि पाव किलो वजनाच्या असणार. त्यामुळे तेथील गाईला आपल्या खिशात घालून नेता येते असे गलिव्हर म्हणतो. ते अवास्तव मुळीच नाही.

गलिव्हर ज्या बोटीने लिलिपुटच्या किनाऱ्यावर गेला ती बोट लिलिपुटियन्सना अवाढव्य, राक्षसी वाटली असणार यात नवल नाही. लिलिपुटियन्सच्या बोटी आपल्यापेक्षा लांबी, रुंदी व उंची या तिन्ही बाबतीत बारा पटीने लहान म्हणजे १७२८ पट लहान असणार.

आपल्या पाण्याच्या बादलीत ६० ग्लास पाणी मावत असेल तर लिलिपुटमधल्या बादलीत ६०/१७२८ म्हणजे १/३० ग्लासच पाणी मावणार. अशा १० बादल्यांतले पाणी पिऊनही गलिव्हरची तहान भागली नाही यात नवल ते काय?

माणसांपेक्षा लिलिपुटियन्स १७२८ पट लहान असल्याने गलिव्हरसाठी १७२८ लिलिपुटियन्सच्या आहाराएवढा कोटा मंजूर करण्यात आला हेही त्यांच्या गणिताप्रमाणे योग्यच ठरले. गलिव्हरचे जेवण तयार करण्यासाठी ३०० लिलिपुटियन लागतात. तुलनेने १४४ पट मोठा असल्याने त्याचे कपडे शिवण्यासाठीही मोठी यातायात करावी लागते. ३०० शिंपी एक लिलिपुट सूट शिवतो; तर त्या हिशेबाने गलिव्हरच्या १४४ पट मोठ्या सूटाच्या शिलाईसाठी ३०० टेलर्स ही संख्या काही अवास्तव नाही.

आता ब्रॉबडिंगनागराकडे वळू : आपल्याकडील सफरचंदाचे वजन १०० ग्रॅम धरले तर ब्रॉबडिंगनागमधील सफरचंदाचे वजन त्याच्या १७२८ पट जास्त म्हणजे १७३ किलो भरेल. एवढ्या वजनाचे सफरचंद आदळल्यावर गलिव्हर आडवा झाला यात नवल नाही. तो वाचला हेच नशीब. असाच एकदा गारांचा पाऊस पडला तेव्हाही गलिव्हरच्या सगळ्या अंगाची सालडी निघाली. ब्रॉबडिंगनागमधील एकेका गारेचं वजन किलोभर तरी असणार.

राणीनं आपल्या करंगळीतली अंगठी काढून दिली, ती गलिव्हरच्या डोक्यावरून गळ्यात हारासारखी घातली गेली असे जे वर्णन आहे तेही यथार्थ आहे. आपली करंगळी दीड सेंटिमीटरची असते. तिच्या बारापट म्हणजे १८ सें. मी. झाले. राणीची अंगठी १८ सेंटिमीटर व्यासाची म्हणजे ५६ सें. मी. घेराची असेल. तर ती गलिव्हरच्या हाताऐवजी गळ्यातच शोभून दिसणार! आपल्या अंगठीचे वजन ५ ग्रॅम असेल; तर या आंगठीचं वजन ८॥ किलोच्या घरात जाईल. एवढा अवजड हारही आपली दमछाक करील.

ब्रॉबडिंगनागमधील पुस्तकांचेही आकार असेच अवाढव्य असणार! गलिव्हर म्हणतो की राणीनं मला कोणतेही पुस्तक घेण्याची परवानगी


दिली होती. राणीच्या एका सेवकाशी मी संधान बांधले. पंचवीस फूट उंचीचे एक लाकडी शिडीसारखे मशीन तयार करण्यात आले. त्या शिडीची एकेक पायरी पन्नास फूट लांबीची होती. शिडीचे सर्वात खालचे टोक भिंतीपासून दहा फूटांवर ठेवले होते. मी वाचण्यासाठी निवडलेले पुस्तक भिंतीला टेकवून उभे करण्यात आले. मी शिडीच्या सर्वात वरच्या पायरीवर चढून पुस्तकाच्या वरच्या पहिल्या ओळीपासून वाचायला सुरुवात केली. शब्दाशब्दागणिक पन्नास फूट आडव्या पायरीवरून मी उजवीकडे पुढे पुढे जाई व ओळ संपल्यावर पुन्हा डावीकडे येई. माझ्या डोळ्याच्या पातळीवर पुस्तकातली ओळ आल्यावर मी खालच्या पायरीवर उतरत असे. असे करीत करीत शिडीच्या तळाशी आलो. पान उलटू लागलो. ते पान पुठ्ठ्यासारखे जाडे होते. त्याची लांबी रुंदी १८ बाय २० फूट होती. त्यामुळे दोन्ही हातांनी मला ते पान उलटता आले.

हे वर्णन वाचून मी डोळ्यांसमोर ते चित्र आणले. आपल्या घराच्या उंची १० फूट असते; ब्रॉबडिंगमधील घराचे १२० फूट उंचीवर असणार. स्विफ्टच्या काळात म्हणजे १८ व्या शतकात पुस्तकाचा आकार २० बाय ३० सेंटिमीटर असे. त्याच्या १२ पट मोठे म्हणजे २४० बाय ३६० सेंटिमीटरचे तेथील पुस्तक वाचायला शिडी लागणारच. अशा पुस्तकाचे वजन आपल्या पुस्तकाच्या १७२८ पट असणार. वर उल्लेखिलेले पुस्तक हे किमान ३ टन वजनाचे असेल. एकेका पानाचे वजन सहा किलो असेल.

जोनाथन स्विफ्टने गलिव्हर्स ट्रॅव्हल्स लिहिताना केवळ कल्पनाशक्तीने वाटेल ते भरकटले नाही; गणिताचे व हिशेबाचे नेमके अवधान त्याला होते हे आपल्याला निर्विवाद पटते. ज्युल व्हर्नच्या 'चंद्रावर स्वारी' वगैरे कथांतले अनेक तपशील हे आजही बिनचूक ठरलेले आपण पाहतो, स्विफ्टनेही लिलिपुट व ब्रॉबडिंगनाग यांतील तपशील रंगवताना गणिताचा क्षणभरही विसर पडू दिला नाही याचेही तसेच अप्रूप वाटते.

**- शंकर सारडा**

◈




२ री आवृत्ती

# आनंदाचं पासबुक

लेखक


**श्याम भुर्के**

**किंमत : ३००/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**

दुर्दम्य इच्छाशक्ती असेल तर माणूस अनेक क्षेत्रात यश प्राप्त करू शकतो. श्याम भुर्के यांनी 'बँक ऑफ महाराष्ट्र'मध्ये यशाची अनेक उत्तुंग शिखरे गाठली. साहित्य व कला क्षेत्रात भरारी मारली. वि.स. खांडेकर, आचार्य अत्रे, पु.ल. देशपांडे, रणजित देसाई, जगदीश खेबूडकर, राम गबाले, भीमसेन जोशी, शरद तळवलकर, सुरेश भट, वामनराव चोरघडे, प्रा. शिवाजीराव भोसले अशा अनेक नामवंतांसंबंधीच्या आठवणी आनंददायी आहेत.

डॉ. शिवाजीराव पटवर्धन, डॉ. स्वर्णलता भिशीकर यांच्या समाजकार्यात सहभागी होता आले. खुमासदार अत्रे, पु.ल. एक आनंदयात्रा, नंदादीप– वि.स. खांडेकर, साहित्यिक सावरकर, गोनीदां-एक झंझावात, व्यंकटेश माडगुळकरांची गोष्ट, मिरासदारी, शरद तळवलकर–गुदगुल्या असे हजारो कार्यक्रम पत्नीसमवेत करून ज्येष्ठ लेखकांचे साहित्य व जीवन रसिकांपर्यंत पोहोचविले. असं हे आनंददायी घटनांचं समृद्ध लिखाण आहे.

ज्याला आयुष्यात मोठं व्हावंसं वाटतं, यशस्वी व्हावंसं वाटतं, आनंदी रहावं वाटतं; त्याला हे पुस्तक नक्कीच प्रेरणा देईल.




# एका पानाची कहाणी

४ थी आवृत्ती

**वि.स.खांडेकर**

खांडेकरांसारख्या प्रतिभावंत लेखकाची प्रांजळ आत्मकथा

**किंमत : २९५/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**

# ओळखा पाहू



## मराठीतही बेस्टसेलर ठरलेले वादग्रस्त कन्नड कादंबरीकार

••••••••••••••••••••••••

विजेत्यास कोणत्याही पुस्तकाच्या खरेदीवर ४०% सवलत देण्यात येईल. ही सवलत फक्त एका खरेदीसाठी राहील.

आपली उत्तरे दिनांक १५ एप्रिल २०१३ पर्यंत आम्हाला मिळायला हवीत. बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल. निकाल मे २०१३ च्या अंकात जाहीर होईल.

---

– जानेवारीच्या अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर –

बारामती नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष

**मोहन आगाशे**

---

स्पर्धेचे विजेते - **रवीन्द्र ना. सराफ,** ईश्वरी संकल्प, विसावा भोईवाडा परिसर, मु. पो. रावेर ४२५५०८ जि. जळगाव.

---

सुहास जाधव - कराड, प्रा. बी. ए. कांबळे - भोर, अनिकेत पाटिल - अमरावती, वसंत गायधनी- नाशिकरोड, सुभाष आरवाडे - सांगली, विनायक हावळ, संज्योत कुलकर्णी-कोल्हापूर, रमेश थेटे- चिंचवड, मयूर फणसे, एस. व्ही. आठवले, अर्चना कुलकर्णी- पुणे, रमेश गटकळ - बारामती, अरविंद भाटवडेकर - अंधेरी, वंदन वाणी-जळगाव.

---

**: उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** मेहता मराठी ग्रंथजगत विभाग, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, पुणे टेलिफोन भवनसमोर, पुणे - ४११०३०.

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

# मेहता मराठी ग्रंथजगत

आमच्या पुस्तकांवर वर्गणीदारांसाठी सवलत


| एक वर्षाला | तीन वर्षांना | पाच वर्षांना |
|---|---|---|
| २०% | २५% | ३०% |

**१ वर्षाची वर्गणी ` १५०**

**३ वर्षाची वर्गणी ` ३५०**

**५ वर्षाची वर्गणी ` ५००**

**३ व ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तके भेट!**







३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास **'लोखंड खाणारे उंदीर आणि इतर कथा'** - वृषाली पटवर्धन आणि **'सुंठ-बिस्किटाचा माणूस आणि इतर कथा'** - चारुता पुराणिक

ही प्रत्येकी ३० रुपयांची पुस्तके भेट! पोस्टेज रुपये २०/-







**भेट पुस्तके उपलब्ध असेपर्यंतच!**

५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास **'चला जाणून घेऊ या मंत्रसामर्थ्य'** - गायत्री सेवक व **'चला जाणून घेऊ या चक्रं आणि नाडी'** - सुभाष जोशी

ही प्रत्येकी ४० रुपयांची पुस्तके भेट! पोस्टेज रुपये २०/-

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टद्वारा खालील पत्त्यावर पाठवावी.**

***अथवा एस.बी.आय.च्या खात्यातही पैसे भरू शकता.***

STATE BANK OF INDIA
SBIN0000455
A/C NO 32749992008

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४


RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PNCW / M-184 / 2012 - 2014 / Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 March 2013

## चित्रकोडे

**खालील चित्रांवरून पुस्तक ओळखा व मिळवा आकर्षक भेट!**

**उत्तरे पाठवताना चित्रांवरील नंबर व मोबाईल नंबर आवश्यक आहे.**



BOOK POST
Printed Matter

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.